# शब्द रुची

मार्च २०२०

मूल्य १० रुपये


महिलादिन विशेषांक पृष्ठे ५६



storytel

# लाभले आम्हांस भाग्य ऐकतो मराठी!

फक्त स्टोरीटेल वर ऐका
१,००,००० हून जास्त
ऑडिओबुक्स




दर महिना १००+ नवी ऑडिओबुक्स

www.storytel.com/granthali
या लिंकवरून स्टोरीटेल ॲप डाऊनलोड करा
आणि ३० दिवस मोफत ऐका!

Download on the App Store | GET IT ON Google Play

## स्टोरीटेल डाऊनलोड कसं कराल?

अकाऊंट उघडण्यासाठी
www.storytel.com/**marathi**
या वेबसाईटला भेट द्या

ईमेल आयडी, पासवर्ड
किंवा फेसबूकवरूनही
तुम्हीं अकाऊंट उघडू शकता

तुमच्या डेबिट किंवा
क्रेडिट कार्डचा
तपशील भरा

****

तुमच्या फोनवर
ओटीपी नंबर येईल

कन्फर्मेशन मिळवा

स्टोरीटेल ॲप ॲप-स्टोअर
किंवा प्ले-स्टोअरवरून शोधा
व डाउनलोड करा

30 दिवसांचा ट्रायल पिरियड संपल्यानंतर तुमचे सबस्क्रिप्शन 299/ महिना असे सुरू राहील.

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

महिलादिन विशेषांक

मार्च २०२०, वर्ष सहावे
अंक अकरावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को–ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४४

## अनुक्रम

**स्मरणस्वर**
स्त्रीसमतेसाठीच्या खंद्या संवादक : विद्या बाळ / ६
**श्रुती तांबे**
सागरी सूर्यास्तसा... डॉ. राजाराम अमृत भालेराव / ८
**सुहासिनी कीर्तिकर**

**स्त्रीजीवन**
गोमंतकीय सुरेल स्त्रीजीवन / १०
**अनुजा जोशी**
वैदर्भीय स्त्रीजीवन / १४
**संघमित्रा खंडारे**
कोकणातील स्त्रीजीवन / १७
**रश्मी कशेळकर**

**शब्दविश्व स्त्रियांचे!**
मराठी कादंबरीमधली गर्भवती / २०
**डॉ. वृषाली किन्हाळकर**
स्त्री नाटककारांच्या नाटकातील समस्या / २३
**प्रा. डॉ. बालाजी पोतुलवार**

**कलाभिव्यक्ती**
झाडीपट्टी रंगभूमीचा नाट्यानुभव / २९
**ज्योती निसळ**
'थप्पड' – जाणिवेची नवी दिशा / ३२
**संतोष पाठारे**

**स्त्रिया आणि समाज**
मानसिक आरोग्याच्या मार्गावरून स्त्रीचा प्रवास / ३४
**डॉ. राजश्री देशपांडे**
हिंसामुक्त समाज / ३७
**वृषाली मगदूम**


**साहित्यरंग**
एका वेंधळ्या बाईची वेडीवाकडी आत्मकथा / ३९
**प्रकाश खरात**
**योगिना राऊळ, गीतेश शिंदे / ४४**

मोदींची कारकीर्द / ४५
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
**'ग्रंथाली' पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ४८**
ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे / ५१**

## संपादकीय

अवतीभवतीच्या पडझडीतही ताठ मानेने जगणाऱ्या सर्व सयांना मन:पूर्वक सलाम.

वयाची मर्यादा मैत्रीच्या नात्याला बांधू शकत नाही हे मी पुन्हा-पुन्हा अनुभवलंय. अनुबंधाचा असाच एक लखलखीत कवडसा ओंजळीत धरणाऱ्या सरोज जोशींनी जगाचा निरोप घेतला. मध्यंतरी सरोजताई त्यांच्या मुलीकडे परदेशी गेल्या होत्या, तेवढं ठाऊक होतं. दरम्यान पोहोचला तो, दिनकर गांगल 'नाबाद ऐंशी'च्या निमित्ताने 'शब्द रुची' दिवाळीकरता त्यांनी लिहिलेला लेख. गांगलांचं व्यक्तिमत्त्व किती सजीव केलं होतं त्यांनी! माणसं वाचण्याची कला त्यांना अवगतच असावी. त्यांचं 'झपाटलेली झाडे' हे पुस्तकही याची साक्ष देते. नव्या पिढीतील कवी-कवयित्रींशी संवाद साधत त्या-त्या व्यक्तीचं झपाटलेपण त्यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत टिपलंय. लिहित्या माणसांवर, त्यांच्या शब्दांवर सरोजताईंनी नितांत प्रेम केलं. त्या 'कोमसाप'च्या चेंबूर-घाटकोपर शाखेच्या अध्यक्षा होत्या. कधी भाषादिन-कधी महिलादिन, अशा वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या कार्यक्रमांकरता त्यांनी मला त्यांच्या शाखेत बोलावले. त्या बोलावण्यात प्रेम होते नि हक्कही होता. घाटकोपरस्थित सोमैया महाविद्यालय हे माझं कार्यक्षेत्र! सरोजताईंचं घर











तिथून जवळच होतं. त्यामुळेच खरं तर भेटींचे सुंदर क्षण आम्ही जगू शकलो.

विलक्षण देखणी अशी ही मराठीतली कवयित्री... संवेदनांचाही तितकाच देखणा आविष्कार करणाऱ्या... सरोजताई एकूणच रसिक! ही रसिकता त्यांच्या वेशभूषेपासून, त्यांच्या कवितांच्या अभ्यासातही ओतप्रोत जाणवायची. 'ग्रंथाली' कुटुंबाशी त्या दृढपणे जोडलेल्या होत्या. 'ग्रंथाली'ची 'कवितेचं व्यासपीठ' ही संकल्पना साकारण्याचं मोठं श्रेय त्यांना जातं. वेगवेगळ्या कवींना या व्यासपीठावर त्यांनी बोलतं केलं. पुस्तकांच्या निमित्ताने त्यांच्या घरी जाण्याचे योग आले. टापटीप, सुंदरतेची ओढ, पदार्थांबाबतचा चोखंदळपणा या सर्वांसकटचे सरोजताईंचे व्यक्तिमत्त्व अविस्मरणीय आहे!

कवितेची सखोल समज आणि त्यांचे विश्लेषण करण्याची स्वतंत्र शैली ही त्यांची वैशिष्ट्ये. कवितांवर प्रेम करण्याची त्यांची खास पद्धत होती. ज्योती राणे नावाची त्यांची एक मैत्रीण म्हणते, ''भाषादिन त्या दोघी एकमेकींना कविता ऐकवून साजरा करायच्या.'' सरोजताई स्वत:ही उत्तम कवयित्री होत्या. 'फिदा स्वत:वर' हा त्यांचा कवितासंग्रह 'ग्रंथाली'नेच प्रकाशित केला आहे. 'शीळ' या

त्यांच्या कथासंग्रहातून वा त्यांच्या कवितांमधून त्यांची प्रतिभा जाणवतेच पण 'कदंबाच्या झाडाखाली' या कार्यक्रमातून त्यांच्या प्रतिभेचा एक वेगळा पैलू प्रत्ययाला आला. कृष्ण, गोकुळ, गौळणी यांचे एक मनोहर विश्व या कार्यक्रमातून त्यांनी साकारले. आमच्या सोमैया संकुलात या कार्यक्रमाचा एक प्रयोग झाला होता, तेव्हा गुजराती भाषकांनीही त्याला मनमोकळी दाद दिली होती. या कार्यक्रमातील गीते, निवेदन आणि नृत्य... मधुराभक्तीचा अप्रतिम आविष्कार! कृष्णाविषयीची व्याकुळ करणारी ओढ त्यांच्या 'फिदा स्वत:वर' या संग्रहातूनही जाणवते.




आपल्या मातीवर, या मातीच्या सांस्कृतिक संचितावर त्यांनी खूप जीव जडवला, म्हणून तर अधूनमधून लेकीकडे परदेशात जातानाही त्यांचा जीव गुंतलेला राहिला तो या मातीतच! त्यांना भावांजली वाहताना मन कातर-कातर झाले आहे.

माणसांनी जे पेरून ठेवले. त्या संचिताच्या बिया पिढ्यान्‌पिढ्यांना अमाप देत राहतात. अनेकींना एकमेकींशी जोडून ठेवण्याचा विद्या बाळ यांचा चिरविरह सर्वांनाच अस्वस्थ करणारा आहे. 'ग्रंथाली'ने महिलादिन विशेष अंकाच्या मुखपृष्ठाद्वारा त्यांना अभिवादन केले आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या मुद्यावर सातत्याने काम करणाऱ्या, स्त्रीवादी लेखिकांच्या पुस्तकांचे अनुवाद करणाऱ्या, 'मुलगी झाली हो' या पथनाट्याच्या माध्यमातून चळवळीकरता झटणाऱ्या, 'स्त्री उवाच-प्रेरक ललकारी'मधून संवाद साधणाऱ्या मीना देवल यांनाही 'ग्रंथाली'ची विनम्र भावांजली...


जुन्या पिढीतील या मोठ्या मैत्रिणींनी खूप काही रुजवलं. स्वत:च्या पलीकडे पहायला शिकवलं; हा वसा सोपा नाही, पण पुढली वाट चालायची तर त्यांनी दिलेल्या प्रकाशात ती अधिक ठळक दिसेल!

**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

ग्रंथाली

# मु.पो. आई

**संपादन : संदीप काळे**




संदीप काळेंनी माध्यमांतील जाणकार संपादक मंडळींचे संपादित केलेले सगळे लेख वाचले तर जाणवतं की, आई म्हणजे प्रतिकूलतेशी अव्याहत झगडणारी, न डगमगणारी, मुलांच्या भल्यासाठी तगमगणारी, कधी हळवी; तर कधी खंबीर, मुलांना घडवणारी वात्सल्यमूर्ती असते. या पुस्तकाच्या पानोपानी नि:स्वार्थ सेवेचं, क्षमाशीलतेचं आणि स्थितप्रज्ञतेचं दर्शन सर्वच लेखांमध्ये घडतं. संपादकांचे मातृस्मरण करणारे लेखांचा हा ठेवा जपून ठेवण्यासारखा आहे.

**– शरद पवार**

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रुपये**

# स्त्रीसमतेसाठीच्या खंद्या संवादक : विद्या बाळ



**स्वत:चा शोध घ्यायला आणि अनेकींना बोलतं व लिहितं करणाऱ्या विद्याबाई कृतिशील सुधारक होत्या. नव्या कार्यकर्त्यांना बळ देणाऱ्या विचारी विद्याताई स्वत:च्या चुका सहज मान्य करीत.**

**श्रुती तांबे**



विद्या बाळ

**ला**घवी बोलणे, स्पष्ट मतं, विचारांच्या आग्रहासाठी लढाऊपणे मोर्चे काढणं, धरणं धरणं, चिकाटीने गौणपणा स्वीकारून मौन पाहणाऱ्या स्त्रियांना बोलतं करणं, लिहितं करणं यात स्वत:ला झोकून दिलेलं ऋजू नेतृत्व म्हणजे विद्याताई बाळ. विद्याताईंचं जाणं हा अंत आहे, त्यांच्या अथक प्रयत्नांचा. पाच दशकं सतत त्यांनी सुशिक्षित ते अशिक्षित, महानगरी ते निमशहरी स्त्रियांना बोलतं करण्याच्या, त्यांना पुढे आणण्याच्या प्रयत्नांच्या प्रवासाचा अंत आहे.

महाराष्ट्राला समाजसुधारकांची, द्रष्ट्या धुरिणांची परंपरा आहे. विशेषत: ब्रिटिशकाळात जी सुधारकी परंपरा सुरू झाली, त्या परंपरेला पुढे नेणाऱ्या सुधारक म्हणून विद्या बाळांचं नाव घ्यावं लागेल. तर्काच्या आधाराने, विचारांची-वादविवादाची विवेकी परंपरा महाराष्ट्रात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोखले, रानडे, आगरकर, महर्षी कर्वे यांनी चालवली. सत्यशोधक समाजाच्या गावोगावच्या कार्यकर्त्यांचे मोहोळही नवविचारांचे पाईक होते. त्याकाळात दर्पण, विविधज्ञानविस्तारापासून अनेक मासिके, वृत्तपत्रे निघाली. यातून नव्याने शिकू लागलेल्या स्त्रीपुरुषांना माहिती मिळू लागली, इतकेच नव्हे तर जातीच्या आणि आपापल्या गावापलीकडचेच नाही, तर पार सातासमुद्रापलीकडचे जगही त्यांना कळू लागले. यातूनच महात्मा फुल्यांनी अनेरिकेतल्या गुलामगिरीविरोधी आंदोलनाशी आपल्या विचारांची सांगड घातली. जोतिबा आणि सावित्रीबाईंनी विषमतावादी विचारांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष स्त्रीशूद्रदास्यअंतासाठी केवळ लिखाण नाही, तर मूर्त कृतीचा मार्ग स्वीकारला. गोखले पाश्चात्त्य उदारमतवादातून भारतीय उदारमतवाद मांडत होते. आगरकरांनी केवळ उदारमतवादाच्या तात्त्विक मांडणीवर भर न देता महाराष्ट्रातल्या स्त्रियांच्या दैनंदिन प्रश्नांना वाचा फोडली. विद्या बाळ ह्या या मांदियाळीत बसणारे नेतृत्व होत्या.

विद्या बाळांच्या व्यावसायिक कामाची सुरुवात पुणे आकाशवाणी केंद्रावर होणाऱ्या बायकांच्या कार्यक्रमांसाठी लेखक नि संवादक म्हणून झाली. गृहिणींनी स्वत:चे घर उत्तम कसे सांभाळावे, याचे धडे देणारे असे हे कार्यक्रम असत. बहुतेक उच्चजातीय मध्यम वर्गीय स्त्रिया त्याकाळी मॅट्रिकनंतर लग्न करीत. संसार, व्रतवैकल्ये, मुलेबाळे यात मग्न होत. अशा काळात आकाशवाणीवर फावल्या वेळात गृहिणींनी काय करावे, आरोग्य इत्यादी विषयांवरचे कार्यक्रम लोकांना मोलाचे वाटत. विद्याताईंचे त्याकाळचे हे कामही लोकांना खूपच वेगळे वाटले असणार यात शंका नाही.

त्यानंतर काही काळातच त्याकाळी अतिशय गाजत असलेल्या किर्लोस्कर कंपनीशी संबंधित 'स्त्री' मासिकाच्या संपादक सहाय्यक म्हणून त्या रुजू झाल्या. मध्यमवर्ग हा समाजाचा आरसा असतो, तो समाजाचं नेतृत्व करतो, असं ज्याकाळी ठामपणे मानलं जात असे, त्याकाळात १९३० मध्ये महाराष्ट्रात 'स्त्री' नावाचं मासिक काढणारे द्रष्टे शं. वा. किर्लोस्कर होऊन गेले. शं. वांनी त्याकाळी धाडसी वाटेल, अशा अनेक विषयांवर स्त्री मासिकात बरंच काही छापलं होतं. आगरकरांचा स्त्रियांनी सुटसुटीत कपडे घालावेत, असे मांडणारा लेख असो, की दर अंकात छापली जाणारी देश परदेशातली स्त्रियांची प्रवासवर्णनं असोत की त्याकाळी क्रांतिकारी वाटतील अशा स्त्रिया केवळ मादी नाहीत, तर माणूस आहेत, हे सांगणाऱ्या बंडखोर स्त्रीपात्रांच्या कथा असोत- 'स्त्री' मासिक हे महाराष्ट्रात एक नवविचार घडवत होतं. विद्याताई 'स्त्री' मासिकातील कामातून माझी वाढ झाली, असं मोकळेपणानं म्हणत असत. जवळजवळ वीस वर्षं विद्याताईंनी आधी सहाय्यक संपादक आणि नंतर कार्यकारी संपादक म्हणून स्त्री मासिक केवळ चालवलंच नाही, तर वाढवलं, वैचारिक प्रगल्भतेकडे नेलं. त्यांच्या संपादकत्वाखाली त्यांनी काढलेला 'महात्मा फुले स्मृती विशेषांक' असो, की मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर

आंदोलनात स्वत: सामील होऊन त्यावर लिहिलेला लेखांक असो, 'स्त्री' मासिकानं त्याकाळात वेगवेगळे पायंडे पाडले. आपल्या काळात आजूबाजूला घडणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थित्यंतरांकडे स्त्रियांनी सजगपणे पाहिलं पाहिजे, ते सारं जाणून घेतलं पाहिजे, या आग्रहातून त्या ह्या सर्व घडामोडी एका स्त्रीविषयक मासिकांतून सातत्यानं मांडत राहिल्या. एक साक्षेपी संपादक म्हणून त्यांनी नाव कमावलं ते उत्तमोत्तम लेखक-लेखिकांना लिहितं करण्यातून.

विद्या बाळांचं आणखी एक न विसरता येण्याजोगं वैशिष्ट्य म्हणजे त्यांची विलक्षण साधी, मनाला हात घालणारी अनलंकृत लेखनशैली! त्यांचं संपादकीयदेखील जणू शांत झोपलेल्या, प्रश्न न विचारणाऱ्या स्त्री पुरुषांना त्या न दुखावता, पण हलवून जागं करून विचाराला प्रवृत्त करत. 'बोलत्या व्हा', हे त्यांचं आवाहन असो, संवादकीय हे 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादकीयाचं त्यांनी केलेलं नामांतर असो, त्या स्वत:लाच बदलून पुढे जात राहिल्या. त्यांचे विचार सुस्पष्ट होते, पण त्या कधी कर्कश्श झाल्या नाहीत.अर्थात त्यांचा लक्ष्य वाचकवर्ग हा उच्चशिक्षित, शहरी मध्यमवर्गीय होता, त्याहीमुळे असेल, परंतु त्यांनी मांडणीतील संयमाला महत्व दिले होते. यातली एक मेख अशी की त्या १९८२ सालापासून कृतिशील सामाजिक काम करू लागल्या. पुण्यात त्यांनी 'नारी समता मंच' ही संघटना सुरू केली. त्यात तक्रारी सांगायला बहुतेक मध्यमवर्गीय, उच्चजातीय स्त्रिया येत असत, परंतु तरीही मध्यमवर्गीयांना मात्र आमच्या घरात त्या झोपडपट्टीतल्यासारखी भांडणे, मारहाण होत नाहीत, असेच वाटत असे. आपण जे वागतो, त्यातला भेदभाव हा मारहाणीपेक्षाही भयानक त्रासदायक आहे, असे पुरुषांना आणि इतर कुटुंबियांना वाटतही नसे. हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचाराला त्या तोंड फोडू लागल्यावर मात्र 'घरं फोडणारी बाई' असा शिक्का त्यांच्यावर मारला गेला.

स्त्रीवादी विचारांचं स्वतंत्र मासिक सुरू करण्याचा धाडसी विचार घेऊन समविचारी मंडळींसोबत त्यांनी १९८९मध्ये नवं काम उभारलं. त्यासोबतच हळूहळू अक्षरस्पर्श ग्रंथालय, साथसाथ विवाह अभ्यासमंडळ हे उपक्रमही सुरू केले. 'स्त्री' मासिकापासून भारतभर विविध शहरात त्यांनी 'स्त्री सखी' हे जाळंही उभारलं होतंच. या संस्थात्मक जोडणीतून त्यांनी त्यांचं काम अधिक विस्तारत नेलं. वेगळ्या वाटेनं चालणाऱ्या स्वत:च्या आत्या कमलाबाई देशपांडे यांच्याविषयी त्यांनी लिहिलं ते त्यांचं पहिलं पुस्तक. त्यानंतर त्यांनी 'शोध स्वत:चा', 'तुमच्या माझ्यासाठी', 'साकव' ही पुस्तकंही लिहिली.

आगरकर-टिळक वाद महाराष्ट्रात गाजला तो, 'आधी सामाजिक बदल' की आधी राजकीय बदल याविषयी होता. त्याकाळी महाराष्ट्रात बोलके सुधारक आणि कर्ते सुधारक अशी एक चर्चा खूप रंगली होती. लिखाणातून मोठे दावे ठोकणारे परंतु प्रत्यक्ष कोणतीच कृती न करणारे सुधारक टीकेचे धनी झाले होते. विद्याताई कृतिशील सुधारक होत्या. नव्या कार्यकर्त्यांना बळ देणाऱ्या, आवर्जून दखल घेणाऱ्या, संयत सुरात समजूत काढणाऱ्या विचारी विद्याताई स्वत:च्या चुका सहज मान्य करत. ती पारदर्शकता त्यांच्या ठायी होती. आपण शिकत गेलो, हळूहळू संक्रमित होत गेलेलं ज्ञान स्वीकारत गेलो, हे त्या ज्याच्याकडून जे शिकलं, त्याच्या श्रेयासकट मान्य करायच्या.

स्त्रीवादच काय, पण स्त्रीमुक्ती हा शब्ददेखील जेव्हा भारतात, महाराष्ट्रात वापरला जात नसे, तेव्हा विद्या बाळ यांनी स्त्रियांच्या माणूसपणाच्या प्रतिष्ठेसाठी कर्मठ संस्कृतीचा गड मानल्या जाणाऱ्या पुण्यात आपल्या लिखाणातून, भाषणातून अक्षरश: शिंग फुंकलं. अख्खा महाराष्ट्र त्यांनी १९८०च्या दशकात पिंजून काढला. १९७५ नंतरच्या काळात 'मुलगी झाली हो' या पथनाट्याचे प्रयोगही महाराष्ट्रभर चालू होते. स्त्रीमुक्तीची ललकारीसारख्या पत्रिका सुरू झाल्या होत्या. अशा काळात महाराष्ट्राचं पुरागामी हे नाव सार्थ करायला विद्या बाळ यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्याआधीपासूनच पुण्यात मालिनीबाई तुळपुळे, शांताबाई रानडे कार्य करत होत्या. १९७५नंतरच्या काळात सुलभा ब्रह्मे, नीलम गोऱ्हे, शारदा साठे, छाया दातार, नजुबाई गावित, गेल ऑम्वेट, निर्मला साठे, अशा अनेकजणी प्रेरक कामे करत होत्या. यातूनच महाराष्ट्रात स्त्रीहिंसाविरोधी जागरण झाले. अलीकडच्या काळात आपल्या साऱ्या शक्तीनिशी त्या विवेकवादी आंदोलनांपाठीमागे उभ्या राहिल्या. डॉ. दाभोळकरांचा खून, कॉ. पानसरेंचा खून यानंतर त्या पुन्हा जोमाने कामाला लागल्या होत्या. हे जे घडते आहे, ते महाराष्ट्राला लांच्छन आहे, असे त्यांचे मत त्या परखडपणे बोलून दाखवत असत. सैद्धांतिक स्त्रीवादापासून काहीशा फटकून असणाऱ्या विद्याताई सामान्य तरुण मुलींसोबत मात्र कमालीच्या खुलायच्या. शाळेत जाणाऱ्या, कॉलेजातल्या नव्याने विचार करू पाहणाऱ्या अक्षरश: हजारो स्त्रीपुरुषांना, तरुण-तरुणींना विद्याताईंनी खुलवले, त्यांचा रस्ता त्यांनाच शोधायला भाग पाडले.

ज्या शहरी, मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजात त्या वाढल्या, त्या समाजाच्या परीटघडीने लपवलेल्या स्त्रीच्या वेदनेला त्यांनी बाहेर काढले. स्त्रियांना बोलते केले, आणि पुरुषांनाही शत्रू न मानता स्त्री-पुरुष परस्परसंवादाच्या शक्यता खुल्या केल्या. लाखो स्त्रियांच्या आयुष्यात सन्मानाची भावना जागवणाऱ्या विद्याताईंना प्रणाम!


**- श्रुती तांबे**
भ्रमणध्वनी : ९८९०९०६८४९
shruti.tambe@gmail.com

# सागरी सूर्यास्तसा... डॉ. राजाराम अमृत भालेराव



**प्रयोगशील असलेल्या डॉ. बाळ भालेरावांकडे दूरदृष्टी होती. तन-मन-धनाने ते शेवटच्या श्वासापर्यंत साहित्यसंघाशी जोडलेले होते.**

**सुहासिनी कीर्तिकर**



'**मुं**बई मराठी साहित्य संघ' हे तीसच्या दशकात डॉ. अ.ना. भालेराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वप्न होतं. डॉ. भालेरावांच्या प्रयत्नाने उघड्या मैदानावर त्याकाळी झालेल्या नाट्यप्रयोगांनी मराठी रंगभूमीचा इतिहास घडवला. त्यातून साकरलेले मूर्त मंदिर म्हणजे 'मुंबई मराठी साहित्य संघ'! डॉ. अ.ना. भालेरावांचे जणू साकारत असलेले दुसरे घर. त्यांच्या घरी म्हणजे 'नारायण सदना'त महिनोन्‌महिने नाटकांच्या तालमी होत. तात्या आमोणकरांच्या मुली, डॉ. गं. मा. फडके, बापूराव नाईकांचे कुटुंब, बालगंधर्व, अंजनाबाई लोल्येकर आदी अनेकांचा मग तेथेच मुक्काम असे. 'भाऊबंदकी'सारख्या नाटकांसाठी दुर्गाबाई खोटेंना वापरायला डॉ. अ. ना. भालेरावांच्या पत्नीचे खरे दागिने लागत. मनोरमा फडकेंची घडी न मोडलेली नवी कोरी पैठणी लागे. रोजच्या पंचवीसतीस माणसांच्या पंगती, दागिने-कपडे आदी रंगपटात सांभाळणे, असा सगळा वसाच भालेराव कुटुंबाने घेतला होता. अशा तालमींच्या, गदारोळाच्या वातावरणातच राजाराम हे अमृत नारायण भालेरावांचे चिरंजीव एम. बी. बी. एस्. ही परीक्षा सुवर्णपदकासह उत्तीर्ण झाले. जी.एस. मेडिकल कॉलेजमधून पुढे 'एम एस्' झाले. ॲनाटॉमी आणि सर्जरी या विषयांत (१९५२ आणि १९५६ मध्ये) विद्यापीठाकडून सुवर्णपदक मिळवले. १९६२ ते ६४ मध्ये त्यांनी 'एफआरसीएस' ही मिळवली. कॉलेजजीवनात क्रिकेट आणि नाटकांत त्यांचा सहभाग असायचा. घरी आणि खरं तर रक्तातच भिनलेली साहित्य, नाटकाची आवड त्यांनी जोपासली. 'एफआरसीएस' होऊन परतल्यावर 'केइएम'मध्ये सर्जरी विभागात विभागप्रमुख म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना घडवले. १९८५ मध्ये हिंदुजा रुग्णालय आणि मेडिकल रिसर्च सेंटरमध्ये सर्जरी विभागप्रमुख म्हणून पुढे ते कार्यरत झाले. गॅस्ट्रोएनरॉलॉजी, लिव्हरचे रोग आदींबाबतीत ते प्रसिद्ध तज्ज्ञ म्हणून ओळखले जात. पुढे ते (१९८९-२००१) 'डायरेक्टर ऑफ प्रोफेशनल सर्व्हिसेस' झाले. हिंदुजा हेल्थ केअर सेंटरचे ते सल्लागार होते. त्यांचे ज्ञान, निदान आणि शल्यकौशल्य वादातीतच होते म्हणूनच देशोदेशींच्या मेडिकल जर्नल्समध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध झाले नसते तरच नवल! १९७९पासून ते नॅशनल ॲकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सचे फेलो होते. तसेच मुंबई विद्यापीठाच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचेही सदस्य होते. 'महाराष्ट्र मेडिकल युनिव्हर्सिटी'चे सिनेट मेंबर, देशापरदेशात निबंध वाचनासाठी निमंत्रित, अनेक परिषदांचे अध्यक्ष राहिलेले डॉ. रा. अ. भालेराव हे डॉ. बाळ भालेराव या उपनावानेच ओळखले जात.

माणसाच्या शरीरातील रक्ताचा 'ओ निगेटीव्ह' हा दुर्मिळ रक्तगट असतो. डॉ. बाळ भालेरावांच्या वृत्तीत, नसानसात 'ओ पॉझिटीव्हनेस' भिनलेला होता. हा देखील दुर्मिळच! म्हणूनच १९३५ पासून यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते स्थापन झालेला 'मुंबई मराठी साहित्य संघ' हा त्यांचा बहिश्चर प्राणच होता. या साहित्य संघाने डॉक्टरांच्या पुढाकाराने 'पु.लं'चे अंमलदार आणले. 'तुझे आहे तुजपाशी' अमर केले. वि.वा. शिरवाडकरांनी साहित्य संघासाठी 'दूरचे दिवे' लिहिले. 'राजमुकुट' ही त्यांचेच. 'संत गोरा कुंभार' हे रंगमंचावर तंत्रकिमया करणारे नाटक, 'धाडिला राम तिने का वनी', 'संन्यस्त खड्ग' ही संगीत नाटके साहित्य संघाचीच. त्यामागची प्रेरणा बाळदादांची. (डॉ. बाळ भालेराव यांची)

नाट्यसृष्टीत ऐतिहासिक चमत्कार म्हणावा असे नाटक साहित्य संघाने १९७४ साली दिले. बर्ट्रांड ब्रेख्त यांच्या 'कॉकेशियन चॉक सर्कल'चा चि. त्र्यं. खानोलकरांनी केलेला अनुवाद 'अजब न्याय वर्तुळाचा' साहित्य संघाने रंगभूमीवर आणला. विजया मेहता यांच्या मेहनतीला, प्रयत्नांना खांद्याला खांदा लावून साथ दिली ती डॉ. बाळ भालेरावांनी. या नाटकाचे युरोपभर प्रयोग झाले. डॉ. बाळ नसते तर हा चमत्कार घडलाच नसता. 'मुद्राराक्षस' जर्मनमध्ये त्यांच्या भाषेत गेले तेही डॉक्टरांच्यामुळेच. डॉक्टर असे प्रयोगशील होते. प्रायोगिक नाटकांसाठी वडिलांच्या आठवणी जागवत 'अमृत नाट्य भारती' उभे राहिले ते म्हणूनच! आजही त्यांनी पाचव्या मजल्यावरचे 'पुरंदरे सभागृह' 'ड्रामा स्कूल'च्या प्रयोगांना दिलेय. तेथे जहान् माणेकशा हिंदी, इंग्लिश नाटकांचे प्रयोग करीत असतात, प्रशिक्षण देत असतात. बालनाट्याचे प्रशिक्षण आणि सुधा करमरकरांच्या बालरंगभूमीला खतपाणी डॉ. बाळ भालेरावांनीच घातले. नाट्यसंगीत प्रशिक्षण, नवीन नाटकांची निर्मिती, अमराठी भाषकांना मराठीचे प्रशिक्षण, महाविद्यालयीन आणि महानगरीय मराठी साहित्य संमेलने, 'साहित्य' या त्रैमासिकाची निर्मिती, व्याख्यानमाला, चर्चासत्रे, परिसंवाद, अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे काम अशा साहित्य आणि सांस्कृतिक जीवनाशी निगडित असंख्य उपक्रमांच्या मागे डॉ. बाळ भालेरावांची प्रेरणा मार्गदर्शन आणि पाठिंबा असे. माणसांची अचूक पारखच त्यांना होती. मात्र या माणसांच्या हाती काम सोपवले, त्यांना मार्गदर्शन केले की अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा अध्यक्ष राहिलेला हा माणूस, अब्दुल कलामांच्या हस्ते बी. सी. रॉय पुरस्कार लाभलेला हा धन्वंतरी कार्यक्रम सुरू असताना फक्त रसिक श्रोत्याच्या-प्रेक्षकाच्या भूमिकेत वावरायचा. रंगमंचावरची खुर्ची त्यांनी कधी अडवली नाही. प्रेक्षागृहात सहाव्या रांगेच्या कोपऱ्यातली खुर्ची त्यांच्यासाठी असायची. चुकून कधी रंगमंचावर आलेच तर मात्र शर्टच्या बटणाशी बोटांनी खेळत वा शर्टच्या डाव्या, वरच्या खिशावर हात फिरवत ते 'मर्मबंधातली ठेव' म्हणून जुन्या आठवणी, माणसांचे कार्यकर्ते म्हणून मोठेपण सांगायचे. डाव्या बाजूलाच हृदय असते ना! म्हणून तो हात फिरवताना जणू ते हृदयालाच साद घालत बोलायचे.

ही साद त्यांनी स्वत:लाही घातलेली असायची. म्हणूनच नाट्यसृष्टीतल्या, साहित्यविश्वातल्या कुणालाही काही दुखो, खुपो, की डॉ. बाळ भालेराव त्यांच्यासाठी असायचे. वैद्यकीय उपचार, आर्थिक मदत, धीर देणारे हसरे बोलणे. यामुळे त्यांनी अनेकांना सावरले आहे. 'जेवढी दुवा देशील पांथा, तेवढी माझी कमाई' ही त्यांची त्यामागे भूमिका असायची. मलाही याचा भरपूर अनुभव आलाय. अ.भा. मराठी महामंडळाचे पहिले विश्व साहित्यसंमेलन सॅन होजेला भरले तेव्हा साहित्य संघातर्फे एक प्रतिनिधी मी होते. मला प्रथम 'व्हिसा' नाकारला गेला; तर डॉ बाळ भालेरावांनी आग्रह करकरून मला पुन्हा अर्ज करायला लावला.

'अमराठी भाषकांना मराठी शिकविण्याचे पुण्यकार्य तू करते आहेस' हा त्यांचा मला दिलासा असायचा. 'साहित्य' त्रैमासिकाची मी पाच वर्षे संपादक होते. तेव्हा त्या मासिकात विषय काय घ्यायचे, विशेषांक कोणता व कसा असावा, मुद्रणाचे काम कोणाला द्यायचे इत्यादी बाबत त्यांची निश्चित धारणा असायची. साहित्य संघाला सुरुवातीच्या उमेदीच्या काळात ज्यांनी-ज्यांनी तनमनधनाने हातभार लावला; त्यांच्याबद्दल कृतज्ञता होती त्यांच्या मनात म्हणूनच स्मरण व्याख्यानमाला 'अमृत व्याख्यान माला' झाली, 'यशवंत पुरस्कार' आणि 'सहचारिणी पुरस्कार' त्यांच्यातर्फे देण्यात येऊ लागले. 'वा. रा. ढवळे स्मृतिदालन' उभे राहिले. या वा. रा. ढवळे स्मृतिदालनाला 'अक्षर साहित्य दालन' असेही प्रतिनाव आहे. ही आगळीवेगळी संकल्पना डॉ. बाळ भालेरावांचीच. इथे पंधरा-सोळा प्रकाशकांच्या सहकार्याने पुस्तके मांडली आहेत. वाचकांनी यावे, पुस्तक वाचावे, हवे असल्यास विकत घ्यावे अशी त्यामागील त्यांची धारणा. याच दालनात महिन्याला किमान एक आणि पुढे कितीही कार्यक्रम सातत्याने होतात. अशांना या दालनाची जागा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येते. या दालनातर्फे 'अक्षर साहित्य' नावाची छोटी पुस्तिकाही प्रकाशित करण्यात येते. या पुस्तिकेची संकल्पना, विषयाची निवड, लेखकांची निवड पूर्णपणे डॉ. बाळ भालेराव यांची असायची. इतकेच नव्हे तर पुस्तिकेसाठी मुद्रकही तेच ठरवायचे आणि प्रकाशनाला लागणारा पूर्ण खर्चही तेच करायचे. या दालनातर्फे काही छोटी पुस्तके (पॉकेटबुक्स) यावीत हीदेखील त्यांचीच भविष्यवेधी कल्पना. त्यानुसार 'ज्ञानेश्वरी'चे संक्षिप्तरूप 'अमृत कण कोवळे' नावाने रेखा नार्वेकरांनी केले आणि त्याला उदंड प्रतिसाद लाभला. प्रयोगशील असलेल्या डॉ. बाळ भालेरावांकडे संस्थेच्या सर्वंकष विकासासाठी लागणारी दूरदृष्टी (व्हिजन) होती. अगदी ८७व्या वयातही ते आत्ताआत्तापर्यंत सतत साहित्यसंघाशी बांधलेले होते, कार्यरत होते. तनाने, मनाने, धनाने!

२१ फेब्रुवारी २०२० रोजी त्यांची तनु अनंतात विलीन झाली. मात्र साहित्यसंघाशी जडलेली त्यांची चित्शक्ती अमरच आहे. बा. भ. बोरकर यांच्या एका कवितेचा शेवट पुढील ओळींनी होतो -

'देखणा देहान्त तो जो सागरी सूर्यास्तसा
अग्निचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा...' मला वाटते हा वारसा साहित्य संघ असाच पुढे चालवेल आणि त्यांनी पेरलेल्या संस्थाकार्याला आणखी धुमारे फुटतील.

**- सुहासिनी कीर्तिकर**
भ्रमणध्वनी : ९८२०२५६९७६

# गोमंतकीय सुरेल स्त्रीजीवन



अनुजा जोशी

**आजी, मालन आणि चेडू...
गोव्यातील स्त्रीची ही नानाविध रूपे. नैसर्गिक व सांस्कृतिक समृद्धीने बहरलेल्या गोव्यातील स्त्रीरूपांचा हा देखणा कोलाज...**

**पौ**षातल्या दुधाळ चांदण्यात गोव्याच्या एखाद्या आडखेड्यात 'धाल्याचा मांड' सजतो. सारवलेलं अंगण,सुरेख रेखलेली रांगोळी, मातीचं तुळशीवृंदावन आणि झुरुमुरु थंडी दव धुकं. नऊवारी लुगडी नेसून, नथी घालून केसात आबोलीची फाती माळलेल्या 'मालनी' लगबग करीत मांडवात येतात. एकमेकींसमोर दोन ओळी करून उभ्या राहतात. एकमेकींच्या कमरेभोवती हात घालून गात गात नाचू लागतात. एक ओळ नाचत-नाचत मध्यरेषेपर्यंत येते. वाकते. पुन्हा नाचत पाठीमागे जाते. मग त्यांच्या समोरची दुसरी ओळ तसं करते. लाटा उलगडत जाव्यात तसं ते दृश्य दिसतं. एक गाणं म्हणून झालं की नाचतच त्या रचना बदलतात. मग छान फेर धरतात... पौर्णिमेच्या पिठुळ चंद्राला त्या 'धालोत्सवा'चं आवतण देतात. चांदण्याच्या देवाला चिठ्ठी धाडतात.

आला आला गं पौषाचा महिना
धालो पौर्णिमा आली गं
रात जागवू चला गं..
दूर आकाशी देवाची वस्ती
चिठ्ठी तया चला धाडू गं
देवाला खेळाया बोलवू गं..
देव आला बाई, देव आला बाई
चांदण्याचा देव आला गं
गाण्याची फुले चला वाहू गं...

अशा त्या अप्सरा, मेनका, उर्वशी होऊन धाल्यात नाचू लागतात.माणकावंती, नागावंती, गुणावंती, बेलावंती, जोगलावंती (जोगुल म्हणजे वीज) कुकमावंती, काजळावंती, धुपावंती, तुळशीवंती अशा या 'धाल्या'तल्या रंभा गाणी गाऊ लागतात.

घोडेमोडणी, फुगडी, फेरफुगडी, मोरुला (मोरफुगडी), घार, कोंबडी, आळ असे नानाविध फुगड्यांचे प्रकार खेळताना मालनी देहभान विसरतात. रोजचे व्यापताप विसरतात. मांडवातून, झावळ्यांच्या छतातून झिरपणारं पौषातलं दुधाळ चांदणं साध्यासुध्या मालनींवर मायेची पखरण करीत राहतं.

हे सगळं कुठे चित्रात रंगवलेलं किंवा कथा कादंबऱ्यांमधे फक्त लिहिलेलं वर्णन नव्हे, तर हे आजच्या घडीला गोव्याच्या ग्रामीण परिसरात दिसणारं जिवंत चित्र आहे! आणि वर वर्णन केल्याप्रमाणे 'धालोत्सवा'सारख्या या सगळ्या प्रथा-परंपरा गोमन्तकीय स्त्रीच्या पदराला धरून मन:पूर्वक व भक्तिभावाने पुढे सरकताना आजही दिसताहेत...

हांव सायबा पलतडी वयतां
कामुर्ल्या लग्नाक वयतां
माका सायबा वाट दाखय रे..
माका नाका गो.. माका नाका गो..

असं म्हणत समुद्रकिनारी किंवा नदीकाठी झाडामाडात, हिरव्या शेतमळ्यात नाचणारी गोंयकारीण ही तर गोव्याचं सुरेल चिन्हच ठरलेली...ही अशी एकेक चित्रं आधी नुसती बघूया आपण! मग बोलूया त्यावर, टिपूया काही भलं बुरं..नोंदवूया साधक-बाधक. गोड गोड आणि तिखटसुद्धा..!

ब्यॅन्ड्रा फेस्ता गेल्लो हांव निमण्या आयतारा
फेरयेन् भोवता भोवता वरां जायत येयली बारा
चणेकारां म्हणो लागली चणें व्होरात
चणे घेता-घेता हांव पावलो ना घरां
ब्यॅन्ड्रा फेस्ता वयता म्हणून तिकटां काडिल्ली
ताणी एका कुशीन म्हज्या आण्टीक धाडील्ली
वयर सकला पळोवन आण्टी तिंगाच बसली
ओ माय गॉड म्हणून तिणी वेंग मारिल्ली!

मुंबईच्या वांद्र्याच्या प्रसिद्ध फेस्ताला गेलेला एक पोरगा प्रवासात भेटलेल्या फ्रॉकवाल्या आण्टीची अशी गंमत सांगतोय. हे लिहितानाही मी पार्श्वसंगीतासारखं हे गाणं म्हणते आहे, सुरेख चालीचं! म्हणताना नकळत अंग डोलू लागतं. ही लय गोव्याच्या संपन्न निसर्गाने इथल्या जगण्याला दिलेली!

गोमन्तकीय स्त्रीजीवन हे पिढ्यान् पिढ्या असं नैसर्गिक व सांस्कृतिक समृद्धीने गजबजलं आहे. स्त्रियांनी काबीज केलेली विविध क्षेत्रं सगळीकडे आपण बघतो तशी ती इथेही आहेतच.शिक्षण, वैद्यक,

कायदा व तंत्रज्ञानापासून राजकारणापर्यंत आणि शेती, मजुरी, कुटुंब, कला-संस्कृतीपासून ते उद्योगधंद्यांपर्यंत सर्व क्षेत्रात गोवेकरीण स्त्री हिंमतीने उभी राहिलेली दिसते.किंवा अगदी दुसऱ्या बाजूचं चित्र बघायचं तरी स्त्रीचं शोषण, अत्याचार, बंधनांपासून बलात्कारांपर्यंत आणि मोलमजुरी फसवणूक अन्याय व सर्व प्रकारच्या छळाबळांपासून ते व्यसन गुन्हेगारी वेश्याव्यवसायापर्यंत सगळ्या काळ्याकुट्ट गोष्टीही इथे वावरताना दिसतात.

इथली स्त्री इतर प्रांतांच्या तुलनेने बघितलं तर बाकीच्यांपेक्षा कांकणभर जास्त सुरक्षित, कणभर जादा सुखप्रद आणि तसूभर अधिक आनंदात जीवन जगते, असे माझ्या अवतीभवतीच्या विविध उदाहरणांवरून मी म्हणू शकते. मी गोव्यातल्या 'सत्तरी' या ग्रामीण तालुक्यात वाळपई या ठिकाणी गेली पंचवीस वर्षे आयुर्वेदिक प्रॅक्टिस करते. तसंच पणजी म्हापसासारख्या शहरी भागातही मी पेशंट्स बघते. ग्रामीण व शहरी दोन्ही भागांतील कामगारवर्गापासून उच्चवर्गीयांपर्यंत अनेक प्रकारचे पेशंट व त्यातही स्त्रिया व मुले माझ्याकडे अधिक प्रमाणात असतात. आयुर्वेदिक औषधोपचार देताना बाईचं घरदार संसार, जेवणखाण, कामाचं स्वरूप, सवयी, राहणीमान व समस्या या सगळ्याचंच 'हिस्ट्री टेकींग' होतं.अनेक घरांतल्या आजी, आई व मुलगी अशा तिन्ही पिढ्या माझ्याकडे तपासणीला येतात.एक स्त्रीडॉक्टर म्हणून त्यांची शरीरं, मनं व बुद्धी या तिन्ही कोनांतून मला समग्र स्त्रीजीवनाचं आरोग्य जवळून बघायला मिळतं.याच तीन पायऱ्यांवर इथल्या स्त्रीजीवनाचा एक उभा छेद/आलेख मी इथे मांडू इच्छिते.

❊ ***गोंयकारीण आजी –*** गोव्यातली आजीची पिढी बाकी सगळीकडे आहे तशीच कष्टमय जीवन जगलेली, जगत असलेली आहे.पण तरी ही देखणी समाधानी आनंदी आहे.कष्ट व संघर्षमय जीवन तिने मनातल्या गाण्याने लयदार करून टाकलंय.मध्यम बांध्याची ही आजी छान स्वच्छ चापून-चोपून नेसलेलं नऊवारी पातळ, गंगावन लावलेला आंबाडा, गळाभर काळे मणी घातलेली गोव्यात आजही बघायला मिळते. केसात चकमक कलाबतू घालून घरी तिने स्वत: गुतलेली (गुंफलेली)अबोलीची, शेवंतीची, गुलाबाच्या पाकळ्यांची, सोनचाफ्याची फाती (वेणी) असते. बकुळीचा, सुरंगीचा वळेसर असतो. केवड्याचं दुमडलेलं पिवळजर्द पान, मालीची केसरं (मरवा-सुगंधी तुळस) आंबाड्याच्या आकड्यात खोचलेली असतात. अगदीच नाही तर दोन जास्वंदीची फुलं, अनंत, करंडा (पिवळा फुफाटा) तगर असं काही तरी केसात 'माळल्या'शिवाय ती घराबाहेरच पडत नाही. ती आता कमरेत बऱ्यापैकी वाकलेली असते.पण तिने हे 'फुलण्याचं' व्रत आजवर जिवापाड जपलेलं असतं. (विधवा झाल्यावर मात्र ती हे सगळं वर्ज्य करते. अगदी साधी टिकलीही कपाळाला लावत नाही! कोरं म्हणजे कोरं कपाळ! आणि मग हे असं प्रत्येक विधवेने करावं असाही तिचा दुराग्रह असतो. नवरा गेला की सगळं संपलंच यावर ती किती काही सांगितलं तरी ठाम असते!) तिला झेपतंय तोवर नेहमीचं परड्या परसातलं, गुरावासरांचं कामधाम करते. कसले कसले उपासतापास आजही करते. 'न्हावून धुवून तुळशीला पाणी नि मगच चहाचा घोट' असा अनेक आज्यांचा आजवरचा जगण्याचा वसा असतो. शहरातली आजी छान पाचवारीतली, ड्रेसमधली, नीटस राहणारी, केसांचा बटवा घालून वर एखादं फूल माळलेली, दागदागिने घालून छानपैकी मुलाच्या फ्लॅटमधे राहते. कमी अधिक फरकाने याच प्रकारचं गोडतिखट, तुलनेने सुरक्षित जगते नातरांना सांभाळते.

आजीने खूप सोसलेलं असतं. ती अजूनही खूप सोसत असते. पण चिवट जिद्दीने मार्ग काढीत असते. इथे गोवा सरकारच्या 'दयानंद बांदोडकर स्मृती आधार योजने'सारख्या अनेक योजना ज्येष्ठांसाठी आहेत. दर महिन्याला त्या हक्काच्या शे पाचशे हजार रुपयांसाठी ग्रामीण भागात त्यांची भली मोठी रांग लागते. त्यात अर्ध्याहून अधिक विधवा स्त्रिया टेकत खुरडत उभ्या असतात. तिथून मग अनेकजणी तपासायला येतात. दमून थकून गेलेल्या असतात, पण कधी कुणी वैतागाचं नि नकारात्मक बोलल्याचं फारसं आठवत नाही. बायकांचा जन्म आणि त्यामुळे हे भोग भोगायचे नि पुढे जायचं हे सगळ्याचं त्यांनी काढलेलं उत्तर असतं.

कधी कंबर घट्ट झालेली, कधी गर्भाशयाची पिशवी बाहेर आलेली, कधी टीबी, कॅन्सर, शुगर, प्रेशरसारखे आजार, कधी न कळलेला मोतिबिंदू, कधी लज्जेमुळे नाजूकजागच्या काट्याचा नायटा झालेला, कधी हातावर कोयता बसलेला, कधी गाई-बैलाने मारलेलं, कधी मुलाने मारलेलं, कधी नवऱ्या-मालकाची या वयातही जुलुम जबरदस्ती, कधी विमापॉलिसीवाल्याने फसवलेलं, कधी सोनाराने लुबाडलेलं, कधी-कधी मुलं नातरं दुरावल्यावर तपासण्याच्या निमित्ताने मन मोकळं करायलाच ती माझ्याकडे आलेली असते! गोंयकारीण आजी ही अशी कष्टांची वाट चालतेय, त्यातूनच धाल्याच्या मांडावर फुगड्या घालतेय, गाणी म्हणतेय, फुलं माळतेय, जत्रा काल्यात भक्तिभावाने दशावतारी नाटकं बघतेय, आता पूर्वीसारखी मैलोन्‌मैल चालत न जाता भाड्याची मोटरसायकल करून (इकडे रिक्षासारख्या भाड्याच्या मोटरसायकल करतात) घरी जातेय, आमदाराच्या वाढदिवसाच्या पार्टीला पणजीत जातेय, मतदानाला पाठवलेल्या गाडीत बसून बटण दाबून येतेय, सणवार चवथ, दिवाळी हौसेने व रितीरिवाज श्रद्धेने साजरे करतेय. दारात रोज सकाळी रांगोळी, संध्याकाळचा तुळशीकडे दिवा ती कधीही चुकवत नाही. बाळंतिणीला ती अजूनही शेक-भाज करतेय, मुलाला तेल- आंघोळ नि बाळकडू पाजतेय, बाळाला अंगावर पाजायचा आग्रह धरतेय. तिच्या पानाच्या चंचीत, पिशवीत आता साधा फोन असतो. ती आता टिव्ही मालिकांमधे रंगून जातेय. मुलं-सुना-नातरांच्या हाताला स्मार्ट फोन चिकटलेले बघून ती काळजीतही पडतेय. पोरं गाड्या घेऊन सुखरुप घरी यायची वाट बघते आणि आता बदललंय सगळं एवढंच म्हणत ती देव-देवचारांची नित्य आठवण करते, नेम वसे पुरे करून 'घराची राखण'करते. शहरातली आजीही कमी अधिक फरकाने याच प्रकारचं गोडतिखट, तुलनेने सुरक्षित जगते आहे. नातरांना सांभाळते आहे. आपल्या वाट्याचं

आयुष्य जमेल तेवढं सुंदर करत गोंयकारीण आजी जगण्याची हिरवी वाट अशी विनातक्रार व श्रद्धेने चालते आहे.

❊ ***गोंयची मालन*** - गोव्याची तरुण स्त्री खूप उत्साही, थोडीशी लाजरी बुजरी, भिडस्त- संकोची, उगीचच थोडी घाबरट ('नाका बाये.. माका भय दिसता' हे वाक्य कायम कानावर पडतं.) जराशी खोडकर, हुशार, शांत, संयमी, कष्टाळू आहे. उगीचच थोडी घाबरट आहे. सणाच्या वेळी पाळी येईल म्हणून वाटणाऱ्या भितीपासून ते रात्रीचा प्रवास करताना वाटणाऱ्या भितीपर्यंत 'नाका बाये.. माका भय दिसता' हे वाक्य तिच्या तोंडून इथे कायम कानावर पडत असतं. ती तक्रारखोर चिडचिडी आक्रमक नाही. तिला निवांतपणे काम करणं आवडतं. तशी ती बऱ्यापैकी नवऱ्यावर विसंबून भरवशाचा संसार करते. खाऊन-पिऊन सुखी असते. घरातला बागेतला भाटातला कामधंदा करून, जेवणखाण सांभाळून, संसार नोकरीत सुशेगाद जगत असते. आता नोकरदार स्त्रिया गाड्या चालवतात. आर्थिक उलाढाली करतात. उद्योगधंदे हिकमतीने करतात. महिला मंडळं बचतगटांतून पाककला, रांगोळी, फुगडी, भजनं इत्यादी नानाविध सरकारी स्पर्धांमधे भरघोस बक्षीसं मिळवतात. मतदानाच्या वेळी शिलाईमशीन, साड्यांपासून दागदागिने, गाड्या बंगल्यांपर्यंत सगळी बक्षिसी मिळवतात.(काही चांगले अपवाद वगळता) राखीव महिला जागांवर निवडणुका लढवतात. जिंकतात नि मग त्यांचे नवरेच पुढचं सगळं कामकाज बघतात. काजू कारखाने, रेती उद्योग, बागायती, मोठ्या कंपन्या, शाळा, सहकारी बँका, दुकानं, आस्थापनं असं बरंच इथे नोकरीसाठी त्यांना खुलं असतं. इतर प्रांतांच्या तुलनेने थोड्याफार कष्टाने, जास्त संघर्ष न करता त्यांच्या पर्समधे चार पैसे खुळखुळत असतात व त्या आत्मनिर्भर असतात. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, क्रीडा, कला, साहित्य, धर्म, संस्कृती, प्रसारमाध्यमं राजकारण, समाजकारण, अशा सर्व क्षेत्रांत त्या अग्रस्थानी वावरतात.

नवीन अगदी तरुण आया मात्र जरा अस्वस्थ असतात. मुलांनी केजीत जाऊन फाडफाड इंग्रजीत बोलावं, नव्या फॅशनचे कपडेलत्ते, घरात फर्निचर सामान टापटीप. दागदागिने हौसमौज रग्गड, टू व्हीलर, फोर व्हिलर गाडी, आडखेड्यातल्या गावात जुनं घर पाडून बांधून घेतलेला पॉश बंगला व एकूण तिचं दिसणं-करणं एकदम पॉश असतं, पण सणवार, परंपरा, चालीरिती तशाच्या तशा सांभाळणं मात्र जुन्या पिढीसारखंच ती करते. उच्चविद्याविभूषित तरुण स्त्रिया शहराचा मार्ग धरतात, पण एखादा दिवस गावी येऊन पारंपरिक सणावाराचं असेल तेवढं करून कुलधर्म, कुलाचार जपून आपल्या परीने घराची 'राखण' करतात.

स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार, व्यसनाधीनता, नैराश्य, आत्महत्या, गुन्हेगारी, बारबाला हे अपप्रकार गोव्याच्या ग्रामीण भागात तुलनेने कमी प्रमाणात दिसतात. शहरी व समुद्रकिनारी भागात हे प्रमाण बरेच आहे. वेश्याव्यवसाय आहेत. कॅसिनोंमधे व अन्य ठिकाणी चालणारे गैरप्रकार आहेत. यात इथली तरुण बाई कधी स्वत:च्या इच्छेने, कधी अनिच्छेने सहभागी असते. ग्रामीण भागात ते अजून काही ठिकाणी देवाच्या नावे चालते किंवा आता त्याचे रुप बदललेले छुपे बार, अड्डे आणि व्यवसाय आहेत. बलात्कार अत्याचारही सार्वभौम सत्ता मिरवताहेत. विभक्त कुटुंबांची संख्या वरचढ आहेच. पण लांब राहूनही सणवार एकत्र व गावी एकत्र कुटुंबात साजरे करण्याचं प्रमाण मात्र खूप आहे ही त्यातली समाधानकारक गोष्ट! तुलनेने घटस्फोटही अगदी पावला-पावलावर दिसत नाहीत. मुलांच्या एकाकीपणाचे प्रश्न इथे अजून फार भीषण झालेले नाहीत. फक्त शहरे या प्रश्नांखाली भरडली जाताहेत. गावे त्यामानाने माणसामाणसांना व नात्यांना जोडून घेत सुरक्षित आहेत.

इथल्या तरुण स्त्रीचं किमान पदवीधर असण्याचं प्रमाण तुलनेने कमी आहे किंवा शिकली-सवरली असली तरी ती लग्न झाल्यावर फक्त एक पारंपारिक गृहिणी झालेली व घरसंसारात छान रमलेली दिसून येते. मासिक पाळीच्या तक्रारी, वंध्यत्व, ॲनिमिया व कॅन्सरसारख्या आरोग्याच्या वाढत्या समस्या आहेतच. कुटुंबनियोजनाकडे पुरेसे लक्ष नसल्यामुळे, नको असताना गर्भधारणा व त्यामुळे गर्भपाताचं प्रमाण खूप आहे. ग्रामीण भागात आजही सर्वत्र सर्व जातींमधे 'मासिक पाळी' चार दिवस काटेकोरपणे पाळली जाते. सणावाराला पाळी पुढे जायच्या गोळ्यांसाठी तरुण बायकांची रांग लागते. तरी गोवा सरकार स्त्री आरोग्याच्या, गर्भवती स्त्रियांच्या आरोग्याच्या कडधान्य वाटपासारख्या बऱ्याच योजना राबवतं त्याचा बराच फायदा होताना दिसतो.



तुलनेने कमी संघर्ष, कमी धकाधकी,

दगदग धावपळ, कमी स्पर्धा व जास्त आरामदायी निवांत सुखाचं जिणं इथली तरुण मालन जगते आहे ही थोडी आश्चर्याचीच गोष्ट म्हणावी लागेल.

※ ***गोव्याची चेडवां*** – म्हणजे इथल्या मुली वरील दोघींसारख्याच देखण्या उत्सुक हौशी आहेत, चपळ तरतरीत आहेत तशा आताशा जरा आळसावलेल्या लाडावलेल्या एकुलत्या पोरी म्हणून जरा लठ्ठपणाकडेही झुकलेल्या दिसताहेत. पप्पा, मम्मा, चाचा, मामा, दीदी, भय्या, भाभी, आजी-आजोबा यांच्याकडून भरपूर कोडकौतुक करून घेताहेत. सणावाराला मौजमस्ती करताहेत. मस्त फॅशनचे शॉर्ट्स वगैरे कपडे दागदागिने प्रसाधनं फॅशन्स खरेदी, देशविदेशात फिरणं, खाणंपिणं, शाळा कॉलेज विद्यापीठात संशोधनं नोकरी पैसा, भरपूर अभ्यास व नंबर नि पारितोषिकं मिळवताहेत. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकताहेत. न्यून-अधिक दोन्हीही गंड आहेत. गोव्याबाहेर शिकायला जायला नको, शक्यतो घर सोडून कुठे राहायची तयारी नाही, असंच चित्र दिसतं. एवढंच कशाला अनेक पोरी लग्नाची वेळ येते तेव्हा नवरा गोव्यातलाच हवा याबद्दलही आग्रही असतात. प्रेमविवाह, आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांचं प्रमाणही बरंच आहे. कुमारिकांच्या गर्भधारणा गर्भपात व कुमारी मातांचे प्रमाणही बरेच आहे.

मुलीच्या आयुष्यातला 'लग्न' हा महत्त्वाचा टप्पा प्रचंड डामडौलात इथे साजरा होतो. पाटल्या, बांगड्या, गोठ, तोडे, नेकलेस बाजूबंद, बिंदी, नथ, कानातले असं मुलीला आणि अंगठी, चेन, ब्रेसलेट जावयाला हे कमीतकमी सालंकृत कन्यादान! किमानपक्षी एवढे दागिने सर्व नातेवाईक मिळून मुलीला घालतातच. नात्यातल्या भाच्या पुतण्या इत्यादी सर्व मुलींची लग्ने सगळे मामा, काका, मावश्या आत्ये सर्वजण एकेक दागिना घालून लावून देतात. शिवाय संसाराची सगळी भांडीकुंडी शिवण भरतकाम विणकाम, फर्निचर, कपाट, सोफा इत्यादी यच्चयावत सामान मुलीला देतात. हे सगळं इथे सगळ्या जातिधर्मात सर्व थरांत अलिखित नियम असल्यासारखंच चालतं. मुली लग्नाआधी नोकरीचाकरी करून आपल्या लग्नाची ही तयारी करून बापाचा भार हलका करतात. त्यात गोवा सरकार 'लाडली लक्ष्मी'सारख्या योजनांमधून मुलींना लग्नाच्यावेळी लाखभर रुपये मदतनिधी देतं. मुलींच्या शिक्षणासाठीही अनेक सरकारी योजना आहेत.सुरक्षिततेबद्दल बोलायचं तर गोवा हे जगभरासाठी पर्यटनक्षेत्र असल्यामुळे सुरक्षेचा मुद्दा मात्र थोडा नाजूक आहे. मुलींनी फार सजग सतर्क राहण्याची परिस्थिती अवतीभवती आहे. मुलींच्या शोषणाचे अनेक गैरप्रकार किनारपट्टीवर चालतात. त्यातून स्त्री गुन्हेगारी, व्यसनाधीनता, नैराश्य, आत्महत्या हे प्रकार वाढीस लागतात हेही कटु वास्तव आहे.

मुस्लीम ख्रिश्चन स्त्रीजीवनही थोड्याफार फरकाने असंच आहे. मुस्लीम स्त्री काळ्या बुरख्यात आणि ख्रिश्चन स्त्री थोडी जास्त मोकळी पण धार्मिक प्रथा परंपरा त्याही जिवापाड जपतात असे दिसते. त्यांचं जीवन तुलनेने निवांत आहेच.

गोव्याच्या समृद्ध निसर्गाने इथे स्त्रीच्या पदरात भरभरुन सौख्य घातलंय. स्त्रीनेही ती समृद्धी आजवर संचित म्हणून जपलीय.

गोव्याच्या संस्कृतीचं आदरातिथ्य स्वागतशीलता दिलदारपणा, निवांतपणा ही वैशिष्ट्ये आधी घरातल्या बाईची आहेत व म्हणूनच तो प्रभाव घरादारावर समाजावर दिसतो आहे. म्हणून 'आनंदयात्री' बनून जगण्याची वाट चालणं हा देखणा वसा गोमंतकीय स्त्रीने फक्त गोमन्तकालाच नव्हे तर समस्त मानवजातीलाच दिला आहे असंच मला म्हणावंसं वाटतं..

**– अनुजा जोशी**
भ्रमणध्वनी : ७७२१८१०९८६
dr.anupamj@gmail.com

## मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०२०

# वैदर्भीय स्त्रीजीवन



संघमित्रा खंडारे

**डोंगराएवढ्या दु:खाच्या छाताडावर पाय ठेवून नाउमेद न होता सामाजिक, कौटुंबिक, मानसिक पातळीवरच्या संघर्षाशी जिद्दीनं झुंजण्याचं, संकटांशी दोन हात करण्याचं सामर्थ्य विदर्भातल्या मायमाऊलींच्या मनगटात आहे.**

'**व**ऱ्हाड सोन्याची कराड'(कराड म्हणजे किनारा) असे वऱ्हाडी प्रदेशाचे वर्णन केले जाते. तसेच 'विदर्भ विषय: सरस्वती जन्मभू:' अशी ज्या वऱ्हाडाची वाङ्मयीन व भाषिक महतीही गायिली जाते तो वऱ्हाड म्हणून अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम ह्या पाच जिल्ह्यांना संबोधले जाते.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारा शूरवीर, धाडसी, पराक्रमी शिवछत्रपती घडवणाऱ्या राजमाता जिजाऊ बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा या गावचीच लेक.आणखी बरंच मागे गेलो तर कृष्णासारख्या संपूर्ण पुरुषाला कौंडिण्यपुरातील रुक्मिणीसाठी यावं लागलं, हा तिचा, तिच्या बुद्धीचा, पराक्रमाचा गौरवच नाही का?

वऱ्हाडातील स्त्रीचा पारंपरिक पेहराव : नऊवारी लुगडं आणि चोळी. पुढे पुढे 'भोलांडी साळी' म्हणजेच साडी झाली. आता तर सलवार, मिडी, जीन्स अन् काहीबाही शहरातील मुलींसारखंच. तरी तिची नाळ मात्र 'जिभिले दाताखाली दाबाव लागते', 'खायाले तं डोंगरई नाई पुरत', अशा काटकसरी मायमाऊलीशी, 'लात मारीन तथी पानी काळीन' अंगात अशी धमक असणाऱ्या, 'घरी वावरधुरा पाह्यजेच' त्यासाठी पै-पै जमवून एक बकरी, तिच्यापासून दोन, तीन, चार... असं धन वाढवून जमिनीचा एखादा तुकडा विकत घेणाऱ्या अर्थतज्ज्ञ माऊलीशी जुळलेली आहे.

*'काय व्हतं बुहाऱ्यायच्या घरी लगन हुन आली तं? घर तं नोतं राह्याले. काऊसाचं घर...काय व्हतं सासऱ्याच्या हातचं? पिशावानी धावलो, दाताचं पानी गिवलं, मस्ती नाई केली खायाची ना लेया नेशाची...' मागचे दिवस आठवून डोळ्यात पाणी आणत असं मोठ्या अभिमानानं सांगणाऱ्या आमच्या मागच्या पिढीच्या शिलेदार हयात आहेत.*

भल्या पहाटे उठून तिची सडा सारवणाची लगबग, रंदावनाच्या कौलातून धुपटाचे (धुराचे) काळे, करडे ढग (वृंदावन या शब्दाचा अपभ्रंश पण तो स्वयंपाक घरासाठी वापरतात) गायी म्हशीचं चारापाणी करणं,कोण्या माऊलीची शिदोरी घेऊन वावरात (शेतात) जायची गडबड असं मनोहारी चित्र दिसते. गायी म्हशी असलेल्यांच्या घरभर दुधदुभत्याचा, पहाटेच काढलेल्या ताज्या लोण्याचा एक आंबट गोड सुगंध भरुन राहिलेला असतो.

डोईभर पदर घेऊन सडासारवणापासून घरची मग शेतातली कामं करून येताना जित्राबांसाठी गवताचा भारा डोक्यावर घेऊन येतानासुद्धा तिच्या चेहऱ्यावर त्रासाची एखादी वळीही दिसत नाही.

दिवसभर शेतीमातीत राबूनही अशी भरल्या हातानं येताना ती इतकी प्रसन्न, आनंदी, समाधानी दिसते जशी लक्ष्मीच! वऱ्हाडात म्हणूनच की काय बायकोला लक्षुमी/लक्षिमी असं संबोधतात. जसं : *सायेबरावची लक्षिमी भलकशी साजरी शेव्व्या (शेवया) ओयते (ओवते).* शेवयांवरून आठवलं शेतीतली कामं संपली की पापळकुट, सरगुंडे, मणी, मूगवड्या, पापड या साऱ्या वयवटासोबतच (वयवट= वाळवण) बटोये हा नाजूक, नजाकतीनं बनवायचा, कौशल्य व सफाई हवी असलेला वाळवणाचा प्रकारही बायका मोठ्या हौशीनं करतात. हे जिन्नस एकत्र येऊन करतात. गोष्टी, कानगोष्टी, दुखणं, गाऱ्हाणं सांगण्याची ही एक संधीच! हे सगळे पदार्थ नव्या पिढीतील लेकींना तयार करून विकणं हा गृहउद्योग सुद्धा त्या सांभाळत आहेत.

शेती कसताना त्या आपल्या मुलामुलींनी शिकावं यासाठी जिवाचा आटापिटा करतात.

नवऱ्याला देव मानणाऱ्या त्याच्या मर्जीत राहाणाऱ्या बायका इथे आहेत तशा दारु पिऊन आलेल्या नवऱ्याला घराबाहेर काढणाऱ्या बायकाही आहेत. आयुष्यभर 'टमरेल' घेऊन गोदरीत जाणाऱ्या, सासू सासरे, घरातल्यांचा जाच सहन करणाऱ्या सोशिक बायका इथे आहेत, दारुड्या नवऱ्याचा संसार करणाऱ्या आहेत तर दारुड्याचा संसार सोडून स्वतःच्या हिंमतीवर मुलांना शिकवणाऱ्या बायकाही आहेत.

'काट्टीच जंदली...' केवळ मुलीला जन्म दिला म्हणून ज्या सासू सासऱ्यांकडून अवहेलना, त्रास सहन केला त्याच सासूसासऱ्यांची म्हातारपणात सेवा करणाऱ्या स्त्रिया देखील आहेत.

वऱ्हाडची भूमी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगे महाराज यांचा पदस्पर्शाने पावन व इथले लोक विचारांनी विवेकी झाले आहेत.

*इद्या मोठं धन हाये*
*जेवनाचं ताट मोळा*
*बायकोले लुगळं कमी भावाचं घ्या*
*मोकळ्या घरात राहा*
*इवायाले पावनचार करु नोका, धकू द्या*
*पन लेकराले शिकशन देल्याबिगर ऱ्हाऊ नोका*

*इद्या मोठं धन हाये...*

असं ओठातून नाही तर पोटातून सांगणाऱ्या संतांच्या विचारांचा पगडा या मायमाऊलींवर आहे.

अकोला जिल्ह्यातील अकोट, अंजनगाव तालुक्यात बारी समाज मोठ्या प्रमाणावर आहे. बारनी बायका गोऱ्या, गोमट्या, रुपवान पण कष्टाळू, काटक, मेहनती, शेतीमातीत रमणाऱ्या, राबणाऱ्या मायमातीच्याच लेकी आहेत. कांदा, रताळं, मिरची, वांगी, कोबी, गहू, कापूस अशी सारी बागायती पिकं हे घेत असले तरी विड्याच्या पानांची शेती म्हणजे नागवेलीच्या उत्पादनाचं अलिखित पेटंट ह्याच समाजातील बायकांकडे आहे! नागवेलीची शेती केवळ स्त्रियांच्याच भरवश्यावर केली जाते. उत्पादन पुरुषांनी बाजारपेठेत जाऊन विकावं कामाची अशी सरळ-सरळ विभागणी.



नागवेलीला ह्या बायका देवता मानतात. पण नागवेलीमध्ये त्या स्वतःलाही बघतात. नागवेली जशी वर वर, उंचच उंच वाढत जाते तशी बाई सुद्धा वर वर उंचच उंच वाढत जाते, म्हणजे प्रगत होते असं त्यांचा भाव आहे. मैत्रीणीला विचारलं, ''तुम्ही मासिकपाळी दरम्यान नागवेलीच्या मळ्यात जात नाही असं ऐकलंय, का?'' तिनं सांगितलं, ''देवता मानल्यामुळे नागवेलीची शेती श्रद्धेनं, भक्तिभावानंच करतात.''

देवतेला विटाळ होऊ नये म्हणून बाया मासिक पाळीच्या काळात नागवेलीच्या मळ्यात जात नाहीत.

स्वच्छता वगैरेच्या दृष्टीने पूर्वीपासून चालत आलेली ही रीत शिकल्या सवरल्या बायकाही मोडायला धजत नाहीत. 'बघू तरी काय होते?' अशी वैज्ञानिक धाडसी कृती कोणीच करत नाही.

बारी बायका आपलं नाक टोचून घेत नाहीत. कारण त्यांनी नागदेवतेला आपली नथ देऊन टाकली आहे. शतकातही कोणी मुलगी नाक टोचून घेत नाही. ही अंधश्रद्धा आहे असं आपण म्हणू पण त्यांचं हे भावसमर्पण खूप गहिरं आहे. नाक दिलं म्हणजे आमची अस्मिता दिली.अस्मितेशिवाय जीवाला, जगण्याला अर्थ तरी काय?...

लोकगीताच्या या ओळीतून त्यांचा भक्तिभाव दिसून येतो.

*नागवेली गं बाई*
*तू बाऱ्याच्या मयात*
*न्हानुन अंगारा आनीन*
*केयीच्या पानात*
*नागववेली गं बाई*
*तू आमची माय*
*कृपा कर जरा*
*तुले नथ देली हाय*
*नागवेली गं बाई*
*तुये पान हिरवेगार*
*बंधू खाते पान*
*त्याची चोच लालेलाल*

नागवेलीच्या हिरव्यागार मांडवाखाली दुर्बिणीतून पाहिल्यावरही कचरा, काडी दिसणार नाही, की पिवळं, वाळलं पानसुद्धा दिसणार नाही. सगळं कसं स्वच्छ! काळ्याशार भूईच्या कॅनव्हासवर कोणी सुंदर, सुबक हिरवी कॅलिग्राफी केलीय जणू!

इथल्या स्त्रियांच्या सुखदुःखाच्या व्याख्याही वेगळ्याच.त्या सुखानं उतत मातत नाहीत न दुःखानं पिचत खचत नाहीत.

*'जाऊ दे ना...लव्हू नोको. गंजीपत्ता तं नाई खेवत'*
*'जाऊ दे ना, दारु तं नाई पेत...'*
*किंवा*
*'करू दे ना काय करते न् कितीक देते 'तिले'...*
*रातच्याले तं येते ना तुह्याचजोळ?'*

असं नव्या सूनवायरीला समजावणारी एखादी बुढी दिसली की डोक्यावरच्या चांदीची न् चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांची किंमत समजते.

निसर्गाचा बेतालपणा, कर्जात बुडालेली शेती, सर्व बाजूंनी पराजय झालेल्या इथल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा रोज वाढत जाणारा आकडा आणि लग्न होण्याच्या वयात विधवा होण्याचं दुःख मनात खोल पुरवून मुलं बाळं, सासू सासरे साऱ्यांची माय होऊन उघड्यावर पडलेला संसार सावरण्यासाठी जमिनीचा तुकडा कसणारी आमची बहिण पाहिली किंवा दोन लेकरं पदरात टाकून वावरात जाऊन एंड्रीन पिऊन स्वतःची सुटका करून घेतल्यानंतर त्याच्या बावीस वर्षांच्या बायकोला, आता कोनासाठी भोव्व्या (भुवया) कोरतं? कोन पाह्यते तुले?कायले पाह्यजे पावडर?...' असा सुरु झालेला वनवास पाहिला की आम्हाला 'नवऱ्यानं फिरायला नेलं नाही, वाढदिवसाला गिफ्ट दिलं नाही', अशी दुःख होत नाहीत.

डोंगराएवढ्या दुःखाच्या छाताडावर पाय ठेवून नाउमेद न होता सामाजिक, कौटुंबिक, मानसिक पातळीवरच्या संघर्षाशी जिद्दीनं झुंजण्याचं, संकटांशी दोन हात करण्याचं सामर्थ्य इथल्या मायमाऊलींच्या मनगटात आहे.

त्यांच्या कामात, वागण्यात, वावरण्यात रुबाबदारपणा, ठसकेबाजपणा, रांगडेपणा आहे तसा बोलण्यातदेखील पुरुषीपणा आहे. 'मी करतो, सांगतो, जातो' अशी क्रियापदं त्या बोलतानाही

कदाचित त्याचमुळे वापरतात.

पुरुषांच्या बरोबरीने सगळीच कामं करत असताना, गावगाडा, गावचं शहरीकरण होत असताना गावपण, कुणबिकी टिकवण्याचं काम अतिशय निष्ठेने ती आजही करतेच आहे.

आमच्या वऱ्हाडातील स्त्री कंडक्टर, पोलीस, तलाठी, तहसीलदार, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, नर्स तसेच लेखन, अभिनय, गायन (वैशाली म्हाडे-भैसने ही हिंदी चित्रपटाची सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अमरावती जिल्ह्यातील खारतळेगाव या गावातील आहे) कलेच्या क्षेत्रातही स्वतःचा ठसा उमटवणारी ठरली असली तरी गावाशी अजूनही तिची नाळ तुटली नाहीय. पुरेसं आत्मभान येऊनही तिच्यात मागच्या पिढीकडून झिरपलेला सोशिकपणा, समंजसपणा जगण्यातील, कुटुंबातील, व्यवसायातील सगळं विस्कटलेपण सांधून ठेवते.

जिवाला जीव देणारी, जीव ओवाळून टाकणारी, कोणी अब्रूवर हात घातला तरप्रसंगी जीव घेणारी सुद्धा ती आहे.

माझ्या लहानपणी अशाच कोण्या शालिनीचा पोवाडा ऐकलाय!

वऱ्हाडी बोलीभाषेच्या जतन आणि संवर्धनात तिच्या जात्यावरच्या ओव्या लोकगीतांचा महत्त्वाचा वाटा आहे. तिच्या भावभवनांचं प्रकटीकरण अशा लयबद्ध, ओरखडा न आणणाऱ्या शब्दांत करणारी ती आद्यकवयित्रीच आहे.

सासरवाशिणीवर सगळ्या कामाचीच जबाबदारी. त्यामुळे तिला भल्या पहाटेच उठावं लागतं.

*सासूरवाशिण वं बाई झोपीची लह्यरी*
*कोंबळा देते बाग, साताजल्माचा वयरी*
*सासरा माहा देव, सासू माही पाराबती*
*बावाजीनं देलं मले भोळ्या शंकराच्या अती (इथे)*

असं छान सासर असताना घरातील दीर, जेठ, जेठानी यांचंही कौतुक ती करते-

*देर भावजई आपून चला जाऊ बजाराले*
*नक्खी सोभे धोतराले, जरी माह्या पदराले*
*(नक्खी -नक्शीदार किनार/काठ)*
*बाई देरान्या जेठान्या ,एका गोठानाच्या गायी*
*देरानीले माह्या बोलन्याचा राग नाई*
*जाऊ देरान्या दोघीईचं, नाई कोनतं गुपीत*
*काचाच्या रंदावना,नाई केली आळभीत*

(रंदावन-वृंदावन या शब्दाचा अपभ्रंश. इथे स्वयंपाकघर या अर्थानं)

असं सगळं सुरेख असतानाही तिच्या मनातून माहेराची आठवण काही जात नाही. तिच्या वेळी निरोपाची/भेटीची पत्राशिवाय कोणतीच साधनं नव्हती. मग ती तुळशीलाच माय म्हणते.-

*माय म्हतल्यानं बाई माह्याशी बोलली*
*गंगेच्या पान्यानं दारी तुयस खुलली*

कधीतरी या जिवीचं त्या जिवीला कळते आणि मायच तिच्या भेटीला येते.

*कापूस येचतो, पऱ्हाटी धरून*
*माऊलीचा बोल, ओयखला दुरून*

कधीतरी माहेराच्या भेटीसाठी आतुर झालेली ती नियोजन केल्यासारखे स्वतःशीच बोलते.

*लोकं जातीन जतरी (जत्रेला)*
*मी वं जाईन माहेरी*
*भाऊ भावजय माही*
*हाये जतरा दुसरी*

सारी जत्रा, गर्दी एकीकडे न् माहेर, माहेरची माणसं एकीकडे!

माहेरच्या ओढीनं पायांपेक्षाही वेगवान धावत सुटलेलं तिचं मन गाते-

*दुरुन दिसते, माह्या माहेराची माळी*

माळीवर हिर्वी साळी, भाऊ माहा मारवाडी (मारवाडी खूप श्रीमंत या अर्थाने)

*सासरवासानं डोईच्या झाल्या लटा*
*पानी टाकते पिता, इचरते माही माता*

सासुरवाशीणीची व्यथा, वेदना माहेरात कुरवाळली जाते.ती रिती होते. तिच्या संसाराच्या बरोबरीनं भावाचा संसार फुलतो आणि-

*निंबाच्या निंबोया, निंबाले झाल्या भारी*
*भईनीची आशा सोळी, भावाले झाल्या पोरी*
*मग*
*भाऊ म्हनते, रांध भईनीले भात*
*बोलली भावजय, साई पळल्या पेवात*

आता पेवात पडलेल्या साई निघणार नाहीत. भात शिजणार नाही... नात्यांतील हे विटलेपण घेऊन तुटलेल्या मनाने ती परत आपल्या मोडक्या संसारात जाते.

*एका वेड्या आशेनं-*
*देर माहे,जेठ माहे, अग्नीचे उभाये*

त्याईच्या दायित्यात माहा व्हईन निभाये (निभाव)

असं हसता-रडता संसारवेलीवर एक फुल येतं मग माहेराची ओढ थोडी कमी होते. लेकीच्या जन्म, तिच्या बाललीला, तिची कामं, तिला निजवणं...

*येनं झोपीबाई, खेवतमावत*
*लेकराले माह्या झोप लागू दे घोरत...*

आता ती तिच्या लेकीसाठी तिथे नांदत असते.

वऱ्हाडी बोलीत एक डौल,लयबद्धता, नृत्यभाव विलसताना दिसतो.या शब्दांच्या नादाने तिचा सांगितिक देह झंकारत राहातो. तर तिचं ठसकेबाज व रुबाबदार रुप तिला राजबिंड बनवतं. नाद, लय तर तिच्या देहात, रक्तात अनाहत वाहत असतो हे वर्णन जितकं तंतोतंत वऱ्हाडी बोलीला लागू होते तितकंच वऱ्हाडातील बाईलाही!

**– संघमित्रा खंडारे**
भ्रमणध्वनी : ९४२२०१६५३१

# कोकणातील स्त्रीजीवन

**कोकणातल्या स्त्रीचे जगणे सततच्या काबाडकष्टाचे असले तरीही ही स्त्री आनंदी आणि समाधानी आहे. तो तिचा मूळ स्वभाव आहे. तिच्या या जगण्याचा एक भाग असलेल्या इथल्या संपन्न लोकसंस्कृतीने तिच्या आतला आनंदाचा निर्मळ झरा कधी आटू दिलेला नाही.**

**रश्मी कशेळकर**



वैशिष्ट्यपूर्ण समुद्रकिनारे आणि गर्द हिरवे डोंगर अशी आजही ओळख असलेला कोकण इथल्या आदिमायेच्या सुना-मुलींच्या हातात निश्चिंत आहे.

निसर्गाधिष्ठित लोकजीवन असलेला हा कोकण प्रदेश डोंगराळ, खाचरांचा, खाजणांचा आणि सागरकिनारपट्टीलगतचा प्रदेश म्हणून विभागलेला आहे. या खाचरांच्या प्रदेशात आता तुलनेने जास्त नगरे वसली असली तरीही इथले लोकजीवन काबाडकष्टाचे आहे. स्त्री आणि पुरुष ही दोघेही बरोबरीने कष्ट करणारी असली तरीही कोकणातली स्त्री घरातल्या बापयांपेक्षा जास्त कामाटी आहे.

''कामान् माणूस सडसडीत ऱ्हवता. नदरेक् दिसांत तां काम उचलीत जायचा. तुजा-माजा करीत ऱ्हवायचा नाय; अशान् घराक् अवदसा खाव् न टाक्तली. ही माझ्या पिढीला मिळालेली शिकवण.

कष्ट, मेहनत याचे पारंपरिक संस्कार या स्त्रीवर्गावर अधिक दिसून येतात, यातही या संस्कारातला कडकपणा जास्त दिसतो तो स्त्रीच्या बाबतीत.

''जरा वाय् च टकली टेकतंय.'' इतकीच तिची दुपारच्या विश्रांतीची गरज आजही आहे आणि ती गरज भागतेच असे नाही.

कोकणातल्या डोंगराळ प्रदेशात खूप कष्टाने नाचणी, वरी सारखे घ्यावे लागणारे पीक, आता शिल्लक राहिलेल्या अल्पशा जंगल प्रदेशातून मिळणारे उत्पन्न; जंगले तोडून तिथं केलेली आंबा, काजूची लागवड आणि यातही कोकणाबाहेरच्या लोकांच्या मालकीचे अधिक असलेले इथले बागायती -डोंगर, निसर्गाच्या लहरीवर चालणारी खाचरातली भातशेती आणि दर्यातील मासेमारी या सगळ्याचा परिणाम इथल्या स्त्री जीवनावर झालेला दिसतो. कोकणातली स्त्री घरातही आणि घराबाहेरही राबत असते. अभिजन समाज आणि बहुजन समाज असे सोयीसाठी म्हणून विभाग केले तरीही ती राबतानाच दिसते. नोकरी करून घरची शेती-बागायती सांभाळणारी स्त्री इथे आहे. यापूर्वी ती चाकरमानी पुरुषावर अवलंबून होती आता मात्र ती स्थिती बदलताना दिसतेय. मुंबईत काही नाही हे या कोकणातल्या माणसाला कळायला लागले आहे आणि कोकणरेल्वे आल्यानंतरच्या काळात म्हणजे गेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या काळात अनेक लोक आपल्या मूळ गावाकडे परतायला लागले आहेत.

कोकणातली स्त्री मला आज अनेक रूपात दिसते त्यात आताचे तिचे रूप भीषण पाणी टंचाईला तोंड देणारे अतोनात हाल सोसणारे आहे. मग ती शहरातली असो वा खेड्यातली. भरपूर पावसाचा प्रदेश असून सुद्धा पाणी साठवण्याचे, पुरवठ्याचे नियोजन नसल्यामुळे उन्हाळा सुरू झाला की टँकरच्या प्रतीक्षेत असणारा हा कोकणप्रदेश, अशी याची आताची ओळख इथल्या स्त्रीच्या हालअपेष्टांशी थेट संबंधित आहे. पाण्यासाठी वणवण करणारे डोंगराच्या पायथ्याचे गाव, डोंगरगाव आणि त्या वाडीपर्यंत न पोचणारा रस्ता आणि म्हणून टँकरही. तीन-तीन दिवस पाणी न मिळणारी गावे आता इथे आहेत आणि यांची संख्या वाढत चालली आहे. त्याच वेळी शहरात होणारा पाण्याचा अपव्यय आणि अतीखोल खोदल्या जाणाऱ्या खाजगी बोअरवेल्स यामुळे पाण्याची नासाडी होतेय, शिवाय पर्यावरणाची हानी होताना दिसते आहे. कोकणपर्यटनामुळे ऐन उन्हाळ्यात जाणवणारी पाण्याची कमतरता हे शहरातल्या स्त्रीचे हाल करणारे जीवन येथे आहे. मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असलेली कोकणातली अजागळ शहरे इथल्या स्त्रीचे स्वास्थ्य बिघडवत आहेत. या पाणीप्रश्नाशी तिचा झगडा आजही चालू आहे. कोकणाचा कॅलिफोर्निया करण्याच्या घोषणांनी हे भाबडे कोकण हुरळूनच गेले आहे. आज कोकणाला गरज आहे ती जलसाक्षरतेची. या समस्येसाठी इथली स्त्री उत्तर शोधेल आणि तो शोध सुरू झाला आहे. यातही भविष्यातले आशादायी चित्र काही गावात दिसतेय ते म्हणजे जलदूत म्हणून कार्य करणाऱ्या स्त्रिया इथे आहेत.

जिवट-चिवट इथली स्त्री कष्टाला ऐकणारी नव्हे! हा गुण या कोकणचा. त्याच्या रक्तातला. तिचा 'घो' चाकरमानी होता तेव्हाही ती कणखर होती आणि आज समस्या बदलल्या तरीही ती डगमगलेली नाही . आदिमायेचे वरदान घेऊन आलेली इथली स्त्री आपल्या घराच्या पाठीशी आजही भक्कम उभी आहे ती तिच्या अत्यंत काटकसरी स्वभावामुळे.

या वर्षी निसर्गाने भरभरून दिलेय. पुढल्या वर्षी तो काय करतोय हे कुणी सांगावं? या कृषी उत्पन्नावर भरवसा ठेवून चैन करू

नकोस. या वर्षीचे पीक किंवा पैसा पुढच्या वर्षीपर्यंत राखता आला पाहिजे. आहे ते पुरवून खा. मातू नकोस. या अनुभवातून आलेल्या शिकवणीनुसार ती वागत आली. यात ती कंजूष झाली, चिक्कुरडी झाली, हिमटोळी झाली पण तिचं घर कधी कर्जबाजारी झाले नाही आणि तिच्या घरातल्या बाप्याने कधी आत्महत्या केली नाही. अनेक बँकाचे अहवाल असे सांगतात की कोकणी माणूस आता आता कर्ज काढायला शिकतोय आणि तो कर्जबुडवा नाही. यात सोसले आहे तेही या स्त्रीने! ती सोशिक आहे आणि सहनशीलही.

भात आणि मासे हे इथल्या किनारपट्टीच्या भागातले मुख्य अन्न आहे. डोंगराळ भागात त्या माशांची जागा कडधान्यांनी घेतली आहे. आजच्या घडीला सगळ्या भागात कोणतेही अन्न मिळत असले तरीही ते खरेदी करण्याची आर्थिक परिस्थिती नसणारी माणसेच अधिक आहेत. तरीही येथला माणूस आज पोटभर जेवतो. सगळ्यांचे जेवून झाल्यावर शेवटी उरेल ते घरातल्या स्त्रीच्या वाट्याला, असली परिस्थिती आता कोकणात राहिलेली नाही. ती गरीब, तो दरिद्री कोकणी माणूस हे चित्र आता बदलले आहे आणि तरीही ते सकस अन्न तिच्यापर्यंत पोचलेले दिसत नाही कारण तिच्यापर्यंत पोचली नाही ती अन्नसाक्षरता. कोकणातली स्त्री पाच आकडी पगार घेणारी असो किंवा मजुरी करणारी, दोघीही आज उपासमार सोसताहेत. त्यातही शहरात शरीराला अपायकारक असलेल्या अन्नावर पैसा खर्च होण्याचे प्रमाण जास्त आहे.

या ऑनलाइन शॉपिंगच्या काळात स्वत:च्या हातात पैसा असणाऱ्या कोकणातल्या स्त्रीचे राहाणीमान दर्जेदार म्हणजे कलाकाराला जगवणारे, छोटे रोजगार देणारे दिसत नाही. 'वापरा आणि फेकून द्या' या गोष्टींची आज चलती आहे आणि त्याला बळी ही सुशिक्षित, विचारी स्त्री कशी काय पडते आहे, याचे मला आश्चर्य वाटते. आपण कशाचे अनुकरण करतोय? भविष्यासाठी धनसंचय करताना आपण आपले आताचे राहाणीमान दळभद्री करून आपली पुढची पिढी ऐतखाऊ करत नाही ना ? कारण आता सातव्या वेतन आयोगानुसार पगार घेणारी ही स्त्री प्लास्टिकच्या जरीच्या, सिंथेटीक साड्या नेसत असेल तर कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याने, हाती जरीबुटी करणाऱ्या कलाकाराने कोणाच्या तोंडाकडे पहायचे? पूर्वीच्या गरीब कोकणच्या मानसिकतेत अडकलेली ही स्त्री आणि तिच्यासोबत ते कुटुंब असे दळभद्री, पैशाचा अपव्यय करणारे जीवन इथे अनेक ठिकाणी पहायला मिळते.

काळ बदलतो तशा समस्या बदलत असतात. आता कोकणात प्रमुख समस्या आहे ती रोजगाराची. मुली शिकतायत आणि नोकरी, व्यवसायासाठी त्या व मुलगेही आपली घरे सोडून बाहेर जाऊ लागले आहेत आणि काही वर्षांपूर्वी गाव सोडून बाहेर पडलेली माणसे त्या-त्या शहरी जीवनाचा उबग येऊन आता मूळ घराकडे परतत आहेत. कोकणातली बरीचशी गावे, शहरातील अनेक ब्लॉक्स यात वृद्धांची संख्या जास्त आहे. गावातल्या घरात हक्क सांगत कुटुंबात अचानक आलेली वृद्ध माणसे आणि घरातून बाहेर पडलेली तरुण मुले, या परिस्थितीशी जुळवून घेताना कातावलेली,



काळजीत असलेली इथली मध्यमवयातली स्त्री दिसत आहे. त्यातही मनुष्यबळाअभावी ओसाड पडलेली शेतजमीन हे तिच्या चिंतेचे कारण आहे.

त्या पूर्वजांनी अर्धपोटी राहून राखलेल्या जमिनींचा पैसा करणारी तरुण पिढी आता इथं दिसते. ज्या डिग्रीला रोजगार नाही ती केवळ प्रतिष्ठा म्हणून संपादन करणारी मुले/मुली इथे भरपूर आहेत. साग, आंबे, फणस, किंजळ, शेवरी यासारखी अनेक झाडे असलेले जंगल राखणाऱ्या त्या आदिमायेच्या तोंडात पेजेचे पाणी तरी गेले काय? आणि तिचा प्राण मागच्या पडवीत कधी गेला हे कोणाला माहीत? मागच्या पिढ्यांनी पैसा राखून ठेवता-ठेवता कोकणातले अनेक मुलगे घरकोंबडे, आळशी, ऐतखाऊ झाले. ह्या इथल्या मातीतल्या उदाहरणांचा तिने भाबडी माया बाजूला ठेवून विचार केला पाहिजे.

निसर्गाला देव मानणाऱ्या कोकणच्या या संस्कृतीत निसर्गाशी जुळवून घेताना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या सततच्या झगड्यामुळे इथला माणूस भांडखोर, संतापी वाटतो आणि त्यात स्त्री मानसिकरित्या खूप सहन करत असल्याने तिचा संताप उफाळून येतो. पण ती तितकीच लवकर शांत होते, समुद्रओहोटीच्या लाटांसारखी.

देवभोळेपणाबरोबरच देवस्की म्हणजे भूत-पिशाच्च मानणारी त्यांना पूजणाऱ्या, त्यांच्या यात्रा भरवून, त्यांना जेवायला वाढणाऱ्या अशा या अगम्य कोकणीसंस्कृतीत सर्व स्त्रियांना देवळांत मान आहे शिवाय यातली बरीचशी देवळे स्त्री भुतांची आहेत. अंगात वारे येणे/ अवसर येणे आणि तो देव किंवा देवी एका साडीने अगर डझनभर बांगड्यांनी खूष होणे हे इथे पहायला मिळत असे.

या कोकणी गावरहाटीत दलित समाजातील स्त्रीला मान आहे म्हणण्यापेक्षा तिची दातकसाळ बाधण्याची भिती आहे. नवबौद्ध होण्यापूर्वी महार हा या कोकणभूमीचा खरा मालक होता. घरात कोणी निवर्तल्यावर प्रथम त्याला कळवले जात होते. त्याने जागा आखून दिल्यानंतर क्रियाकर्म सुरू होत असे. दलित स्त्रियांचे मानपान काढण्याची प्रथा आजही अनेक घरात आहे. कोकणातल्या देवस्थानांत महार जातीला ढोल वादनाचा मान होता-आता तो दुसऱ्या जातीकडे गेला.

कोकणातल्या स्त्रीचे जगणे सततच्या काबाडकष्टातले असले तरीही ही स्त्री आनंदी आणि समाधानी आहे. तो तिचा मूळ स्वभाव



आहे. तिच्या या जगण्याचा एक भाग असलेल्या इथल्या संपन्न लोकसंस्कृतीने तिच्या आतला आनंदाचा निर्मळ झरा कधी आटू दिलेला नाही. कोकणच्या आदिम संस्कृतीतून तिच्या जगण्यात प्रवाहीत होत राहिलेल्या श्रद्धा, परंपरा, लोकगीते, कथा, नाट्य, सण, उत्सव ही इथल्या स्त्रीची अखंड  उर्जा आहे. कोकणातल्या गावरहाटीत दैवतांतील स्त्रीदेवतांना महत्त्वाचे स्थान आहे. कोकणात गावदेवीचा मोठा उत्सव म्हणजे इथे भरणाऱ्या यात्रा. शिमग्यात देवीच्या खास पालख्या आणि पालखीनृत्ये. लोककलेत देवीला असलेले स्थान हे इथल्या स्त्रीबद्दल आदर व्यक्त करते. फक्त हिंदूच नव्हे तर कोकणातल्या मुस्लीम स्त्रिया सुशिक्षित, कर्तबगार आहेत. काही ठिकाणी बुरखा वापरतात परंतु त्यांचा बाहेरच्या  जगाशी संपर्क आहे. श्रीमंत म्हणजे परदेशातून येणाऱ्या पैशावर अवलंबून असणारा मुस्लीम समाज आणि मासेमारी व्यवसाय करणारा मुस्लीम समाज असे ढोबळ दोन भाग केले तरी मुस्लीम स्त्रीच्या हातात व्यवहार आहे आणि घर सांभाळायचे चातुर्य तिच्याकडे आहे. दर्ग्यांचे उरूस दर्शन तसेच कोकणातील शिमग्याच्या देवीच्या पालखीची ओटी भरण्याचा मान त्या-त्या मोहल्ल्यातील मुस्लीम स्त्रियांना आहे. कोकणातल्या कुटुंबसंस्थेत स्त्रीला महत्त्वाचे स्थान आहे आणि ते खूप पूर्वीपासून आहे, स्त्री-पुरुष समतेचा प्रश्न इथे आला तो व्यसनी, अव्यवहारी सहचार्यामुळे आणि कौटुंबिक कलहामुळे. इथे स्त्री-पुरुष नाते परस्पर पूरक दिसते कारण इथली स्त्री शेती-वाडी, मुलं सांभाळत चाकरमानी नवऱ्याच्या पाठीशी उभी राहिली. तिच्या हातात पैसा होता आणि आजही आहे. तिने व्यवहार सांभाळला, धनसंचय केला. यात बऱ्याचदा ती कुटुंबप्रमुख झाली आणि तिच्या चिवट, कष्टाळू, सहनशील, सोशिक या गुणांमुळे ती सहज तरून गेली. कोकणातली अनेक घराणी कर्त्या पुरुषाच्या निधनानंतर स्त्रीने सांभाळलेली आहेत आणि अशी अनेक उदाहरणे पहायला मिळतात की ज्यांची सात-आठ मुले पन्नास-साठ वर्षांपूर्वी उच्चशिक्षित होती. कोकणातल्या संस्कृतीने स्त्रीला दिलेल्या या स्थानामुळे आणि तिने ते आपल्या व्यवहारचातुर्याने अबाधित ठेवल्यामुळे या प्रदेशात हुंडाबळी ही समस्या नाही. हा काळ हव्यासाचा आलाय, आता कायद्याचा धाक आहे. अनेकदा वेळप्रसंगी ती अन्यायाविरोधात लढताना दिसते.

कोकणातली स्त्री व्यवहारचतुर, बौद्धिक दृष्ट्या सक्षम म्हणून ओळखली जाते. आजच्या काळात स्त्री आरक्षणाचा हक्क मिळालेली ही सुशिक्षित स्त्री समाजातील अनेक उच्च पदे भूषवित आहे. ती मुंबई महानगरीशी आपसूक जोडली गेली म्हणून ती या आधुनिक काळात प्रगतिपथावर आहे. आज कोकणातल्या गावा-गावातल्या स्त्रिया स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करताना त्यांच्याकडे निर्णयक्षमता असल्याचे जाणवते. अनेक निर्णय घेताना आग्रही, प्रसंगी ती आक्रमक झाल्याचेही जाणवते.

सुशिक्षित आणि आत्मभान आलेली कोकणातील स्त्री यापुढे काळाची आव्हाने पेलू शकेल असा मला विश्वास वाटतो.

**- रश्मी कशेळकर**
भ्रमणध्वनी : ९४२१४४२३१६
rashmikshlkr@gmail.com


ग्रंथाली

# वंश-अनुवंश

**डॉ. हेमा पुरंदरे**

शब्दांकन
**उज्ज्वला गोखले**

**हार्ड बाउंड मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रुपये**
**पेपरबॅक मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रुपये**




विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, अनेक जनुकीय विकारांची संभाव्यता वर्तवणे आणि निदान करणे आता शक्य झाले आहे. भारतातही ह्या सुविधा उपलब्ध आहेत. ह्या सगळ्या विषयी जनजागृती व्हावी आणि सर्वांना चांगले आरोग्य लाभावे, असा ह्या पुस्तकाचा मूळ हेतू आहे.
डॉ. हेमा पुरंदरे यांनी गेल्या पंचेचाळीस वर्षांत जनुकीय विकारांच्या अनेक केसेस पाहिल्या, पेशंटस्ना मार्गदर्शन केले, त्यांचे समुपदेशन केले. जनुकशास्त्राच्या सुवर्णयुगातला त्यांचा हा प्रवास पुस्तकात उलगडला आहे.
पेशंटस्च्या केसस्टडीज् सोबतच, लेखिकेच्या व्यक्तिगत संघर्षाची, तिने पेललेल्या आव्हानांची आणि तिच्या जिद्दीची ही कथा मनोवेधक तर आहेच; त्याचबरोबर प्रेरणादायीदेखील आहे.

# मराठी कादंबरीमधली गर्भवती

**गर्भलिंगनिदान शक्य झाले आणि अनेक निष्पाप मुलींचे गर्भ अकालीच खुडले गेले. तिचा जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला गेला आणि पुरुष मात्र वंशाच्या दिव्याची वाट पाहात राहिला.**

**डॉ. वृषाली किन्हाळकर**



**जा**गतिक महिला दिन जवळ येतो, तसं मनात बाईच्या जगण्याबाबतचे विचार गर्दी करतात. स्वतंत्र भारतातल्या बाईचं जगणं सकारात्मक वाटेने बदलत गेलं, त्यासाठी कारणीभूत ठरलेल्या गोष्टी आठवू लागतात. भारतीय संविधानाची भूमिका फार मोलाची. स्त्री शिक्षणाची सुरुवात आणि त्यातून पुढे स्त्रीला मिळालेलं आर्थिक स्वावलंबनाचं महत्त्वाचं अस्त्र, यामुळे तिचं जगणं माणूसपणाच्या वाटेवर गतिमान होऊ लागलं.

या सगळ्या घटकांबरोबरच तिचं प्रजननकार्य आणि त्याभोवतीचं इष्ट-अनिष्ट रूढी परंपरांचं वलय हेही तिच्या जगण्यातील बदलांसाठी महत्त्वाची भूमिका करणारं आहे. गर्भलिंग निदान करून, लाखो मुली गर्भातच मारल्या गेल्या, हा इतिहास अगदी ताजा आहे. मी स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्राची डॉक्टर असल्यामुळे असेल कदाचित परंतु मला कुटुंब नियोजन आणि गर्भपाताचा स्त्रीला मिळालेला कायदेशीर हक्क, या दोन गोष्टी स्त्री-प्रगतीचा विचार करताना खूपच महत्त्वाच्या वाटतात.

आज मराठी कादंबरीतल्या नायिकेचा किंवा स्त्री-पात्राचा विचार करत, मागच्या पन्नास वर्षातलं बाईचं जगणं, तपासून पहावं वाटत आहे कारण कागदावर उतरलेल्या या सगळ्या बायका, त्या त्या लेखक/लेखिकेने वास्तवात कुठेतरी नक्कीच बघितलेल्या असतात. १९७१ साली नको असलेला गर्भ काढून टाकण्याचा कायदेशीर मार्ग बाईसाठी उपलब्ध झाला. तत्पूर्वी १९६७ला कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा राष्ट्रीय कार्यक्रमात अंतर्भाव झालेला होता.

बाईच्या प्रगतीच्या दृष्टीने मला ह्या दोन गोष्टी खूपच महत्त्वाच्या वाटतात. ठळकपणे मला लक्षात राहिलेल्या काही मोजक्या कादंबऱ्यांमधल्या स्त्रिया आणि त्यांचं जगणं याचा आढावा घेतला तर स्त्रीच्या माणूस म्हणून जगण्याच्या प्रवासाचा थोडा हिशोब मांडता येईल असं वाटतं. कारण पूर्णत: काल्पनिक असं कथानक नसतंच. वास्तवाचा पदर धरूनच पात्रं कागदावर उतरत असतात.

'अरे संसार संसार' या प्रभाकर पेंढारकर (१९७१) लिखित कादंबरीमध्ये एक कनिष्ठ मध्यमवर्गीय नवविवाहित मुंबईकर जोडपं आहे. रजिस्टर लग्न करून, हौसमौजेला फाटा देऊन त्यांनी कर्ज काढून स्वत:चं लहानसं घर घेतलं आहे. दोघेही नोकर करत, काटकसरीने परंतु आनंदात, लग्नाचं समाधान गाठीशी बांधून कर्ज फेडत जगत असतात. घराचे हप्ते फिटल्याशिवाय मूल होऊ देणं त्यांना परवडणार नसतं त्यामुळे इतक्यात मूल नको हे त्यांचं नियोजन असतं. परंतु फसगत होते आणि वसुधाला दिवस गेल्याचं लक्षात येतं! दोघे गर्भपाताचा निर्णय घेतात. तो काळ १९७०च्या आसपासचा. कुटुंब नियोजन किंवा गर्भपात यासाठीची सुलभ सुरक्षित सल्ला केंद्रे तेव्हा सहज उपलब्ध नव्हती. प्रयत्नपूर्वक ती दोघं डॉक्टर शोधतात आणि वसुधाचा गर्भपात केला जातो. दुर्दैवाने वसुधाला धनुर्वाताची लागण होते आणि कोणत्याही उपचारांना न जुमानता ती कोवळी निरागस पोरगी; हे जग सोडून जाते!

त्या काळी सुलभ सुरक्षित कायदेशीर गर्भपाताची केंद्रे फारशी उपलब्ध नव्हती त्यामुळे एक उमलता संसार कोमेजून चुरगळून जातो. अशावेळी मला र.धों. कर्व्यांचे कुटुंब नियोजनाचे महान कार्य आठवते. स्त्रीला अपत्य जन्माच्या भीतिविना, वैवाहिक सुख उपभोगता यावे यासाठी कुटुंब नियोजनाची साधने स्वत: बनवून त्यांचा प्रचार-प्रसार करणारे र.धों. कर्वे खरोखरच अत्यंत दूरगामी आणि स्त्रीच्या आरोग्याचा सर्वंकष विचार करणारे स्त्री सुधारकच होते. दुर्दैवाने अनेक स्त्रियांना आजही त्यांचे नाव ठाऊक नसते. मुंबईतल्या संसाराचीही चटका लावणारी कहाणी आठवली की त्वरितच मला रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१) कादंबरी आठवते. खेड्यात राहणारे एक शिंपी कुटुंब. गंगाराम, पारबती आणि त्यांची दोन पोरं. गावात नवा फॅशनेबल कपडे शिवणारा टेलर आल्यामुळे गंगारामचा धंदा बसतो. त्यामुळे घरात ओढगस्तीची परिस्थिती उद्‌भवू लागते. गंगाराम मानसिक दृष्ट्या खचू लागतो अन् पुढे-पुढे शरीरानेही खंगू लागतो. त्याचा पोरगा वयात आलेला अन् जरासा उर्मटपणाने वागणारा असतो. आर्थिक चणचण आणि गावात असलेली पत जराशी उतरणीला लागल्यामुळे गंगारामला वाटतं की पोरानं नवं फॅशनचं शिवणकाम शहरात जाऊन शिकून यावं परंतु पोरगा शाळेतल्या एका मुलीची छेड काढतो म्हणून परिस्थितीने कातावलेला बाप, पोराला म्हणतो- ''घरात खायला अन्न न्हाई आन तुला असले धंदे सुचायलेत का?'' याच्यावर ते वयात आलेलं उर्मट पोरगं उलट म्हणतं की- ''मला येकट्यालाच














न्हाईत सुचायलेत; समद्यानलाच सुचायलेत. आई गरवार हाय ह्ये काय ठावं न्हाय का मला?'' अशा खाजगी, नाजूक गोष्टीचा उल्लेख पोरानं इतक्या उघडपणे करावा यात माय-बापांना अतिशय लाजिरवाणं वाटतं. माय तर ओशाळून जाऊन रडत बसते पण बाप मात्र त्वेषाने, रागाने पोराला बेदम चोपून काढतो. आधीच तो बाप आजारी असतो, रागारागात पोराला मारतो खरं, मात्र तेवढे शारीरिक श्रम न झेपल्यामुळे पहाटे बाप चक्क मरण पावतो! सगळ्या घराचा, सगळ्यांच्याच आयुष्याचा पाचोळा होऊन जातो! ह्या कहाणीत देखील त्या पारबतीच्या पोटात वाढणारा गर्भ सगळ्या विनाशाचं कारण ठरतो. त्याकाळी गरिबांना, खेड्यापाड्यातल्या लोकांना परवडत नसतं तरी भारंभार पोरं होत रहायची. कुणालाच कुठले उपाय त्या काळी ठाऊक नसायचे. या कहाणीतली नायिका पारबती फार कष्टाळू, आशावादी स्त्री असते. तिच्या काळात तिला जर कुटुंब नियोजनाची साधनं ठाऊक असती तर तिने प्रयत्नपूर्वक त्यांचा उपयोग केला असता, असं वाटून जातं.

व्यंकटेश माडगूळकरांचं 'करुणाष्टक' देखील मला या निमित्ताने आठवून जातं. आपल्या आईविषयी लिहिलेल्या या पुस्तकात ते म्हणतात की आम्ही आठ भावंडं म्हणजे आईच्या आयुष्याला वेढून असणाऱ्या आठ समस्या होतो. मुळातच परिस्थिती बेताची त्यात सतत येणारं बाळंतपण. यामुळे ती आई कधीच निश्चिंत, आरामात अशी नसायचीच. आठवं मूल होताना आईचं वय जरा जास्त वाढलेलं होतं. त्यावेळी ती माऊली म्हणायची, 'हे मूल आता या वयात माझ्या, कशाला ओझं होऊन येत आहे? मला कसं झेपेल हे? त्या आईचे हे हताश अगतिक उद्‌गार ऐकले की पुन्हा-पुन्हा कुटुंब नियोजनाची साधने आणि गर्भपाताचा बाईचा हक्क यांचे अनन्यसाधारण महत्त्व जाणवून जाते. 'करुणाष्टक'मधल्या या आईला जर मोजकीच मुलं असती तर तिचे आयुष्य बऱ्यापैकी सुखात गेले असते, असा विचार पुस्तक संपल्यावर मनात रेंगाळत राहतो. याच अंगाने विचार करत गेलं की मग श्री.ना. पेंडसेंच्या दोन नायिका आठवतात. 'रथचक्र'मधील नायिका, संन्यासी होऊन परागंदा झालेल्या नवऱ्यावर यासाठीच राग धरून असते की संन्यासच घ्यायचा होता तर मग चार पोरं का माझ्या पदरी बांधली नवऱ्याने? त्याकाळी कुटुंब नियोजन हा शब्दही ठाऊक नव्हता कुणाला. तिचं सबंध आयुष्यच पोरांसाठी खस्ता खाण्यात जातं. 'यशोदा' (१९५७) मधली रूपसंपन्न नायिका तारुण्यात जरासा रस्ता चुकते अन् मग गर्भ राहिल्यावर सर्वस्वी विजोड जोडीदाराबरोबर तिचं लग्न लावून दिलं जातं! (आज मात्र कायदेशीर गर्भपातामुळे कितीतरी मुलींची अशी चूक सावरता येते.)

१९८०-९०च्या काळात (जयवंत दळवी लिखित) 'अधांतरी' कादंबरीतली सावित्री यशोदेसारखीच रूपवान असते. मुक्त जगते (कारण एव्हाना गर्भपात सुलभ आणि सुरक्षित झालेला होता.) याचा अर्थ गर्भपाताच्या कायद्यामुळे स्त्रीला कसंही बंधमुक्त जगायला मुभा मिळाली असं मुळीच नाही परंतु स्त्री-पुरुष दोघांच्या चुकीचे पर्यवसान केवळ स्त्रीचेच आयुष्य पूर्णपणे उध्वस्त होण्यात व्हायचे; ते टळले, एवढंच. यशोदा काय किंवा अधांतरीमधली सावित्री; या अशा स्त्रिया कायम एक 'स्त्री'च राहतात. त्यांचे मातृत्व तात्पुरते किंवा शारीरच असते त्या खऱ्या अर्थाने 'आई' होतच नाहीत. किंवा असे म्हणता येईल की त्यांच्यातली 'मादी' त्यांच्यातल्या 'आई' वर मात करते. परिणामी त्यांची मुलं बापाशी गाढ जवळिकीचं नातं प्रस्थापित करतात. याउलट 'रथचक्र'मधली ती बाई, नवरा गृहत्याग करून गेला तरी कधीच विरहिणी वाटली नाही. ती कायम एक दक्ष आईच राहिली.

१९७५ नंतर स्त्री-पुरुष समानतेचे पडघम वाजू लागल्यावर आणि शिकलेली बाई सक्षम होत, अर्थार्जन करू लागल्यावर कणखर विचारी स्वतंत्र, निर्णयक्षम नायिका आशा बगे यांच्या 'भूमी', 'मुद्रा', 'झुंबर' अशा कादंबऱ्यांमधून दिसल्या. सानिया, गौरी देशपांडे, मेघना पेठे यांच्या नायिका पूर्णरूपाने स्वतंत्र आत्मभान सांभाळणाऱ्या आहेत. प्रसंगी संसार नाकारून एकटं आनंदाने जगणाऱ्या आहेत.

संसारात, प्रेमात, संशयाचं धुकं आलं की घर अस्वस्थ होतं. अशी संशयी माणसं पत्नीला क्षमा करत नाहीत. रणजित देसाईंची 'अभोगी' कादंबरी (१९८७) हेच सांगते. याउलट आवर्जून उल्लेख करण्यासारखी मिलिंद बोकीलांची 'समुद्र' (२००९) कादंबरी. यातली नायिका तिच्या मित्रासोबत मैत्रीची मर्यादा ओलांडते! पत्नीच्या हाताने अक्षम्य चूक घडली आहे हे समजल्यावर आधी चिडणारा पती मग शांतपणे विचार करून, तिला समजून घेतो. ती देखील मनापासून स्वत:ची चूक मान्य करते, असं हे कथानक. अर्थात असा नवरा अजून तरी कागदावरच आहे असं वाटतं. खऱ्या आयुष्यात इतकी मनाची उदारता असणारे पुरुष पाहण्यात येत नाहीत.

अगदी नुकतीच 'गर्भ' ही कादंबरी वाचली. श्री. रा.रं. बोराडे यांची अगदी ताजी कादंबरी (२०१९). खेड्यात राहणारी


एक शेतकऱ्याची बायको. तिला एक मुलगी आहे चार वर्षांची. आता पुन्हा ती गरोदर आहे. सासू आणि नवरा ठरवतात की गर्भलिंगनिदान करायचं. मुलगी असेल तर गर्भपात करायचा. ही बाई विरोध करते परंतु नवरा तिला डॉक्टरकडे नेतोच. सोनोग्राफी करून डॉक्टर सांगतात की गर्भ मुलीचा आहे. मग नवरा म्हणतो, ''हे काढून टाका.'' दरम्यान ही गरोदर बाई शिताफीने पळ काढते व थेट माहेरी जाते. पुढे ती प्रसूत होते अन् चक्क मुलगा जन्मतो! आता सासू, नवरा यांचे वागणे एकदमच बदलून जाते. तिला घरी घेऊन जायला नवरा येतो मात्र ही बाई ठाम नकार देते. कष्ट करत दोन्ही मुलांना सांभाळत, ती त्या डॉक्टरवर, सासूवर आणि नवऱ्यावर खटला दाखल करते आणि तो जिंकते! एका खेडूत बाईची ही खंबीर परंतु एकाकी लढाई आजच्या काळातली.

पूर्वी गर्भपात कायदेशीर नव्हता, त्याकाळी स्त्रीचा नाईलाज व्हायचा. लग्नापूर्वी गर्भवती राहिलेल्या मुलींचं आयुष्यच उध्वस्त होई. आत्महत्या करणे किंवा अगदी विजोड, वयस्क बिजवराशी लग्न लावलं जाणं हेच दोन पर्याय उरत तिला आणि विवाहित बायकांना सततची बाळंतपणं झेलत अनारोग्य, गरिबी, उपासमार आणि अविरत कष्ट, चिंता यांच्याशी सतत दोन हात करावे लागत. आयुष्यात आनंद, निवांतपणा उरतच नसे. आता नव्या काळाची नवी आव्हानं आहेत. सोनोग्राफी या नव्या तंत्रज्ञानाने बाईचं आरोग्य खूप सुरक्षित केलं असलं तरीही गर्भलिंगनिदान या दुरुपयोगामुळे किती निष्पाप मुलींचे गर्भ अकालीच खुडले गेले! जन्माला येण्याचा मुलीचा मूळ हक्कच हिरावून घेतला गेला. चार-चार वेळा मुलगीचा गर्भ काढून टाकल्यामुळे कितीतरी स्त्रिया आज खूप अशक्त शरीर घेऊन आयुष्य ओढत आहेत. आणि पुरुष मात्र वंशाच्या दिव्याची नव्या उमेदीने वाट बघत आहेत.

एकूणात काय, स्त्रीचे जीवन सुखावह करण्यात संविधानाचा, कायद्यांचा स्त्रीमुक्तीच्या चळवळीचा आणि स्त्री शिक्षणाचा खूप मोठा वाटा असला तरीही समाजमन अजून पुरेसे बदललेले नाहीय. आजही पती-पत्नी दोघेही कामावरून घरी परतले की घरातले सारे पत्नीनेच पहावे असे वाटणारे पुरुष आहेतच. स्त्रीला 'मूल देणारे यंत्र' समजणारा एक मोठा वर्ग अस्तित्वात आहेच. गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे यांनी कागदावर उतरवलेली स्त्री आज आपल्या आजूबाजूला दिसते आहे; मात्र त्यांनी कागदावर उतरवला तसा समंजस पुरुष आणि पत्नीला एक निखळ माणूस समजणारा प्रेमळ नवरा मात्र अजूनतरी सरार्सपणे दिसत नाही; आपल्या वास्तव जगण्यात!

**डॉ. वृषाली किन्हाळकर**
भ्रमणध्वनी : ९४२२८७१३६५
sahajrang@gmail.com

॥ग्रंथाली॥




# एक अवकाश माझंही

**छाया कोरेगांवकर**

जीवनानुभवाचं सच्चेपण मांडणारी छायाची कविता ही वेदनेचा हुंकार आहे. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेताना होणारी तडफड, असह्यता या कवितेतून अधोरेखित होत असली तरी कुठलाही आक्रस्ताळेपणा तिच्यात नाही. त्यामुळे कवितेतलं 'सत्त्व' हरवलेलं नाही. जीवनातल्या उणिवांसह जाणिवेचं रसरशीतपण टिकून असल्यानं ही कविता जशी दाहक आहे तशीच मोहकही आहे. बदलत्या काळाचे हे पडसाद अपरिहार्य आहेत. कवितेत आधुनिक प्रतिमांचं नेटकं रूप, प्रवाही जीवनशैलीचं नेमकं वर्णन आहे. मात्र केवळ आधुनिकतेच्या हव्यासाची बाधा या कवितेला नाही. वास्तवाच्या जवळ नेणारी, मनाची ठाव घेणारी छायाची कविता अस्वस्थ करणारी आहे.

– अस्मिता गुरव

**मूल्य ६० रु. सवलतीत ३० रु.**

# थंड हवेचे ठिकाण




**सुकन्या आगाशे**

सुकन्या आगाशे यांचा हा तिसरा कथासंग्रह. व्यक्तीचा भवतालाशी चालणारा संघर्ष व त्यातून परत उभे राहणे या तिसऱ्या संग्रहातील कथांमधूनही दिसते. पुस्तकातील कथा आशयदृष्ट्या वैविध्यपूर्ण आहेत. आशयानुरूप बदलणारी कथनशैली येथे दिसते. दीर्घ वर्णनात न लडबडणाऱ्या, अचूक, नेटक्या, मितभाषी शैलीत मांडलेल्या या कथा आपल्या वेगळ्या 'रुपाशयां'मुळे लक्षणीय ठरतात.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# स्त्री नाटककारांच्या नाटकांतील समस्या



**स्त्री नाटककार फार नाहीत अशी चर्चा कायम होत राहिली आहे. प्रस्तुत लेख स्त्रियांनी लिहिलेल्या नाटकांचा शोध घेताना, त्यांनी हाताळलेल्या समस्यांची सविस्तर चर्चा करतो.**

**प्रा. डॉ. बालाजी पोतुलवार**

**भा**रतीय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांची जीवनपद्धती विशिष्ट चौकटीत आखून दिलेली आहे. त्याच चौकटीत आणि त्याच चाकोरीत राहून स्त्रियांनी जगावे ही समाजमान्य भूमिका आहे. त्या रूढ आणि चाकोरीबद्ध जीवनामध्येच स्त्रियांची इतिकर्तव्यता आहे असे स्त्रियांच्या मनामध्ये सतत बिंबविले गेले. परंपरेने स्त्रियांवर अशाप्रकारची बंधने घातल्यामुळे त्यातूनच स्त्रीजीवनाच्या समस्या निर्माण झाल्या. या समस्या किंवा विविध प्रश्न स्त्री नाटककारांनी आपल्या नाटकातून समाजाभिमुख केले. आपल्या नाटकांमधून मानवी जीवनाचे प्रश्न सोडविण्याची, उकल करण्याची त्यांची धडपड दिसते कारण आपल्या देशात तरी पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीचे जीवन तिच्या जन्मापासूनच शिक्षण, विवाह, अपत्यासंबंधी प्रश्न या सर्वच बाबतीत पुरुष जीवनाशी जोडलेले व अवलंबून आहे. त्यामुळे चौकटीतले जीवन, घर, विवाह संस्था, कौटुंबिक संबंध, एकत्र कुटुंबपद्धती, विभक्त कुटुंबपद्धती, हुंडा पद्धती प्रथा, दत्तक, परित्यक्ता स्त्रियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न, सौंदर्य प्रसाधनाच्या आणि फॅशनच्या आहारी गेलेल्या आधुनिक स्त्रियांचे प्रश्न, कामकरी स्त्रियांचे प्रश्न, पुनर्विवाह अशा सगळ्या गोष्टींना स्पर्श करणारे, क्वचित छेद देणारे व विचार करायला लावणारे असे स्त्री-नाट्यलेखिकांचे नाट्यलेखन दिसते. ज्या काळात हे लेखन झाले त्या काळाचा विचार करता नाट्यलेखिकांनी टाकलेले हे पाऊल धाडसाचे, विचाराचे व सखोल चिंतनाचे द्योतक आहे.

सई परांजपे ह्या विसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वातील महत्त्वाच्या नाटककार आहेत. त्यांच्या 'जास्वंदी' (१९७६) या नाटकात सोनिया या नायिकेच्या निमित्ताने आधुनिक औद्योगिकरणोत्तर युगातील अतिउच्चभ्रू आणि अतिश्रीमंत स्तरातील जीवनदर्शन घडविले आहे. विशेषत: स्त्रीजीवनाचे यात घुसमटलेपण दाखविले आहे. सोनिया ही श्रीमंत उद्योगपतीची सुंदर आणि स्वत:चे काहीही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नसलेली विनापत्य प्रौढत्वाकडे झुकलेली स्त्री आहे. कोणे एक काळी प्रेमविवाह होऊनही नवऱ्याच्या व्यावसायिक व्यस्ततेमुळे दिवसेंदिवस पती-पत्नीची भेटही होत नाही. घरातला कारभार रंगाबाई (मोलकरीण) व तानपुरे (धूर्त ड्रायव्हर) याच्या सहकार्यानेच चालतो. उदयन



'जास्वंदी'

नावाच्या तरुणाचेही प्रेम तिला शेवटपर्यंत मिळत नाही. सोनियाचे व्यक्तित्वशून्य पराभूतपण ती कबूलच करते. तिला एकटीला, स्वत:चे असं अस्तित्वच नाही उरलं. ''विमेन्स लिबच्या काळात पक्की भारतीय पत्नी आहे मी!'' एका परीने समस्त भारतीय स्त्रीच्या प्रवृत्तीवरची ही वेधक टिप्पणी आहे. खरे सुख आडपडद्याने मिळवत आपली सोनेरी पिंजऱ्यातली सुरक्षितता सोनिया जपत राहते. याच कुचंबणेत अखेर तानपुरे ड्रायव्हरही तिच्या अगतिकतेचा फायदा घेऊन तिचे लैंगिक शोषण करतो. ही तिची अगतिकता आणि त्यापोटीचे अध:पतन मांजरांनाही सहन होत नाही. मनुष्यजातीचा तिटकारा येऊन ती निघून जातात. या निमित्ताने लेखिकेने आजवर न मांडलेले अतिउच्चभ्रू कुटुंबातील स्त्रियांचे प्रश्न (समस्या) या नाटकात आणले आहेत.

मानवजातीच्या इतिहासाइतका स्त्री जातीवरील अत्याचार सनातन आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, आई, सून, सासू,पत्नी अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. स्त्रीला लहानपणी वडिलांच्या छायेत, तरूणपणी पतीच्या छायेत आणि म्हातारपणी मुलांच्या छायेत आपले आयुष्य घालवावे लागते. पुरुषसत्ताक समाजाने स्त्रीला कुठल्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. भारतीय समाजात पुरुषांनी स्त्रियांवर घातलेली बंधने न कुरकुरता स्वीकारलीच पाहिजेत, हा दंडक रूढ होता. स्त्रिया पण निमूटपणे ही घातलेली बंधने स्वीकारीत होत्या.

कुटुंबासाठी स्वत:चे अस्तित्व विसरून दुसऱ्याची सेवाशुश्रूषा करणे, त्याग करणे यात स्त्रियांनी आपले आयुष्य खर्च केले. भारतीय समाजव्यवस्थेत पुरुषाने स्त्रीवर बंधने का घालावीत? या संबंधी विचार मांडताना मधुरा कोरान्ने म्हणतात, ''पुरुष जेव्हा संपत्ती, मालकी हक्क यांचा विचार करू लागला तेव्हा आपल्यापासून निर्माण झालेला जीव या मालकीला जवळचा आहे, असे त्याला वाटले. नवीन जन्माला आलेल्या जिवाचे आपण निश्चितपणे पिता आहोत याची खात्री पटावी, म्हणून आपणाला आवडलेल्या स्त्रीने दुसऱ्या पुरुषाबरोबर संबंध ठेवू नयेत म्हणून त्या स्त्रीवर बंधने घालण्यास सुरुवात केली. सामाजिक चालीरीतीच्या नावाखाली स्त्रीला त्याने कैद बनविले आणि धार्मिक पाप-पुण्याच्या नावाखाली स्त्रीला मनाने दुबळे बनविले.'' अशा पारंपरिक स्त्रीचे रूप सई परांजपे लिखित 'माझा खेळ मांडू दे' (१९८६) या नाटकात बघायला मिळते. बरीच वर्ष वेड्याच्या इस्पितळात काढून आणि त्यापूर्वी बालपणापासून पुरुष अत्याचाराचे अनेक अनुभव घेऊन सेवाताईकडे राहण्यास आलेल्या या नाटकामधील मामी म्हणजे या पारंपरिक स्त्रीचे प्रातिनिधिक रूप आहे. मामींचे संपूर्ण आयुष्य दु:खमय आहे. लहानपणापासून मुलगी म्हणून उपेक्षित जिणे त्यांच्या वाट्याला येते. 'नवऱ्याचं किंवा बापाचं नाव मध्ये घातल्याशिवाय म्हणे बाईचं नाव पुरं होत नाही.' या त्यांच्या बोलण्यातून समाजात पुरुषाशिवाय स्त्रीला किंमत नाही, हे स्पष्टपणे जाणवते. वयाच्या बाराव्या तेराव्या वर्षीच त्यांच्या सख्ख्या मामाने त्या उमलण्याआधीच त्यांची अब्रू लूटून त्यांना कोमेजून टाकले. ही घटना लोकांना कळली तर अब्रू जाईल म्हणून मामींच्या आईने त्यांना गप्पही बसविले. याचा अर्थ असा की, स्त्रीने कायम सहन केले पाहिजे हा धडा वयाच्या तेराव्या वर्षीच मामींनी गिरवला होता. मामींच्या लग्नाला बारा वर्षे होऊनही त्यांना पतीसुख मिळत नाही. उलट सासऱ्यांनीच त्यांच्यावर अतिप्रसंग केला. या बाबतीत सासूबाईजवळ तक्रार करण्यात काहीही अर्थ नाही, हे मामी समजून चुकल्या. कारण सासूबाईचे पूर्ण सहकार्य सासऱ्यांना होते. आपल्या पतीला मोलकरणी, कामाच्या बाया पुरवून सासूबाई पतीची सेवा करीत होत्या. त्यामुळे मामींनी घाबरून जाऊन सासऱ्यांचा कात्रीने खून केला. याचा परिणाम मामींच्या मनावर झाला. नंतर वेड्याच्या इस्पितळात काही दिवस काढून त्या सेवाताईकडे पेईंग गेस्ट म्हणून राहताना दिसतात. त्यामुळे मामींच्या मते, 'पुरुष म्हणजे सैतानाचे वारस आणि लग्न अग्निदिव्य होय.' मामीच्या दु:खाची जात वेगळी आहे. त्यामुळेच स्वत:ला सावरू शकल्या नाहीत. मामींसारख्या स्त्रियांनी सगळे अत्याचार सहन केले आहेत. त्यांच्यापुढच्या समस्येतून त्या मार्ग काढताना दिसत नाहीत.

जाहिरातक्षेत्रात 'मॉडेल' म्हणून काम करणारी 'रिबेका जोसेफ' ही या नाटकातील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. रिबेका 'मॉडेलिंग'करायचेच या महत्त्वाकांक्षेपायी घराबाहेर पडलेली नाही. परंतु जाहिरात क्षेत्रामध्ये काम करताना कोणत्या प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते याचे चित्रण 'माझा खेळ मांडू दे' या नाटकात आहे. जाहिरात क्षेत्रात काम करताना त्या व्यक्तीभोवती प्रसिद्धीचे वलय असते. हे वलयही समस्या निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. रिबेकाला मॉडेलिंग करताना अशाच प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागलेले दिसते. रिबेका ही वयाने लहान असून अनाथ आहे. तिचे लहानपण ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या वातावरणात जाते. एकदा दूरदर्शनवरील नाटकातील तिचे काम बघून मॉडेलिंग एजन्सी असलेला गोवर्धन तिला जाहिरात फिल्ममध्ये काम करण्यासाठी ऑफर देतो. अल्लड वयात रिबेकाला गोवर्धनच्या मनातला हेतू कळत नाही. जाहिरात फिल्ममधील अनेक शॉट करता रिबेकाच कशी योग्य आहे त्याचे तो रसभरित वर्णन करतो. त्यामुळे तिला प्रसिद्धीचा आणि पैशाचा मोह पडतो. गोवर्धन रिबेकाला पुरती जाळ्यात अडकवतो. त्याच्याच मार्फत रिबेकाने काम करायचे आणि त्यातही त्याला साठ टक्के आणि रिबेकाला चाळीस टक्के पैसे मिळतील असा गोवर्धन करार करतो. पैशाच्या लोभापायी गोवर्धन रिबेकाला फिल्ममधून दुय्यम दर्जाच्या भूमिका देतो. कॅब्रे डान्सदेखील करायला सांगतो. एका शूटिंगच्यावेळी अंगावरील दुपट्टा काढण्याच्या गोष्टीवरून गोवर्धन तिला सक्ती करतो. तेव्हा स्टंट-मॅन डेव्हिड तिला वाचवतो. यामुळे नकळत रिबेकाचे मन डेव्हिडमध्ये गुंतत जाते. दुर्दैवाने शूटिंग चालू असताना अपघात होऊन, स्फोटात डेव्हिड मृत्यूमुखी पडतो. डेव्हिडचे आणि रिबेकाचे मनाने लग्न झाल्याने तिच्या दृष्टीने तिने माता बनणे हे योग्य आहे. परंतु समाजाच्या आणि कायद्याच्या दृष्टीने ती कुमारी माताच आहे. बेवारशी आई बेवारशी मुलाला जन्म देते हे जरी खरे असले, तरी कुमारी मातृत्वाला समाजाच्या दृष्टीने प्रतिष्ठा नाही. परंतु रिबेका खचून न जाता मिशनमध्ये राहून मुलाला जन्म देते. तिच्या मुलाला (मायकल) स्वीडनमधील हौशी जोडपे दत्तक घेते. कुमारी मातृत्वाच्या समस्येवर जाता-जाता हाही एक पर्याय सई परांजपेनी सुचवला आहे, असे म्हणावेसे वाटते. स्त्री लेखिका असल्यामुळे स्त्रीचे दु:ख तिला समजू शकले आहे.



'माझा खेळ मांडू दे'

इथे एक गोष्ट लक्षात येते की, रिबेका जाहिरातीच्या क्षेत्रात अडकली गेली आणि तिच्यापुढे समस्या उभी राहिली. कुमारी मातृत्व हेही तिच्यावर लादण्यात आलेले नाही. तिने स्वत:हून हे स्वीकारले आहे. कुटुंबात राहून मग घराबाहेर पडण्यासाठी कोणताही

संघर्ष तिला करावा लागला नाही. तिची ती स्वतंत्र असल्याने ती स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास मोकळी होती. तरीही तिच्यापुढे समस्या उभी राहिली. पुरुषप्रधान संस्कृतीत रिबेकानेही शेवटी टोनीचा आधार शोधला आहे.

'माझा खेळ मांडु दे'मधील पद्मिनी अशी एकाकी होत नाही. कदाचित स्त्री नाटककार आहे म्हणून पूर्ण सहानुभूती पद्मिनीच्या वाट्याला आली आहे. ती परत पतीकडे जाताना दिसत नाही. पद्मिनी ही मध्यवर्गातील मुलगी आहे. या मुलीला तिच्या घरच्यांनी पदरातील निखारा समजून मुलाचा होकार येताच विनाचौकशी त्याला मुलगी देऊन टाकली. पद्मिनी मिळवती आहे. आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यावर तिच्यापुढच्या समस्या कमी होतील, असे तिला वाटत होते. परंतु पद्मिनीला वेगळ्याच समस्येला तोंड द्यावे लागते. पद्मिनी दिसायला डावी आहे. परंतु बँकेतली नौकरी ही तिची जमेची बाजू आहे. त्याच आधारावर तिला अरविंद नाईकचे स्थळ चालून येते. या मुलाबद्दल मुलाची परप्रांतीय मुलीशी काही भानगड आहे असे कानावर आले होते. तरीही मुलीकडचे सर्वजण या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात. समाजात मुलीच्या दृष्टीने तिचे लग्न होणे महत्त्वाचे असते हाच दृष्टिकोण असतो. लग्नानंतर तर मुलगा उजळमाथ्याने त्या बाईबरोबर फिरायला लागला. पद्मिनी नावाचीच बायको ठरली. नवऱ्याची सत्ता मात्र तो तिच्यावर गाजवायचा. घरात सर्व पगार देऊनही घरात चहूबाजूंनी त्रासच सहन करावा लागे. पुढे पुढे असह्य होऊन ती बोलायला लागली. सासूने आयता चहा द्यावा म्हणून ती हट्टाला पेटली. आयता चहा मिळाला परंतु रात्री नवऱ्याने वळ पडेपर्यंत मारही दिला. नेमका याच गोष्टीचा फायदा नवऱ्याने घेतला. पद्मिनीशी गोड-गोड बोलून, आपण दुसरीकडे राहण्यासाठी जाऊ, स्वतंत्र बिऱ्हाड थाटू असा प्रस्ताव ठेवला. तिच्या मनाने उभारी घेतली. आणि बँकेकडून लोन घेऊन स्वतंत्र बिऱ्हाड थाटले. तिथे नवऱ्याला जी बाई आवडली होती ती बाईपण राहायला येते. हे सगळे असह्य होऊन नेसत्या वस्त्रानिशी पद्मिनी घराबाहेर पडते. त्यानंतर तिने माहेरचा अंदाज घेतला. माहेरी भाऊ म्हणाला, 'चुलीतल्या लाकडानं चुलीतच जळावं.' अशी नकारघंटा ऐकायला आल्यावर शेवटी पद्मिनी सेवाताईच्या खोलीत आसऱ्याला आली. समाजात एकटी स्त्री सुरक्षित राहू शकत नाही. पद्मिनीला कारखानीस (तिच्या बँकेतील मॅनेजर) यांचा आधार मिळतो. कारखानीस हे दुःखी आहेत. सतरा वर्षे त्यांची पत्नी अंथरूणाला खिळून आहे. ते तिची सेवा मनापासून करीत आहेत. परंतु त्यांच्या पत्नीचीदेखील ती असतानाही त्यांनी दुसरे लग्न करावे अशी इच्छा आहे. ते पद्मिनीपुढे हा प्रस्ताव मांडतात. इतके दिवस संस्कार, नीतिमत्ता, मूल्ये या सगळ्यांना जपणारी ती कारखानीसांना होकार कळविण्यासाठी मनाची तयारी करते. शेवटी आपल्या नवऱ्यापासून घटस्फोट घेऊन कारखानीसांबरोबर लग्न न करताच राहायचे ठरवते, पण पतीकडे परत जात नाही. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुष स्त्रीला कशी गरजेपुरती वापरतो. त्याचे पद्मिनी हे एक प्रतीक आहे. बँकेकडून लोन घेऊन, जागा घेण्यापुरती पद्मिनीच्या नवऱ्याला तिची गरज होती. तिचे काम संपल्यावर पद्मिनीचा संबंधच उरत नाही. पत्नी सोडून परस्त्रीबद्दल वाटणाऱ्या आकर्षणापायी संपूर्ण कुटुंबापुढे समस्या उभी राहते. अशा या तिघी अनोळखी स्त्रिया दुःखाच्या समान धाग्याने एकत्र येतात. पद्मिनीला आणि रिबेकाला प्रेमळ आश्वासक सहप्रवासी मिळतात पण मामीच्या वाट्याला नेमके याच बाबतीत दारूण अनुभव येतात. समाज व्यवस्थेत आणि कुटुंबव्यवस्थेत त्यांची परवड होते. मामींच्या माध्यमातून परित्यक्ता विवाहित स्त्रीची समस्या नाट्यलेखिकेने या नाटकात मांडली आहे.

शिरीष पै यांच्या 'झपाटलेली' (१९७५) या नाटकाचा विषय वेगळा असून या नाटकाची कथा पिशाच्चयोनीशी संबंधित आहे. एका मनोरुग्णाची समस्या यात मांडली आहे.

स्त्री-मुक्तीची समस्या आधुनिक पद्धतीने मुक्तनाट्याच्या आधारे मांडता येऊ शकते. त्याचे उदाहरण 'मुलगी झाली हो' (१९८४) या ज्योती म्हापसेकर लिखित मुक्तनाट्याचे देता येईल. या नाटकात पारंपरिक स्त्रीजीवनाची व्यथा व्यक्त केली आहे. तसेच भारतीय समाजातील रूढीविरूद्ध आवाज उठविणाऱ्या उद्याच्या आशादायक स्त्रीचे चित्रण केले आहे. स्त्रीची दुःखे, समस्या स्त्रीच योग्यप्रकारे मांडू शकते याचा प्रत्यय या मुक्त नाट्याद्वारे येतो. या नाटकात स्त्री-मुक्तीची गाणी म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांचा कार्यक्रम करीत असताना प्रेक्षकामंधील एक स्त्री (कमल) उठून येऊन तिच्या मनात आलेल्या शंका सांगते. ही स्त्री म्हणजे सर्वसामान्य स्त्रीचे प्रातिनिधिक रूप आहे. कार्यकर्त्या कधी मुलगी, कधी सासू, कधी नवरा, कधी आई अशी वेगवेगळी रूपे घेऊन रोजच्या जीवनातील प्रसंग आपल्या समोर उभे करतात. स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य, वैचारिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या दृष्टीने समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हायला पाहिजे. परंतु मुलीच्या जन्मापासूनच तिच्यात भेदभाव केला जातो. मुलगी जन्माला आल्यावर बर्फी वाटतात तर मुलगा जन्माला आल्यावर पेढे वाटले जातात. मुलगा होण्यासाठी स्त्रिया नवससायास, उपासतापास, व्रतवैकल्ये करीत असतात. 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा' असा समज समाजात रूढ होता, त्यामुळे मुलाचे महत्व त्याच्या जन्मापासूनच वाढत गेले. त्याचा परिणाम पुढे पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांचे महत्त्व वाढण्यास कारणीभूत झाला. स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे, असे पुरुषांना वाटत गेले. त्यामुळे पूर्वीही आणि आजही हुंड्यासाठी तिचा जाच करणे, जाळणे, मारणे असेही प्रकार खूप मोठ्या प्रमाणात घडतात. असे सर्वपरिचित घटना प्रसंग, नाट्यलेखिकेने नाटकातून मांडलेला असल्याने त्यातून स्त्रीच्या जगण्याचा पट समोर येताना दिसतो.

'संगीत हुंडा नको ग बाई' (१९८६) हे म्हापसेकरांचे नाटक हुंडा समस्येवर प्रकाश टाकणारे आहे. मुलाच्या सगळ्या अपेक्षा मुलीच्या आईवडिलांकडून पूर्ण होत नसल्याने तिचा शारीरिक, मानसिक छळ होतो. प्रसंगी तिचा जीवही कसा घेतला जातो, याचे अत्यंत भीषण, विदारक दर्शन 'सं. हुंडा नको ग बाई' या नाटकात जाणीवपूर्वक घडवलेले दिसते. या नाटकातली सुनिता ही अशीच



**‘संगीत हुंडा नको ग बाई’**

हुंडाबळी ठरते. स्त्रियांवर होणारे जे अत्याचार आहेत ते मूलत: त्यांच्या समाजातील दुय्यम स्थानाशी निगडित आहेत. त्यामुळे दुय्यम स्थानामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या अत्याचारावर संघटित होणारा एक मतप्रवाह निर्माण झाला पाहिजे. तसेच मुलीलाही वारसाहक्क कसे मिळेल, याचीही तजवीज करणे आवश्यक आहे. यासाठी स्त्री मुक्तीचा विचार या नाटकात प्रकर्षाने मांडला आहे. बायकोला मारणे हा खाजगी प्रश्न नाही तो कायद्याने गुन्हा आहे. लग्नानंतर सात वर्षाच्या आत जर पत्नीचा नैसर्गिक मृत्यू झाला, तर तो हुंडाबळी ठरतो. ‘हुंडा नको ग बाई’ असे म्हणत जर सासरचे मुलीला वस्तूच्या रूपात मागणी करून तिचा छळ करीत असतील तर सासरच्या सर्व मंडळीला शिक्षा होऊ शकते. हे नाट्यकर्तीला या नाटकातून सुचवायचे आहे.

भारतीय स्त्रीची जीवनपद्धती पूर्वीपासून समाजाने चौकटीत आखून दिली आहे. स्त्रिया अशिक्षित असल्याने पूर्वी बालविधवा, सती, केशवपन यासारख्या रूढी-परंपरांना बळी पडलेल्या आहेत. यातूनच स्त्रीजीवनविषयक समस्या निर्माण झाल्या. पती मृत्यूनंतर पत्नी सती जात होती.कारण पत्नी सती गेल्यावर खऱ्या अर्थाने पतीला स्वर्ग मिळतो असा एक गैरसमज होता. इंदुमती केळकर यांच्या ‘पहिला महात्मा’ (१९९१) या नाटकातील जोतिबा म्हणतात, ‘‘कसला स्वर्ग अन् कसला नरक! भटांचं कपट पहा. यांचे पुरुष पापी म्हणून मेल्यावर बायकोच्या आधारानं स्वर्गात जाऊ पाहतात. पत्नी मेल्यावर एखादा सता गेल्याचं उदाहरण ऐकलंय तुम्ही? वाटतं, सगळ्या भटांना गोळ्या घालाव्यात. पण ही सापाची जात संपणार थोडीच!’’ जोतिबांच्या कित्येक कृतीमागे सावित्रीबाईंची प्रेरणा होती. न्हाव्यांनी स्त्रियांचे केशवपन करू नये म्हणून सावित्रीबाईने नाम्या न्हाव्याच्या मदतीने सर्व न्हाव्यांना एकत्र करून त्यांचा संप घडविला. एका ब्राह्मण मुलाने महार मुलीशी लग्न केले म्हणून समाज त्यांना जिवे मारत होता. तेव्हा सावित्रीबाईंनी ब्रिटिशांचा धाक दाखवून दोघांनाही वाचविले. निराधार बायकांच्या बाळंतपणासाठी व त्यांच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी ‘बालहत्या प्रतिबंधक’ गृहाची स्थापनाही सावित्रीच्या मदतीने जोतिबा करतात. विशेष म्हणजे काशी नावाच्या विधवा तरूणीला वाचवून तिची समस्या सोडवतात. अशा अनेक स्त्रियांपुढील अडचणी (समस्या) फुले दांपत्य कसे दूर करतात हे या नाटकातून नाट्यकर्तीने समाजापुढे आणले आहे. सुषमा देशपांडे यांच्या ‘व्हय मी सावित्रीबाई’ या एकपात्री प्रयोगातही म. फुले यांच्या जीवनकार्याचा उल्लेख दिसतो.



**‘व्हय मी सावित्रीबाई’**

‘सोनफुला’ (१९९७, अरुणा श्रीखंडे) या विनोदी तीन अंकी नाटकात यशोदाबाई सारख्या भोळसट व अशिक्षित महिला देवाधर्माकडे वळतात व नकळतपणे अंधश्रद्धेत गुरफटतात. त्यातून वेळीच भाडेकरूंच्या समयसूचकतेने त्या वाचतात. अशाप्रकारच्या सामाजिक प्रश्नांवर नाट्यकर्तीने हे नाटक लिहिले आहे.

‘नलू सांगा कोणाची?’ (१९९९, मीना देशपांडे) या नाटकाची नायिका ‘नलिका’ ही टेस्ट ट्यूब बेबी आहे. नलिका ऊर्फ निलूच्या भावविश्वावर आधारित हे नाटक आहे. ‘टेस्ट ट्यूब बेबी’ म्हणून जन्माला येणारी मुले उद्या मोठी झाल्यावर त्यांच्या भावनांचा कोणी आणि कसा विचार करावयाचा? या प्रश्नांचा या नाटकाच्या निमित्ताने लेखिकेने सखोलतेने वेध घेतला आहे. ‘आपल्या बीजापासून मूल पाहिजे या हट्टापायी तिचे भावविश्व कसे होलपटते याचे प्रभावी दर्शन या नाटकात घडते. दर्शनी तीन आया आणि दोन बाप असून मी नक्की कुणाची?’ हा प्रश्न तिला पडतो. शारीर नात्यांपेक्षा भावनेच्या नात्यांची दृढता महत्त्वाची! केवळ शारीरिक-जैविक दृष्ट्या आपल्या अंशाच्या बीजाच्या अपत्यांचा अट्टाहास हा मूर्ख दुराग्रहच ठरेल याचे स्पष्ट सूचन हे नाटक करते. दुसरे म्हणजे या नाटकातील सत्यभामा आपल्या देहाचा, बीज फलित करून देण्याकरिता एखाद्या फॅक्टरीसारखा उपयोग करून घेते. जन्मभर चैनीत राहता येईल इतका पैसा ती कमवते. स्त्रीच्या देहाच्या या उपयोगातील भीषणता भयावह अशी आहे. एकदा प्रयोगशाळेत बीज गेल्यावर पुढे त्याचे नक्की काय होईल यावर आपला ताबा नसल्याने पुरुषांनी नसत्या घमेंडीत राहू नये, हाही एक संदेश या नाटकातून मिळतो. केवळ कौटुंबिक आणि सामाजिक आशयापेक्षा वेगळ्या आशयसूत्राने हे नाटक कायम लक्षात राहील असेच आहे. वैज्ञानिक सुविधा वापरण्याची माणसाची अघोरी महत्त्वाकांक्षा या नाटकातून अपवादात्मकच व्यक्त झाली आहे. वैज्ञानिक सुधारणांनी स्त्री जीवनात अनेक समस्या निर्माण केल्या. विज्ञानाने मानवी जीवन सुंदर करण्याऐवजी यासंदर्भात हास्यास्पद आणि विद्रूपच केले आहे. विज्ञानयुगातील मानवी नात्यातील गुंतागुंत मांडणारे असे नाटक आहे.

स्त्रीसमस्येच्या दृष्टिकोणातून विचार करता स्त्रीला जडलेल्या शारीरिक व्याधी अथवा मानसिक विकृतींचाही विचार करणे महत्त्वाचे ठरते. आज समाजात भोगवादीवृत्ती, व्यसनाधीनता व चंगळवादी वृत्ती पसरलेली आहे. या सगळ्यांची मुळे अतृप्त मानसिकतेत कुठेतरी आढळतात. ‘मनोमयी’ (२०००, मेधा तेलंग)

या नाटकातील ताराबाई म्हणजेच या मानसिक विकृतीला बळी पडणारे व्यक्तिमत्त्व आहे. ताराबाई ही आयुष्यात अनेक संकटांना सामोरी जात जात आयुष्य जगते. 'बालपणीचा काळ सुखाचा' हा अनुभव तिला मिळत नाही. घरात तिचे घुसमट होणे सतत जाणवते. नैराश्यातून प्रतिकार करण्याची प्रवृत्ती, त्यातून तिचा मानसिक तोल ढळत जातो. त्यामुळे तिचे वडील, लग्न झाल्यावर सासरची मंडळी, नंतर मुलगा व सून यांना तिच्या विक्षिप्त वागण्यातून सहन करावा लागणारा मानसिक त्रास आणि स्वत:ला म्हणजेच ताराला होणारा त्रास याचे चित्रण या नाटकात आलेले आहे.

विज्ञानाचा शोध हा कुटुंबाची, समाजाची घडी बिघडविण्यासाठी नसतो तर मानवी कल्याणासाठी असतो. लग्नानंतर समाजाच्या संमतीने शुक्राणू बेबी जन्माला घालणे, हे विज्ञानाचे वरदान आहे, पण पुरुषाशिवाय स्त्री एकटी आपल्या अपत्याला जन्माला घालू शकते व तिला एकटी सांभाळू शकते. या अट्टहासापायी 'सुरूंग' (२००५, डॉ. सुनिता कावळे) या नाटकातील प्रगती या जगात दिशाला आणून तिचे जीवन उद्ध्वस्त करते. प्रगतीने विवाहसंस्थेला व कुटुंबसंस्थेलाच सुरुंग लावल्याने नवीन समस्या उभी राहते. कोणत्याही गोष्टीचा गैरवापर केल्याने त्याचे दुष्परिणाम कुटुंबाला व समाजाला भोगावे लागतात. याचे भान युवापिढीला असले पाहिजे, या तळमळीने नाट्यकर्तीने 'सुरूंग' ही नाट्यकृती साकार केली आहे. 'सुरुंग' हे नाटक पुरुषांभोवती गुंफलेले असून पुरुषपात्रविरहित आहे. या नाटकातील प्रगती व प्रचिती या बालमैत्रिणी असतात. नंतर प्रचितीचे लग्न झाल्यावर बाळ होत नसल्याने आपल्या कुटुंबाला विश्वासात घेऊन ती शुक्राणू बाळाला जन्म देते. हे शुक्राणू बाळ म्हणजे तिचा मुलगा क्षितिज. प्रगती मात्र पुरुष जातीचा तिरस्कार करणारी आहे. आईला वडिलांपासून झालेल्या त्रासाचा, जाचाचा वचपा घ्यावा म्हणून अख्ख्या पुरुष वर्गाला धडा शिकविण्यासाठी लग्न न करताच प्रगती शुक्राणू बेबी (दिशा) जन्माला घालते. आणि कुटुंबात अनेक प्रश्न निर्माण करते. प्रगती अशी का वागते? याचे उत्तर तिने जगलेल्या भूतकाळात आहे. बालपणापासून ते मोठे होईपर्यंत प्रगतीला तिचे बाबा हिंस्त्र जनावर वाटायचे. तिच्या आईला खूप छळायचे. घरात चांगले क्षण फारच थोडे असायचे. प्रगतीच्या या अशा भूतकाळातल्या आठवणी तिच्या मनात सारख्या धुसमत असतात. ती भूतकाळात हरवते आणि आईला म्हणते, ''मला आठवतंय...हा इथं इथं असा पाळणा होता... रात्र झाली होती... तू पाळण्यावर बसली होतीस. माझं डोकं तू तुझ्या मांडीवर घेतलं होतंस. हळूहळू थोपटून तू मला झोपवत होतीस. बाबा सारखे तुझ्यावर चिडत होते. तुला खोलीत बोलवत होते. तू त्यांना सारखं सांगत होतीस... प्रगतीला झोपवते आणि येते, पण बाबा... छे, त्यांना बाबा म्हणायचीही लाज वाटते मला जो पुरुष आपल्या मुलीच्याच मायेची पाखर उद्ध्वस्त करतो त्याला बाबा तरी कसं म्हणता येईल आई? ते अधिकच चिडून बोलावू लागले. (दोघीही भूतकाळात हरवल्यागत) कुठं गेली मसनात. केव्हाचा हाका मारतोय. ऐकू नाही येत?....साली.... नवरा आहे तुझा मी...नवरा...समजलं? माझ्यापेक्षा ती पोट्टी तुला जवळची वाटते का? दाखवतोय तुला नवरा काय असतो ते. सांगून ठेवतो, मी म्हणेन तेव्हा माझ्याजवळ आली पाहिजेस तू. म्हणीन तितकेदा आली पाहिजेस. लग्न कशासाठी केलंय मी तुझ्याशी?'' आई सोबत वडिलांचे पशूसारखे वागणे तिने प्रत्यक्ष डोळ्याने पाहिलेले असते. त्यामुळे आपल्या आयुष्यात पुरुष येणारच नाही, याची व्यवस्था ती करते. आणि शुक्राणू बेबीला (दिशा) जन्म देते.

नाटकाच्या दुसऱ्या अंकात दिशा सतरा ते अठरा वर्षाची झालेली दाखवली आहे. दिशाला प्रत्येकजण तिच्या वडिलांविषयी विचारणा करतात. तेव्हा ती जन्म दिलेल्या आईला विचारते पण तिलाही याचे उत्तर देता येत नाही. उलट ती दिशाला आपल्याच मार्गाने जाण्यास सांगते.पण दिशाला असे जीवन जगावेसे वाटत नाही. तिला लग्न करायचे असते. दुसरीकडे अनभिज्ञ वडिलांची बेबी समाजाला मान्य नसते. या गोष्टीला दिशा कंटाळून लग्नच करायचे नाही, असे ठरवते. तिची होणारी घुसमट प्रगतीला पाहवत नाही. प्रगतीची आई प्रगतीला म्हणते, ''प्रगती, खूप चुकीचं पाऊल तू उचललंस आणि सुरूंग लागला, दिशाच्या जीवनाला. ती बळी ठरली तुझ्या या अतिरेकी वागण्याची.'' समाजाला अव्हेरून लग्न न करता झालेली शुक्राणू बेबी (दिशा) आहे हे कळताच क्षितिजची आई (प्रचिती) व सासू (प्रचितीची सासू) या दोघांच्या (क्षितिज आणि दिशा) लग्नाचा विचार करावा लागेल असे बोलून निघून जातात. प्रगती या जगात दिशाला आणून तिचे जीवन उद्ध्वस्त करते. अनेक अर्थांनी हा विषय आपल्यासमोर प्रश्न उपस्थित करतो.

'मातीला सुगंध फुलांचा' (२००५, सुनंदा साठे) या नाटकात नाट्यलेखिकेने मध्यमवर्गीय कुटुंबातील माणसांचे स्वभावदर्शन घडविले आहे. मानवी आयुष्यातील कुटुंब ही पायाभूत अशी आधारशीला आहे. माणसाला मानसिक आणि भावनिक सुरक्षितता मिळण्यासाठी, उच्च आदर्श, जीवनमूल्ये मिळवण्यासाठी कुटुंबाची गरज असते. त्याचेच पडसाद समाजजीवनावरही उमटतात. कोणतीही व्यक्ती ही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या संपूर्णपणे कुटुंबाच्या आधीन असते. कुटुंबातील संस्कारानुसार ती घडत जाते. बदलत्या काळाप्रमाणे माणसाचे जीवन बदलते. त्याचे परिणाम कौटुंबिक जीवनावर होतात. कुटुंबातील व्यक्तींच्या एकमेकांबद्दल काही अपेक्षा असतात. एकमेकांनी एकमेकांच्या भावनांना जपणे, एकमेकांनी एकमेकांच्या दृष्टिकोणातून कर्तव्यपालन करणे इत्यादी गोष्टींवर ही नाती टिकून राहतात. कधीकधी कुटुंबातील एकमेकांसंबंधी असलेल्या अपेक्षांना तडे जातात. त्यामुळे त्यांचे अंतस्थ संघर्ष होतात. त्यातून समस्या निर्माण होतात. आपण सर्वजण एकमेकांशी मनाने बांधील असतो. कुटुंबातील व्यक्तीचे मानसिक संतुलन बिघडले की समस्या निर्माण होतात. पती-पत्नीपैकी कोणाच्यात शारीरिक अथवा मानसिक विकृती असेल तरीही समस्या निर्माण होतात. कधीकधी समस्येला तीच व्यक्ती जबाबदार असेल असे नाही.

मानवी नातेसंबंधाचा शोध घेतला असता एक गोष्ट प्रकर्षाने

जाणवते की, वैवाहिक जीवनातील बाळाचा जन्म ही घटना अत्यंत आनंददायी अशी असते. विवाहानंतर पती-पत्नीला मूल हवे असणे ही स्वाभाविक इच्छा आहे. त्यादृष्टीने कुटुंबामध्ये वंशसातत्य हा भाग महत्त्वाचा मानला जातो. 'मातीला सुगंध फुलांचा' या नाटकातील रमाबाईचा मुलगा जयंत आपल्या संसारात पती, मित्र, पिता, सखा अशा सर्व भूमिका कुशलपणे पार पाडत असतो. त्याची पत्नी अनुश्री मात्र सासूला नेहमी इंगळीसारखी डंख मारत असते. एक दिवस अनूमध्ये सुधारणा होईल ह्या विश्वासावर तिचे बोलणे रमाबाई (सासू) सहन करतात. त्या घरातील शांती ढळू देत नाहीत. अनुश्रीच्या लग्नाला चौदा वर्षे होऊनही तिला मूल होत नाही. त्यामुळे ती कुटुंबियांना बोलताना वेड्यासारखी मोठमोठ्याने हसते. निरू तिच्या खांद्यावर हात ठेवून तिला आवरण्याचा प्रयत्न करते. पण तिचेही हात झिडकारते आणि म्हणते, ''कुणाचीही गरज नाहीयाय मला. मला जगू द्या एकटीला. नकोय मला कुणाचंही बंधन. मी स्वतंत्र आहे. स्वच्छंद, बेफाम.''

असे म्हटल्यावर सर्वजण सुन्न होतात. निरू व रमाच्या डोळ्यांत पाणी येते. एक मानसरोगतज्ज्ञ रमाला सल्ला देतात.''ज्या बायकांना मूल होत नाहीत, त्या असं वागतात. घरात मूल आणा म्हणजे सगळं आपोआप ठीक होईल.'' अनूला बाळ नसल्यामुळेच ती वेड्यासारखी वागते आहे, हे जयंताच्याही लक्षात येते. तेव्हा पंधरा दिवसाच्या आत बाळाला आणून त्याचे बारसे करून त्याचे नाव चैतन्य ठेवून त्याला दत्तक घेतात. नावाप्रमाणेच चैतन्य अभ्यासात आणि खेळात हुशार असतो. चैतन्य घरात आल्याने अनुमध्येही खूप बदल होतो. पण तिच्या विलासी वृत्तीत फारसा बदल होत नाही. बाळाच्या संगोपनातही ती कमी पडते. रमाबाई (सासू) चैतन्याची खूप काळजी घेते. पण कालांतराने त्यांच्या सुखी कुटुंबाला केशव मामाची (अनूचा भाऊ) वक्रदृष्टी लागते. अशी कंस प्रवृत्तीची (वाईट प्रवृत्तीची) माणसे कुटुंबात आली की, नवीन समस्या निर्माण होतात. केशवमामा चैतन्याची लॉन टेनिसची रॅकेट विनाकारण तोडून टाकतात आणि स्वत: बचावात्मक पवित्रा घेतात. नंतर त्याचे बहिणीकडे येणे-जाणे वाढते. ''अनु-जयंताचा तू मुलगा नाहीस.'' म्हणून चैतन्याचे डोके केशवमामा भडकवतो. चैतन्याला व्यसनी बनवतो. वडिलांच्या खिशातून पैसे चोरायला सांगतो. हे जेव्हा आजीला (रमा) कळते तेव्हा चैतन्याला विश्वासात घेऊन ती त्याची समजूत काढते. यानंतर चैतन्याला आपली चूक लक्षात येते. केशवमामाही बहिणीची माफी मागून घर सोडून निघून जातात. समाजातल्या कंस प्रवृत्तीच्या माणसांना वेळीच धरबंद घातला नाही तर ते कुटुंब पोखरून काढतात. यातून अनेक समस्या उभ्या राहतात. प्रस्तुत नाटक सामाजिक दोषांवर टीका करीत, ते कसे दूर करता येतील याचा उहापोह करते.


'मला जगायचं आहे' (२००५, सुनंदा साठे) या दोन अंकी नाटकात पालक आणि पाल्य यांच्यात सुसंवाद नसल्याने कोणते प्रश्न (समस्या) निर्माण होऊ शकतात, हे या नाटकाचा नायक श्रीपाद व त्याची आई (मामी) यांच्या माध्यमातून दाखविले आहे. श्रीपाद हा खूप मोठा झाला पाहिजे अशी त्याच्या वडिलांची इच्छा असते. पण वडिलांचा मध्येच हृदयविकाराने मृत्यू होतो. तरी श्रीपाद नंतर शिक्षणापासून वंचित होत नाही. तो दहावीत सर्वाधिक गुण मिळवतो. ही आनंदाची बातमी सांगण्यासाठी जेव्हा तो आईकडे येतो तेव्हा ती त्याच्याकडे लक्षच देत नाही. त्याच्या कोणत्याच अडचणी ती सोडवित नाही. त्यामुळे श्रीपाद व्यसनी बनतो. श्रीपादच्याच वयाची मुले त्याच्या आतेभावाची आहेत. परंतु ते शिस्तप्रिय आहेत. कोणतेच व्यसन त्यांना नाही. श्रीपाद मात्र सिगारेट, दारू, ड्रग्ज इत्यादी व्यसनाच्या आहारी जातो. सिव्हिअर ड्रग्जमुळे त्याचे लिव्हर काम करत नाही. औषधांचाही काहीही उपयोग होत नाही. शेवटी श्रीपादला त्याच्या बाबांची आठवण येते. तो म्हणतो, ''बाबा मला मरायचं नाही. मला मला जगायचं बाबा, खूप जगायचंय, खूप जगायंच.'' त्यानंतर श्रीपादची मान खाली पडते. शेवटचा श्वासही निघून जातो. पालकांनी पाल्याकडे व्यवस्थितपणे लक्ष देऊन त्यांच्याशी सुसंवाद ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा कुटुंबात अनेक प्रश्न (समस्या) निर्माण होऊ शकतात, हाच संदेश या नाटकातून नाट्यकर्तीने दिला आहे.

थोडक्यात स्त्रियांनी लिहिलेल्या नाटकातील समस्यांचे स्वरूप बहुपदरी आहे, असे जाणवते. या लेखात ज्या नाटकांचा उल्लेख आला आहे, त्यांतून सुशिक्षित मध्यमवर्गीय स्त्रियांच्या समस्या आलेल्या दिसतात.

**- डॉ. बालाजी पोतुलवार**
भ्रमणध्वनी : ९८२३४४४१०७

ग्रंथाली

**दुसरी आवृत्ती प्रसिद्ध!**




# टीपंवणी

**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**

'टिपं' म्हणजे थेंब आणि 'वणी' म्हणजे 'पाणी'. टिपंवणी म्हणजे थेंब थेंब पाणी. तसेच 'टिपं' म्हणजे अश्रूंचे थेंब. थेंबाथेंबाने अश्रू ढाळणे म्हणजे 'टिपं गाळणे'. टिपं आणि पाणी यांचा असा परस्परसंबंध!

**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

# झाडीपट्टी रंगभूमीचा नाट्यानुभव

**झाडीपट्टी रंगभूमी आजही कलावंतांनी परिश्रमपूर्वक जगवली आहे. या रंगभूमीवर काम करताना आलेले अनुभव या लेखातून लेखिकेने मुखर झाले आहेत.**

**ज्योती निसळ**



'**प्रा**योगिक रंगभूमी, हौशी रंगभूमी, समांतर रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी', असे रंगभूमीचे प्रकार मला माहीत होते. मी स्वत: व्यावसायिक रंगभूमीवर वावरलेही होते. पण झाडीपट्टी रंगभूमीबद्दल बरेच काही ऐकले होते आणि मनात उत्सुकताही होतीच की झाडीपट्टी रंगभूमी हा काय प्रकार आहे? तिथलं वातावरण, तिथली कार्यपद्धती तेथील नट-नट्या, तेथील कलाकार ह्यांना जवळून बघण्याची, जाणून घ्यायची.

मनात विचार आला आणि लगेचच तशी संधीही मला मिळाली. काही वर्षांपूर्वी मी 'महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धे'साठी परीक्षक म्हणून कोपरगावला गेले होते. तेथील माझे सहपरिक्षक म्हणाले, ''तुम्ही 'वात्रट मेले' नाटकाचे १६०० प्रयोग केलेत. मग या ना, आमचं झाडीपट्टीतील नाटक बघायला. नाहीतर असं करा ना... तुम्हीच या ना तेथे काम करायला.'' माझी उत्सुकता शिगेला पोहोचलेली. मी झाडीपट्टी रंगभूमी म्हणजे काय? नाटक कसं असतं? कसं करतात? या आणि अशा अनेक छोट्या-छोट्या गोष्टी त्यांना विचारायला सुरुवात केली. ते म्हणाले, ''तुम्ही स्वत:च या आणि अनुभवा.'' मी ही म्हटले, ''बघते नवऱ्याला विचारून?'' आणि तो संवाद तिथेच थबकला.

माझ्या मनातून तो विषय काही केल्या जायलाच तयार नव्हता. चिकटूनच बसला होता. विचारांचं वर्तुळ मनात सतत गरगरत होतं. माझ्या सहपरीक्षकाने सांगितलेल्या गोष्टी नजरेसमोर तरळू लागल्या. नाटक रात्री १०-१०.३० ला चालू होत. ते पहाटे ४.३०-५ वाजता संपत. रात्रभर नाटक चालू असत. कधी-कधी आजूबाजूच्या गावात नाटक असतं. सभोवार घनदाट जंगल, क्वचित कधी तरी बरा रस्ता. तोही कधी खाचखळग्याचा तर कधी दगडाळलेला... आणि तोही अरुंद... रात्री काळामिट्ट अंधार, नाटकाच्या मोसमात गारठवणारी थंडी... मन तिथच ओठंगलं. रात्रीच एवढं जागरण आपल्याला झेपेल का? एवढा कठीण प्रवास आपण करू शकू का? एवढ्या बोचऱ्या थंडीत आपण तग धरू शकू का? मनाने मनालाच प्रश्न विचारायला सुरुवात केली. 'त्या आदिवासी-नक्षलवादी लोकांच्या दुर्गम भागात नाटक करायला तुला काय वेड-बिड लागलंय का?' घरच्यांच्या प्रतिक्रिया... ह्या सगळ्या विचारांच्या उलट-सुलट धुमश्चक्रीत मन पुढे सरसावलं. धैर्याने म्हणालं, एकदा अनुभवून बघायला काय हरकत आहे...? आणि मनानं मग ठाम निश्चयच केला. आपण जायचं. झाडीपट्टी रंगभूमीवर काम करायला!

माझ्याबरोबर ज्येष्ठ अभिनेते कै. रमेश भाटकरही होते. आम्ही दोघेही रुजू झालो. 'जयदुर्गा नाट्य रंगभूमी' या प्रेसमध्ये. तेथील भाषेत प्रेस म्हणजे नाट्यसंस्था. पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया येथे साधारणपणे ही रंगभूमी कार्यरत आहे. 'वडसा' नावाच्या एका छोट्याशा गावी जवळजवळ चाळीस पेक्षाही जास्त नाट्यसंस्था आहेत. नाट्यव्यवसायातील एवढी मोठी उलाढाल मी पहिल्यांदाच बघितली.

धान-कापणीच्या हंगामात मंड्यांच्या हंगामास सुरुवात होते. ज्या गावात मंडई असते. त्या सगळ्यांच्याच घरी बहुतेक पाहुणे आलेले असतात. ह्या गाठीभेटीतूनच लग्नही ठरतात आणि पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी 'नाटक'ही ठेवलं जातं.

१९३० ते १९६२ हा झाडीपट्टी चळवळीचा सुवर्णकाळ होता. झाडीपट्टी रंगभूमीला प्राचीन परंपरा आहे. त्यावेळी मालगुजार तथा सधन शेतकऱ्यांकडून या नाटकांचे खास आयोजनही केले जायचे. 'संगीत' हा या नाटकाचा प्राण. प्रत्यक्ष गाणं आणि वादन ही नाटुकली खासियत. जवळजवळ ८० टक्के नटनट्या प्रत्यक्ष रंगमंचावर गातात. मला तर नेहमीच आश्चर्य वाटायचं. एवढं जागरण झाल्यानंतर, एवढ्या कडाक्याच्या थंडीत एवढ्या वरच्या पट्टीत, एवढ्या खड्या आवाजात हे कलाकार गाऊच कसे शकतात? मला तर बरेचदा मिठाच्या गुळण्या कराव्या लागायच्या. तेव्हा कुठे आवाज फुटायचा.

१९९५ नंतर झाडीपट्टीच्या शास्त्रोक्त नाटकांना उतरती कळा लागली, पण २००२ नंतर मात्र ही रंगभूमी नव्या जोमाने, नव्या दमाने बहरली. आज या नाटकाला वरच व्यावसायिक रूप आलंय. नाटक शास्त्रोक्त पद्धतीने करण्याऐवजी लोकांच्या मनोरंजनावर जास्त भर दिला जातो. 'लावणी' आणि 'रेकॉर्ड डान्स'ला तिथे जास्त मागणी असते. प्रेक्षकांची गर्दी व्हावी हाही एक हेतू असतो. ही स्थित्यंतरे प्रेक्षकांच्या अभिरुचीवर बदलत असतात. 'कोंबडी पळाली, तंगडी

धरून लंगडी घालायला लागली', 'वाट बघतोय रिक्षावाला' ही त्यांची खास आवडती गाणी. आमच्या नाटकातील 'मोरेश्वर, तू गौरीनंदना, वंदन तुजला नटेश्वरा' या नांदीने सगळं वातावरण पवित्र होऊन जायचं आणि त्या पावित्र्याच्या सुगंधाने भारलेल्या वातावरणात नाटकाला सुरुवात व्हायची. प्रत्येक अंकानंतर एक रेकॉर्डिंग डान्स, एक गाणं वा एक लावणी असणारच.



येथे नाटक फक्त मनोरंजनासाठी करीत नाहीत तर त्यातून समाजप्रबोधन करणे हा त्यांचा मुख्य उद्देश असतो आणि विषय ही अनेकविध असतात. दारू, व्यसन, पैशाचा हव्यास, स्त्रीवरील अन्याय, अत्याचार, प्रेमसंबंध, देशभक्ती, समाजाविषयी आपली बांधिलकी, माणुसकी वगैरे वगैरे.

पहिल्यांदा तर मला वाटलं, एवढ्या निबिड जंगलात, जिवघेण्या थंडीत नाटक बघायला येणार कोण? पण प्रत्यक्षात मात्र बघितलं. हजारोंच्या संख्येने लोक नाटक बघायला आलेत. नाटकाच्या ठिकाणी मोठा मंडप अगदी लग्नात असतो तसा असतो. आणि एखाद्या जत्रेचं वा मेळाव्याचं त्याला स्वरूप असतं. खुर्च्या, गादी, दरीचे (सतरंजी) वेगवेगळे तिकीट असते.

मातीचा रंगमंच, त्यावर दरी म्हणजेच सतरंजी असते. दोन माईक पण बहुतेक वेळा एकच माईक असतो. ह्या माईकची एक गंमतच मी तिथे अनुभवली. 'पाझर' ह्या नाटकात मी आणि माझा नवरा ह्या दोघांचा सीन होता. मी संवाद बोलले आणि माईक खाली-खाली जाऊ लागला. मला वाटलं, कनेक्शन कुठेतरी सैल झालं असावं. माईक खाली गेला आणि माझ्या नवऱ्याने (अर्थात तो खाली बसला होता. मी उभे होते.) संवाद म्हटल्यानंतर माईक परत सरसर वर माझ्या तोंडासमोर आला आणि मी पुढचे संवाद बोलायला सुरुवात केली. मग लक्षात आलं. पात्रांच्या आकृतिबंधानुसार माईक दोलायमान होत असतो आणि हे अनुभवताना खूपच गंमत वाटली.

माईकची अजून एक गंमत मी अनुभवली. नाटकात जो कलाकार माईकसमोर असतो. तो माईक सोडतच नाही आणि माईक अगदी तोंडाजवळ नेऊन बोलतो. त्यांना आम्ही कित्येकदा सांगितलं. 'अरे, सगळ्यांचेच बोलणं प्रेक्षकांपर्यंत पोहचायला हवं. तुमचं बोलणं झालं की, तुम्ही थोडं बाजूला होत जा. म्हणजे दुसरा बोलेल. दुरून म्हणजे थोडंसं दुरून बोलला तरी माईक आवाज पकडतो. एवढं तोंड जवळ ठेवून बोलायाची गरज नाही. काहीनी त्याप्रमाणे केलं. पण एकजण मात्र आपल्या सवयीत बदल करायलाच तयार नव्हता. एकदा रमेश भाटकर (सगळे त्यांना काकाजी म्हणायचे) म्हणाले, ''नाही मला वाटलं, तू आज काही खाल्लं नसावं म्हणून माईक खाणार की काय?' त्यावर तो मुलगा म्हणाला, 'मले काही कडल नाही काकाजी. कळलं ला कडलं म्हणायचे. म्हणजे ळ ला ड. त्यावर रमेश भाटकर म्हणाले, 'अरे तू माईक किती तोंडाजवळ नेऊन बोलतो आहेस. असं वाटतं आता तू माईक खाशील. तो उत्तरला, 'असं व्हय. आता मले कडलं! आणि हळूहळू सगळ्यांनाच हे कडलं... सॉरी.. कळलं...

तेथे 'संवाद' बोलण्याची एक वेगळीच पद्धत होती. 'पाझर' या नाटकात माझा व मुलाचा 'सीन' असतो. तालीम चालू झाली. त्यानं बोलायला सुरुवात केली. (अर्थात तो सावत्र मुलगा असतो.) 'मी तुहा सावत्र मुलगा हाय म्हून तू असं बोलतो', मी त्याला म्हटलं. 'बोलतो नाही बोलते.' तो उत्तरला, 'न्हाय बोलतो बराबर हाय.' दुसरा सीन होता सुनेबरोबरचा. ती मला म्हणाली, 'तू माझ्या दादल्याच्या वाटला जाऊ नगस. एकदाच सांगतो. पुन्यांदा न्हाय सांगनार.' माझ्या डोक्यात प्रकाश पडला - मुलगा.. मी सांगते, करते, बोलते आणि मुलगी सांगतो, करतो, बोलतो म्हणणार.

पहिल्यांदा - त्यांचे उच्चार ऐकले की कानाला विचित्र वाटायचं. गोंधळायला व्हायचं पण हळूहळू सवय झाली कानानांही आणि आम्हालाही. पण शब्दाचं व्याकरण आणि बोलण्याच्या लिंगाचं गणित आम्ही त्याच्या माथी मारतच राहिलो. काहींना कडलं अन् काहींना नाही. त्यांची बोलीभाषा वेगळी होती. पण कानाला मात्र ती खूप गोड वाटायची. त्या बोलीभाषेतून एक अनामिक निरागसपणा ओघळत राहायचा. त्यांची, आमची बोलीभाषा वेगळी होती. अगदी थोडीशी पण प्रयोग दररोज उत्तरोत्तर रंगत जायचा. रात्र सरून पहाट कधी व्हायची. हे कडायचंही नाही. (कळायचंही)

संपूर्ण नाटक हे 'प्रॉम्पटिंग'वर चालत असल्यामुळे कुठलाही नट-नटी, कुठल्याही क्षणी, कुठल्याही भूमिकेसाठी उभे राहतात. पण कमालीची दक्षता मात्र बाळगतात. प्रॉम्पटर विंगमध्ये आहे की नाही हे बघण्याची. आम्ही त्यांना सांगितलं. आम्हाला प्रॉम्पटिंग घ्यायची सवय नाही. व्यावसायिक नाटकात ते नसतं. उलट तुम्ही प्रॉम्पटिंग केलं तर आम्ही 'डिस्टर्ब' होऊ. त्याचा भाबडा प्रश्न, ''असं कसं वाक्याला 'टचिंग' तर हवंच. आणि तुम्ही चुकलात तर?'' अविश्वास त्याच्या डोळ्यांतून ठिबकतो. ''आम्ही नाही

चुकणार...'' आमचा ठाम आत्मविश्वास, त्याचं असमाधान त्याच्या चेहऱ्यावर उमटतं. पण आम्ही मात्र त्याकडे दुर्लक्ष करतो. बिच्चारा गप्प-गप्प-प्रॉम्पटर.

'झाडीपट्टी रंगभूमी'वर हिरो-हिरोईनपेक्षा खलनायक-खलनायिकेला जास्त महत्त्व दिलं जातं. ते कलाकार तगडेच हवे. तेथील अभिनय व मेकअप दोन्हीही खूप लाऊड आणि भडक असतो. भडक मेकअपविषयी त्यांनी मला सांगितलं, ''अहो मॅडम.. नाहीतर तुमच्यात अन् सामान्य माणसात काय फरक? तुमचे डोळे, त्यातील भाव, अगदी प्रेक्षकांतल्या शेवटच्या लाईनीतील प्रेक्षकाला दिसायला हवेत की नकोत?'' मी निरुत्तर. पहिल्या पहिल्यांदा मेकअप करून आरशात बघितलं की, रंग फासल्यासारखं वाटायचं पण हळूहळू मात्र त्या मेकअपचीही सवय झाली आणि 'ऑड' वाटणं बंद झालं.

बहुतेक येथील नाटकात पडद्याचे सेट्स असतात. पण काही संस्थाच्या नाटकात 'बॉक्स सेट्स' आणि जास्त माईक असतात. असंही मी ऐकलं आहे. मेकअप रूमसुद्धा पडद्याच्याच असतात. प्रत्येक स्त्रीकलाकारासाठी एकेक गादी व एकेक लाईट असतो. पण पुरुष कलाकारांसाठी वेगळी गादी व वेगळा लाईट नसतो. स्त्रीकलाकार स्वत:चा मेकअप स्वत:च करतात पण पुरुषांसाठी मात्र मेकअपमन असतो.

रंगमंचावर जायला बहुतेक वेळा मातीची पोती टाकलेली असायची. नाहीतर मातीचा उतार असायचा. मला तर म्हणावं लागायचं. 'अरे बाबा, मला स्टेजवर चढायला हात द्या. नाहीतर त्यावर पाय घसरायचे. क्वचित कधीतरी लोखंडी शिडी नाहीतर लाकडी शिडी असायची.

संक्रात, होळीच्या आधी मंड्याचा सिझन असतो. संक्रातीनं तर शंकरपटाचे कार्यक्रम होतात. बैलांच्या शर्यती जेव्हा गावात होतात. त्यावेळीही ह्या नाटकांचे प्रयोग होतात. त्या सीझनमध्ये कडाक्याची थंडी असते. सगळेच कलाकार स्वेटर, हातमोजे, पायमोजे, कानटोपी घालतात. त्यांची 'एंट्री' झाली की, ते हा सगळा थंडीचा लवाजमा उतरवून ठेवतात व रंगमंचावर 'एंट्री' घेतात. आम्हाला तर स्वेटर काढून रंगमंचावर एंट्री घ्यायची म्हटली तरी अंगावर काटा यायचा. पण शेवटी मनाचा 'हिय्या' करून स्वेटर काढायचो. बऱ्याचदा जिवघेण्या या थंडीपासून सुटकारा व्हावा म्हणून शेकोट्या पेटवून आम्ही सर्व कलाकार त्याभोवती बसायचो. पहाटे साधारणपणे साडेतीन-साडेचार वाजता दव पडायचं. तेही अल्प पावसाच्या रूपानं. बसायलाही बऱ्याचदा जागा नसायची. तिथलं एक प्रसिद्ध गाणं- 'ओला. ओला झालो मी.' नकळत आमच्याही तोंडून निघायचं.

तेथे खूप गरिबी आहे. नाटकात काम करणारे बरेचसे कलाकार छोटी-छोटी कामे करतात. कोणी दुकानात काम करतात. कुणी दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करतात. आमच्या नाटकात काम करणाऱ्या दोघी तर दिवसभर जंगलातून काटक्या गोळा करून त्याची मोळी करून आणायच्या आणि विकायच्या. दिवसभर कामासाठी राबणारे हात रात्री चेहऱ्यावर रंग चढविण्याचे काम करायचे. आणि एकदा रंग चेहऱ्यावर चढला की, प्रत्येकजण आपापल्या भूमिकेत चपखल शिरायचा. त्या कष्टाची एकही सुरकुती त्यांच्या चेहऱ्यावर नसायची. 'पोटासाठी दाही दिशा आम्हा फिरविसी जगदिशा' ह्या उक्तीचं ज्वलंत उदाहरण तिथे आमच्या प्रत्ययास आले. त्यांचा दांडगा उत्साह, त्यांचं ऊर्जेनं ओतप्रोत भरलेले व्यक्तित्व बघून त्यांना खरोखरच सलाम करावासा वाटतो. ह्या प्रतिकूल परिस्थितीतही सगळेच कलाकार व प्रेक्षकसुद्धा अगदी शेवटपर्यंत बसलेले असतात आणि नाटकाचा मनमुराद आनंद लुटतात. त्या सर्वांच्याच जिद्दीचं खूप खूप कौतुक.


'झाडीपट्टी रंगभूमीवर' काम करताना काही गोष्टी मात्र खूप खटकल्यात. 'मेकअपरूम' कपड्याची. तिथंच मेकअप करायचा, तिथंच खायचं, एंट्री येईपर्यंत तिथंच झोपायचं, तिथंच कपडे बदलायचे. त्या कपड्यांच्या तंबूतून 'शॅडो' बाहेर दिसते आणि एवढंच नाहीतर कलाकार त्याच तंबूत बाजूला 'लघुशंका'सुद्धा करतात. त्यांच्यासाठी एखादं 'बाथरूम'सुद्धा नसत. हे आरोग्याच्या दृष्टीने खूप हानिकारक आहे. एवढ्या घनदाट जंगलात, नक्षलवाद्यांच्या मुलखात अर्थात ते नक्षलवादी लोक कलाकारांना त्रास देत नाहीत. उलट ते नाटकाला येऊन बसतात असे तिथले लोक आम्हाला सांगायचे तर येथे हिंस्त्र जनावरांपासून प्रोटेक्शन मिळणं खूप गरजेचं आहे.

आमच्याच नाटकातल्या अश्विनेने आम्हाला सांगितलं होतं. ''आमी मात्र नाटक वाजवायले (करायला) गेलो व्हतो. तवा एका बाईले वाघानं खाल्लं.'' ह्या नाटकातील कलाकाराचं काम कितीही चांगलं झालं तरी तेथील संयोजक 'तुमचं काम चांगलं झालं नाही म्हणून पैसे कापतात विशेषत: स्त्रियांचे. त्यांचा 'जीवनविमा' असायला हवा असं मनापासून वाटतं. बरं आपण त्या निर्मात्यांना काही सांगावं तर ते म्हणतात, ''मॅडम आमच्या मुलींना असल्या सवयी नाहीत. उगाच काही शिकवू नका.''

तिथल्या बोचऱ्या-गोठवणाऱ्या थंडीपेक्षाही तेथील लोककलाकारांची पोटासाठीची-जगण्यासाठीची धडपड आजही मनात सलते आहे-बोचते आहे. तेथील कलाकार उमेदीने, जिद्दीने 'झाडीपट्टी रंगभूमी' जगवताहेत. भविष्यात आशेच्या किरणांची प्रतीक्षा करताहेत. त्यातल्या त्यात स्त्रीकलाकार घर सांभाळून 'कोरभर भाकरीच-वितभर कपड्यांचं स्वप्न मनात लेवून 'टीचभर पोटासाठी' तोंडाला रंग लावून गावोगावी, रानमोळी 'नाटक' करीत फिरताहेत. तेही जगण्यासाठी-स्वत:च्या अस्तित्वासाठी-एवढंच नाही तर स्वत:च्या पोटाची खळगी रिकामी असताना सुद्धा त्या नाटकातून समाजप्रबोधन करतात, हेच तिथलं वास्तव!

**- ज्योती निसळ**
भ्रमणध्वनी : ९८२०३८७८३८

# 'थप्पड' - जाणिवेची नवी दिशा



संतोष पाठारे


**समाजातील स्त्रीचं असलेलं स्थान हा प्रत्येक काळात चर्चेचा विषय ठरत असतो. कलाकृतीतून त्याचा वेध घेण्याचं काम कलावंत करत असतात. 'थप्पड'मधून अनुभव सिन्हाने त्याचा एक वेगळा आयाम प्रेक्षकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केलाय.**

**स्वे**च्छेने गृहिणीपद स्वीकारलेल्या स्त्रीची नेमकी अपेक्षा काय असते? कुटुंबातील व्यक्तींच्या आनंदात स्वत:चा आनंद शोधणाऱ्या स्त्रीने त्याबदल्यात आदर आणि प्रेमाची अपेक्षा केली तर तो अपराध ठरतो का? ज्याच्याबद्दल प्रेमभावना संपली त्या नवऱ्याला सोडून देण्याचा निर्णय घेणारी स्त्री, सामाजिक संकेत तोडून बंडखोरी करते का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न अनुभव सिन्हाने दिग्दर्शित केलेला 'थप्पड' हा चित्रपट करतो. घरातील स्त्रीला गृहीत धरणाऱ्या पुरुषांना आत्मपरीक्षण करायला लावणारा आणि स्त्रियांना स्वत्वाचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारा 'थप्पड' हा अनुभव सिन्हाच्या 'मुल्क' आणि 'आर्टिकल १५' नंतर दिग्दर्शक म्हणून आलेख वाढवणारा आहे. अनुभव सिन्हाच्या 'मुल्क', 'आर्टिकल १५' आणि आताचा 'थप्पड' या तिन्ही चित्रपटाच्या कथा, त्यातील वातावरण आणि व्यक्तिरेखा या वेगवेगळ्या असल्या तरी दिग्दर्शकाच्या दृष्टिकोणामध्ये मात्र एकसामनता आहे. प्रदूषित नजरेने पाहिला गेलेला मुस्लीम समाज, उपेक्षित दलित आणि घरात गृहित धरली गेलेली गृहिणी या घटकांकडे सहानुभूतीने पाहण्याची नजर अनुभव सिन्हाकडे आहे. 'थप्पड'मध्ये मृण्मयी लागू वायकूळने अनुभव सिन्हाला पटकथालेखनात सहाय्य केले आहे. मृण्मयी, मराठी चित्रपटसृष्टीमध्ये एक संवेदनशील अभिनेत्री म्हणून प्रसिद्ध आहे. 'थप्पड'ची पटकथालेखिका म्हणून तिची कामगिरी चमकदार आहे. चित्रपटाच्या सुरुवातीला काळ्या पार्श्वभूमीवर येणारी श्रेयनामावली, त्यामागोमाग चित्रपटातील सहनायिकांचा दिल्लीच्या रस्त्यावरील त्यांच्या सोबत्याबरोबरची भटकंती, प्रत्येकीच्या हातातील साधासुध्या अपेक्षांचं प्रतीक असलेली आईस्क्रिम कॅण्डी, ही दृश्यमालिका चित्रपटाच्या पुढील घटनांचं सूचन करते.

'थप्पड'ची नायिका आहे अमृता! मध्यमवर्गीय घरात जन्माला आलेला व नृत्याची आवड असलेल्या अमृताने विक्रमशी लग्न केल्यानंतर गृहिणी म्हणून राहण्याचा स्वेच्छेने निर्णय घेतलाय. विक्रम महत्त्वाकांक्षी आहे. वडिलांच्या व्यवसायापासून वेगळा होऊन एका मल्टिनॅशनल कंपनीमध्ये तो काम करतोय. कंपनीच्या लंडनमधील प्रोजेक्टसाठी त्याची प्रमुख म्हणून निवड होईल अशी त्याला अपेक्षा असते. त्यासाठी तो जिवतोड मेहनत घेतो. अमृता त्याला तिच्या क्षमतेनुसार साथ देते. या प्रोजेक्टसाठी निवड झाल्याची बातमी समजताच तो घरी एक पार्टी आयोजित करतो. मात्र पार्टीमध्ये त्याचा एक वरिष्ठ त्याला या प्रोजेक्टमध्ये त्याचं स्थान दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं सांगतो. विक्रमची त्याच्याबरोबर बाचाबाची होते. अमृता त्याला सावरायला जाते, मात्र रागाच्या भरात विक्रम अमृताला थप्पड लगावतो. विक्रमने असं अचानक मारणं अमृताला सुन्न करून जातं. विक्रमच्या घरातील तिचं नक्की स्थान काय? आजवर ज्याची स्वप्न पूर्ण व्हावीत म्हणून आपण आपल्या स्वप्नांकडे दुर्लक्ष केलं, त्याने सर्वांसमक्ष आपल्याला अशी वागणूक का दिली? हा प्रश्न तिला भंडावून सोडतो. विक्रमबद्दल वाटणारं प्रेम ती एक घटना संपवून टाकते. ज्या व्यक्तीबद्दल आपल्याला प्रेमच वाटत नाही. त्याच्याबरोबर राहण्यात काय अर्थ? हा विचार करून ती विक्रमचं घर सोडण्याचा निर्णय घेते. अमृताचा निर्णय तिच्यासाठी व तिच्या आसपासच्या माणसांसाठी एक नवीनच आव्हान घेऊन येतो.

चित्रपटाची सुरुवात अमृता-विक्रमच्या दैनंदिन आयुष्याच्या चाकोरीबद्ध घटनांनी होते. विक्रमला ऑफिसची तयारी करून देण्यासाठीची लगबग आणि त्यानंतर शिवानी या शेजारणीच्या मुलीला नृत्य शिकवण्यासाठी दिलेला थोडा वेळ, यामध्ये अमृताचा दिवस विभागलेला असतो. सासूची काळजी घेणारी, आई-वडिलांची ख्यालीखुशाली विचारणारी अमृता ही कोणत्याही मध्यमवर्गीय स्त्रीची प्रतिनिधी आहे. तिच्या आसपासच्या इतर स्त्रियासुद्धा सामाजिक चौकटीत बांधल्या गेलेल्या! तिच्या आईने, संध्याने मुलांचा सांभाळ करण्यात स्वत:च्या गाण्याच्या हौसेला कधी काळी मुरड घातलेली! विक्रमची आई नवऱ्याला सोडून विक्रमच्या घरी राहतेय. मोलकरीण सुनीता रोज रात्री नवऱ्याचा मार खाते पण हसतमुखाने अमृताच्या घरी काम करते. शिवानीने नवऱ्याच्या मृत्यूनंतर इतर कोणत्याही पुरुषाचा विचार केलेला नाही आणि सुप्रसिद्ध वकील नेत्रा कोर्टात अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळवून देत असली तरीही घरात मात्र नवऱ्याच्या शोषणाला बळी पडते.

'थप्पड'मधील स्त्री व्यक्तिरेखाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांना




आपण ज्या व्यवस्थेला स्वीकारलंय त्याची जाणीव आहे. या स्त्रियांनी बंडाचं निशाण उभारलेलं नाही. मात्र आपलं स्वत्व जपण्यासाठी त्यांनी एक पाऊल पुढे टाकलं आहे. अमृताने घर सोडून येणं तिच्या आईला पटलेलं नाही, परंतु ती अमृताच्या निर्णयाचा अनादर करीत नाही. सरिताला उशिरा का होईना तिच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होते व मी तिच्या नवऱ्याला याचा जाब विचारते, त्याच्यावर हातही उगारते! स्वत: अमृता नवऱ्याने मारलेल्या ‘थप्पड’मुळे सैरभैर होते. आपलं नवऱ्याच्या नजरेत काय स्थान आहे याचं भान तिला या घटनेनं येतं. सासू आपल्याकडे तिच्या मुलाची बायको म्हणूनच पाहतेय, हे जाणून ती व्यथित होते. आपण ज्याच्यासाठी इतर गोष्टी दुय्यम ठरवल्या त्या माणसाच्या आयुष्यात आपलं स्थान दुय्यम आहे. या भावनेनं ती कोलमडून पडते. तिला नवऱ्याकडून हवं असतं ते प्रेम आणि आदर! पण या दोन्ही गोष्टी जर मिळणार नसतील तर त्याच्या आयुष्यातून आपण दूर जाणं योग्य आहे या निर्णयाप्रत ती येते. यावेळी चित्रपटात येणारं ‘टूट के हम दोनों में जो बचा वो कम सा है, एक टुकडा धूप का, अंदर अंदर नमसा है’ हे गाणं अमृताची मनोवस्था नेमकेपणानं व्यक्त करतं.

‘थप्पड’ कोणत्याही कुटुंबात अनपेक्षितपणे घडू शकेल अशी एक घटना व त्यानंतर त्या घटनेचे पडलेले पडसाद याचं चित्रण करतो. घरगुती हिंसाचारात स्त्रीचं भावविश्व गढळून जात असतं. अशी स्त्री सन्मानाने जगू इच्छिते, त्यासाठी तिला कुटुंबियांनी किमान मानसिक आधार देण्याची गरज ‘थप्पड’ अधोरेखित करतो.

मृण्मयी लागू व अनुभव सिन्हाच्या प्रवाही पटकथेचं शौनिक मुखर्जीनं केलेलं सहज प्रकाशचित्रण आणि मंगेश धाकडेचं परिणामकारक पार्श्वसंगीत यामुळे ‘थप्पड’ लक्षणीय ठरतो. आजवर आलेल्या स्त्रीवादी चित्रपटांपेक्षा अमृता व तिच्या अवतीभवतीच्या स्त्री व्यक्तिरेखा साकारणाऱ्या तापसी पन्नू (अमृता), रत्ना पाठक शहा (संध्या), दिया मिर्जा (शिवानी), माया सराव (नेत्रा) या अभिनेत्रींच्या भूमिका अत्यंत नैसर्गिक झाल्यात. या सर्व अभिनेत्रींच्या बरोबरीने गितिका विधाने साकारलेली मोलकरीण सुनीताची भूमिका सर्वात लक्षवेधक ठरली आहे. सुनीताचा बेधडक, बिनधास्तपणा गितिकाने भन्नाट रंगवला आहे.

कुमद मिश्रा (वडील), पावेल गुलाटी (विक्रम), मानव कौल (रोहित जयसिंग) यांनी देखील वेगवेगळ्या पुरुषी मनोवृत्तीचं दर्शन समर्थपणे घडवलं आहे.


समाजातील स्त्रीचं असलेलं स्थान हा प्रत्येक काळात चर्चेचा विषय ठरत असतो. कलाकृतीतून त्याचा वेध घेण्याचं काम कलावंत करत असतात. ‘थप्पड’मधून अनुभव सिन्हाने त्याचा एक वेगळा आयाम प्रेक्षकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केलाय. हा प्रयत्न आजच्या काळातील स्त्रीचा खरखुरी मानसिकता जोखण्याच्या खूप जवळ जातो हेच त्याचं श्रेय आहे.

**– संतोष पाठारे**
भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७
santosh_pathare1@yahoo.co.in

ग्रंथाली

# तिसरा डुळा

**किरण येले**



आपण पाहतो की जनावरांचे कळप नव्या जन्मलेल्या पिलांना मध्यभागी ठेवत, म्हाताऱ्या आणि आजारी प्राण्यांना मागे ठेवत प्रवास करतात. हेतू हा की एखाद्या हिंस्र प्राण्याने हल्ला केला तर या नको असलेल्या प्राण्यांचा आधी बळी जावा. माणसाचे वेगळेपण येथेच आहे. थकलेल्या, आजारी, कमकुवत माणसांना मध्यभागी ठेवत त्यांना तगवण्याचा, जगवण्याचा प्रयत्न करतो, तो ‘माणूस’ अशी खरेतर माणूसपणाची व्याख्या आहे. आपण पाहतो की अशा कमकुवत, आजारी, पिचलेल्या लोकांनाच संपवण्याचा प्रयत्न काहीजण करत आहेत. या सगळ्या कथा, अशा संपलेल्या लोकांच्या आहेत.

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

# मानसिक आरोग्याच्या मार्गावरून स्त्रीचा प्रवास



**डॉ. राजश्री देशपांडे**

**समाजव्यवस्थेतून घडत गेलेल्या स्त्रीच्या मानसिकतेचा तिच्याच आरोग्यावर असा परिणाम होत असतो. त्यामुळे स्त्रिया पुरुषांहून किती तरी अधिक प्रमाणात नैराश्याच्या आणि नैराश्यासंबंधित मानसिक आजाराच्या बळी होतात प्रत्येक चार ते दहा महिलांमागे एक असं नैराश्याचं प्रमाण आहे आणि पुन्हा यातल्या कित्येकजणी (बहुतेक जणी) उपचारापर्यंत पोहचू शकत नाहीत.**

**ती** जळत होती तेव्हा नेमकं काय वाटलं असेल? आणि ॲसिड भाजत जाताना? योनीची १०-१२ जणांच्या अत्याचाराने चिरफाड होताना काय वाटलं असेल, जेव्हा पंधरा-सोळा वर्षांच्या शाळा शिकत्या मुलीला सुरक्षितता अन् सुटका म्हणून उजवलं जात असेल? काय वाटत असेल जेव्हा अनेक संधी नाकारल्या जात असतील? आणि जर आव्हाने स्वीकारून धोके पत्करून ती आलीच खुल्या आकाशात तर, जेव्हा कापले जात असतील तिचे पंख. छिन्नविछिन्न केला जात असेल तिचा देह तेव्हा काय वाटत असेल? काय वाटत असेल जेव्हा तिला जमातीच्या प्रतिष्ठेचं, धार्मिक सूडाचं, कुटुंबाच्या इभ्रतीचं, जातीच्या मालकीचं साधनं म्हणून वापरलं जात असेल?

काय वाटणार आहे म्हणा... वेदना अपमान, निराशा, संघर्ष या साऱ्याचा चिखल तुडवतच ती शतकानुशतकांची वाट चालतेय. तिची वाटही गवसतेय तिला.

या वाटचालीची कुठली किंमत तिला चुकवावी लागतेय? आणि तिची वाट रोखू पहाणाऱ्याला नेमकं काय वाटत असेल, तिची तडफड बघितल्यानंतर? तिचा हात धरणाऱ्या, तिला आश्वस्त करणाऱ्यांना काय वाटत असेल? एकमेकींना अशा वाटांवरून प्रवास करताना बघून त्यांना एकमेकींबद्दल काय वाटत असेल? एकमेकींना अशा वाटांवरून प्रवास करताना बघून त्यांना एकमेकींबद्दल काय वाटत असेल?

कुणाला काय वाटत असेल या प्रश्नांचा कापूस घेऊन पिंजत बसलेय. मी कधीची काही उभे काही आडवे धागे कातले जातायत. किती गुंतागुंतीची आहे वीण? समजून घ्यावी म्हटली तर किती धागे उसवावे लागतील?

आमच्या तरुणपणात स्त्री चळवळीची ओळख अन् मनोविकार शास्त्राची ओळख समांतरपणेच होण्याचे दिवस होते. अन्याय, बंड, क्रांती, समाजव्यवस्था, परिवर्तन, इत्यादी शब्दांचं गारूड पडण्याचं वय. स्त्रियांच्या वेदना घुसमट त्याचा परिणाम. त्यांची मनोवस्था हे स्पष्ट बोलले जात होते. स्त्रियांच्या मानसिक अन् शारीरिक गरजा या स्वतंत्रपणे अस्तित्वात असतात हे मान्य केले जाऊ लागले होते.

स्वत:ला 'व्हिक्टीम' रोल मध्ये बघण्याने आत्मकरूणेचं सुखही मिळत होते, पण मनोविकारशास्त्रात खोल घुसायला लागल्यावर या प्रश्नांचे वेगळे कंगोरे लख्खपणे समोर यायला लागले. मानसिक आरोग्यावर पर्यायाने शारीरिक आरोग्यावर सामाजिक वास्तवावर, नात्यांवर होणारे त्याचे दूरगामी परिणाम जाणवायला लागले आणि पहिल्यांदा काय घडलं असेल तर 'ती आत्मकरुणा' वगैरेची भानगड थांबली. स्वच्छ दृष्टीनं शास्त्रीय पद्धतीनं समस्यांकडे बघता येऊ लागल.

दरम्यान स्त्रीचळवळीनेही पुरुषप्रधानतेच्या परिणामांचा अभ्यास विस्तारला होता. पुरुषांनीही यामध्ये भरडलं जाणं, त्यांची ही माणूस बनण्यातली कुचंबणा जाणवू लागलं होत अगदी मोजक्या का होईना पुरुषांनीही पुढाकार घेऊन स्त्रीचळवळीच्या 'स्त्रीपुरुष समानतेच्या तत्वाची' सर्वांच्याच मानसिक आरोग्यासाठी असणारी गरज ठामपणे मांडायला सुरुवात केली होती.

या सगळ्या पार्श्वभूमीवर मी प्रॅक्टीस करायला सुरुवात केली तेव्हा काही बेसिक गोष्टी स्पष्ट होत्या.

१) समाजव्यवस्थेमध्ये अनेक प्रकारचे भेदभाव Discriminations असतात. त्यातले स्त्री पुरुष भेदभाव हे दीर्घकालीन अन् सर्वदूर आहेत.

२) Discriminationचा परिणाम जेवढा Victims वर होतो तेवढाच त्याचा फायदा घेणाऱ्यांवर होतो.

३) स्त्रीपुरुष भेदभाव हा रुढी रिवाजात लादलेल्या फरकावरून किंवा नैसर्गिक फरकाच्या दांभिक पद्धतीने होणाऱ्या वापरावरून उघड केला जातो.

४) या भेदभावाच फायदा मिळणारे घटक हे भेदभाव टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न करणारच, पण फायदा न मिळणारेही पिढ्यान्पिढ्यांच्या संस्कारांनी तसे करणार.

५) भेदभाव टिकवण्यासाठी प्रत्येक घटकांच्या प्रतिमांचे ठराविक साचे अजून आवर्जून ठसवले जाणार.

६) या साच्यांमध्ये स्वत:ला कोंबून बसवण्याचा प्रयत्न करणारा प्रत्येक जण यात अवघडणार जायबंदी होणार.

स्त्री आणि पुरुषाच्या शारीरिक घडणींमध्ये तसेच विशिष्ट क्षमतांमध्ये फरक दिसून येतात. या फरकांमध्ये निसर्ग आणि

लहानपणापासूनचे संगोपन. संकेत, संस्कार या दोन्हीची वाटा असतो.

नसणारे फरकही रूढ समाजव्यवस्थेच्या फायद्यासाठी ठसवले जातात. जे फरक आहेत त्या फरकांना एका वर्गाला (इथे स्त्रियांना) कनिष्ठ ठरवण्यासाठी सोयीस्कर वापरलं जातं. बुद्धिमान, शक्तिमान पट्कन रागावणारा, आक्रमक, लैंगिकदृष्ट्या उतावीळ आणि स्वैर अशी पुरुषाची आदर्श प्रतिमा लादली जाते. लाजाळू, नाजूक, मर्यादशील, (लैंगिकदृष्ट्या शांत, थंड) समंजस अन् सहनशील अशी स्त्रीची आदर्श प्रतिमा रंगवली जाते, पण हे तथ्य नाही. दोघांच्या बुद्धिमत्तेत काही फरक नाही. शारीरिक जोर पुरुषात अधिक असला तरी चिवटपणा बाईत अधिक असतो. दृष्टीत अवकाशाचे भान पुरुषाला अधिक असले तरी रंगछटांचे भान स्त्रीला अधिक असते. संवाद क्षमता, सहसंवेदना आणि भावना नियोजन तसेच एकावेळी अनेक आघाड्यांवर लक्ष देण्याची क्षमता पण स्त्रियांमध्ये अधिक असते. दोघांमध्येही लैंगिक इच्छा असते. अभिव्यक्ती वेगळी असू शकते. असे क्षमतांमधले काही फरक सोडता लिंगानुसार स्वभाववैशिष्ट्ये ही वर्षांन्वर्षांच्या सामाजिक संकेत/संस्कारांनुसार बिंबवली जातात. आणि त्या संकेताविरुद्ध मूळ प्रवृत्ती उसळू बघते. अशावेळी जबरदस्त मानसिक झगडा होत असतो. अपराधी भावना दाटते. इच्छा, आवेग जबरदस्तीने रोखले जातात. दडपले जातात. नैसर्गिक स्वभावाला मुरड घातली जाते. याची परिणती मानसिक अस्वास्थ्यात/आजारात होते. आता इथे फक्त स्त्रियांमधल्या अशा दडपणांची आणि त्यातून उद्भवणाऱ्या मानसिक आजारांची जराशी झलक बघूयात.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला कायम दुय्यम पातळीवर ठेवलं गेलं त्यामुळे संधी नाकारल्या गेल्या, पण केवळ तेवढंच नाही तर त्यामुळे स्वभावातही काही बदल झाले. तिला कुठल्याही निर्णयात सहभागी न करून घेण्याने तिची निर्णयक्षमता झाकोळली गेली. त्यामुळे आपल्या स्वत:च्या निर्णयाची वर्तनाची जबाबदारी आपण स्वत: घ्यायची असते. ही जाणीव बऱ्याचवेळा महिलांना नसते. किंबहुना निर्णय घेता येणं म्हणजे खंबीर असतं. अन् बाईनं खंबीर असणं म्हणजे तिच्या पारंपरिक 'नाजूक' प्रतिमेला छेद देणारी गोष्ट. त्यापेक्षा ही निर्णयाची जबाबदारी दुसऱ्यावर ढकललेली बरी असेही बऱ्याच महिलांच्या वागण्यात दिसून येते. स्वत:च्या वर्तनाची जबाबदारी जे घेत नाहीत, त्यांना सतत इतरांच्या आदेशाप्रमाणे वागावे लागते. स्वातंत्र्याचा, स्वयंनिर्णयाच्या अधिकाराचा संकोच होतो. त्यातून घुसमट, नाकारलेपणाची भावना दृढ होत जाते. पण ही भावना दूर करायची झाल्यास स्वत:च्या निर्णयांची, वर्तनाची, त्याच्या बऱ्या वाईट परिणामांची जबाबदारी स्वीकारावी लागते, ह्याचं भान स्त्रीला यायला हवं.

दुसरं म्हणजे कुटुंबव्यवस्थेच्या, जातिव्यवस्थेच्या उतरंडीत स्त्रियांचं स्थान कायम खालच्या पातळीवर राहिलं. तिला अधिकार नव्हते, पण माणसाच्या घडणीतली नैसर्गिक अपरिहार्य सत्ताकांक्षा स्त्रियांमध्येही होतीच. ज्यांच्यामध्ये ती प्रबळ आणि सर्वंकष होती अशा स्त्रिया अशा प्रतिकूल विषम परिस्थितीतूनही सर्वोच्चपदापर्यंत पोहोचल्या. सर्वप्रकारच्या संघर्षातून वर जात राहिल्या. अगदी राजकारणातील इंदिरा गांधी, इतिहासाच्या पानांनी रझिया सुलतान किंवा झाशीची राणी असो, संशोधनातील मेरी क्यूरी असो किंवा अध्यात्मिक परिघातील मुक्ताबाई सारखी तेजस्वी संत असो. पण ज्या स्त्रियांना असे अवकाश नव्हते त्यांनी आपापल्या मर्यादित वर्तुळात आपली सत्ताकांक्षा त्यांच्या पुरुषांशी असलेल्या नात्यांमधून राबवली. म्हणूनच घराघरांतून मुलावरच्या, मायेचं भांडवल करून, मातृप्रेममाची टाळी देत बायका कुटुंबावर अंकुश ठेवू लागल्या.

त्यांना 'मुलगा' हवा असतो. सुनेला छळणारी सासू (किंवा उलट) स्त्रीभ्रूण हत्या करणारी आई किंवा भाऊभावजयींच्या संसारावर वर्चस्व गाजवणारी नणंद अनेक उदाहरणे दिसतात. मग सर्रास असं म्हटलं जातं की बाईच बाईची शत्रू असते, पण नात्यांमध्ये समानता नसलेली, अधिकाराच्या उतरंडीवरच आधारित असलेली पुरुष प्रधान व्यवस्थाच बाईला बाईची शत्रू बनवत राहते.

तिसरी गोष्ट जी नेहमी जाणवते ती अशी, व्यवहारात अत्यंत कर्तबगार, सक्षम अशी स्त्री जेव्हा भावनिक दृष्ट्या खंबीर, स्वावलंबी नसते. अनेकानेक गोष्टी चुकीच्या आहेत असं कळत असूनही आपला भावनिक आधार हरपेल या भितीपोटी ती त्या गोष्टी सहन करते किंवा त्यांच्याकडे डोळेझाक करते. आपल्या कामाशी, स्वत:च्या मूल्यांशी तडजोड करते. कित्येक अन्याय सहन करते. कित्येकदा आर्थिक परावलंबित्व याला कारणीभूत असतंच पण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सामाजिक आधार असणाऱ्या स्त्रियाही एखाद्या नात्यात स्वत:ला इतकं गुंतवतात की त्या नात्याशिवाय जगण्याची कल्पनाच करू शकत नाहीत. (उदा. जिवलग मैत्रीण, पोटची मुलं इत्यादी) स्त्रियांना 'लता वेली'सारखी उपमा देऊन त्यांचं नाजूकपण इतकं ठसवलं गेलंय की त्याही सारखे आधाराचे खांदे शोधत राहतात आणि मिळाले नाहीत की सैरभैर होतात. प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात कधी ना कधी आधाराची गरज असते, पण ती गरज त्या प्रसंगापुरती असते. सतत सर्वत्र नसते.

अन्याय सहन करण्याचे संस्कार, संस्कृती सणवार संभाळण्याची जबाबदारी, कुळाची/जातीची प्रतिष्ठा, जपण्याचं काम हे तर पूर्वापार स्त्रियांनीच करायचं असतं. असं स्त्रियांनाही वाटतं.) त्यालाही भावनिकतेची झालर खुबीने लावलेली असते. पवित्रता, शालीनता असं कोंदण देऊन तिला मखरात बसवलं जातं. हे पार पाडण्याचं असह्य दडपण आणि जमलं नाही तर अपराध भावना ह्याचं ओझं कायम मनावर वागवावं लागतं.

असे अनेक ताणेबाणे स्त्रीला औदासिन्याकडे ढकलतात. आपला आपण निर्णय घेण्याइतका नसणारा आत्मविश्वास व वागण्याची जबाबदारी न घेता आल्याने दुसऱ्यांच्या आज्ञांना मान झुकवावी लागते, नात्यांमधल्या सत्ताकांक्षांच्या (power games) खेळांमध्ये कुरघोडी करण्यासाठी बाईचाच बळी म्हणून वापर करते. भावनिक आणि आर्थिक अवलंबित्व अन् परंपराचालनाची वाहक म्हणून लादलेले ओझे या गोष्टी अप्रत्यक्षरित्या स्त्रियांना

दुबळं बनवत राहतात, पोखरत राहतात शिवाय संधीच नाकारली जाते. विवाहसंस्थेतील असुरक्षितता/अनिश्चितता (परित्यक्ता, विधवा, घटस्फोटिता यांना मिळणारी उपेक्षेची वागणूक) लैंगिक अभिव्यक्तीचा, इच्छांचा, लैंगिक क्रियांमधील निवडीच्या अभावाचा होणारा कोंडमारा त्यांची घुसमट वाढवत नेतात. मानसिक दृष्ट्या खचत जातात स्त्रिया आणि नैराश्यच्या शिकार होताता. भारतासारख्या देशात उदास वाटणं, निराशा दाटणं असे काही शब्द 'आजारपणाच्या' शब्दकोषात नसल्याने बायकांच्या तीव्र मानसिक वेदना शारीरिक रूप घेतात. सततचे कंबर दुखते. पाठ दुखते, हे होतंय, ते होतंय, असं झालंय, तसं झालंय अशी (कुणालाही ठोस शारीरिक आजार नसणारी) लक्षणांची जंत्री तयार होते. मानसिक वेदना शरीरातून बोलतात.

त्यातून सणवार, व्रत वैकल्य, उदास, तपास हेही लादलेलं, खाण्यापिण्यात सुद्धा स्त्रीच्या कनिष्ठ स्थानामुळे होणारी तिची आबाळ यातून रक्तक्षय, विविध जीवनसत्वांची कमतरता. हाडांची, पाळीची दुखणी मागं लागत असतात. त्याचा अपरिहार्य परिणाम मानसिक क्षमतांवर, आरोग्यावर होतच असतो. आरोग्यव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान हा वेगळाच विषय होईल.

एकूण समाजव्यवस्थेतून घडत गेलेल्या स्त्रीच्या मानसिकतेचा तिच्याच आरोग्यावर असा परिणाम होत असतो. त्यामुळे स्त्रिया पुरुषांहून किती तरी अधिक प्रमाणात नैराश्याच्या आणि नैराश्यासंबंधित मानसिक आजाराच्या बळी होतात प्रत्येक चार ते दहा महिलांमागे एक असं नैराश्याचं प्रमाण आहे आणि पुन्हा यातल्या कित्येकजणी (बहुतेक जणी) उपचारापर्यंत पोहचू शकत नाहीत.

यालाही स्त्री-पुरुष भेदभावाची किनार असतेच.

थोडक्यात स्त्रियांच्या सक्षमतेचा मार्ग हा मानसिक सक्षमीकरणाच्या दिशेने स्त्री पुरुष समानतेच्या मार्गावरूनच जायला हवा, हेच खरं!

**– डॉ. राजश्री देशपांडे**

भ्रमणध्वनी : ९४२२४००१७०


॥ग्रंथाली॥

# कॅनव्हास

**डॉ. स्मिता निखिल दातार**




**मूल्य १३० रु.**
**सवलतीत ७५ रुपये**

डॉ. स्मिता दातार यांच्या कथांशी आपण एकरूप होत जातो. कारण त्यांची कथा सांगण्याची शैली जिवंत आणि संवादी आहे. अनुकरणुमक्त अशी, स्वत:चा रंग घेऊन अवतरलेली त्यांची ही कथा अत्यंत साधी, सरळ कुठल्याही गुंत्यात न अडकता, स्वत:चा सुलभ प्रवास करत शेवटपर्यंत पोहचणारी आहे. आपल्या जगण्यातले ताणे-बाणे, राग-द्वेष, क्रिया-प्रतिक्रिया, सूड, वैषम्य यांचे रंग-प्रतिरंग या कथांतून व्यक्त झाल्यामुळे वाचकांचं या कथांशी आपसूक नातं निर्माण होत जातं.

**– मोनिका गजेंद्रगडकर** (प्रस्तावनेतून)

# बा मनभावन

**ललिता छेडा**




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

ललिता छेडा यांच्या या कथासंग्रहातल्या सगळ्या कथा तुमच्या-माझ्या घरातल्या आहेत. कथांची भाषा आपल्याला मनापासून आवडेल अशी आहे. ती साधी, सोपी, अनलंकृत आहे. त्यात ढिसाळपणा नाही, नेमकेपणा आहे. यातील सर्व पात्रं आणि प्रसंग मांडताना भाषा, वर्णन, संवाद हे सर्व नेटकेपणानं लिहिलं आहे. कथांमधील वर्णन, मग व्यक्तींची असोत की स्थळांची असोत त्यातही निरीक्षण, नेमकेपणा आणि अचूक शब्दरचना या गोष्टींकडंही आपलं लक्ष वेधलं जातं. कथांमधली निरीक्षणशक्ती कौतुकास्पद आहे.

**– विनिता ऐनापुरे**

# हिंसामुक्त समाज



वृषाली मगदूम

**स्त्रियांवरील हिंसा सार्वत्रिक आहे जगभरात आहे. स्त्रियांच्या दुय्यम स्थानातून हिंसा जन्म घेते. स्त्री पुरुष समानतेच्या मार्गात अडसर बनते. हिंसेच्या मुळाशी विषमता व सत्ता आहे.**

हिंगणघाट येथील घटनेनं महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उमटले आहे. भयावह परिस्थिती आहे. एका गरीब कुटुंबातील मुलगी शिकली. तिला लगेच नोकरी लागली. उमेदीनं करिअरची स्वप्नं पाहणाऱ्या तिचे आयुष्यच संपून गेले. अनभिज्ञ, निरागस, सरळ चाकोरीतलं आयुष्य एका माथेफिरू माणसाच्या कृत्यानं मिटून गेलं. जनक्षोभ थांबला, पण तिच्या आईवडिलांचं अख्खं आयुष्य बदलून गेलं. आता कोर्टाच्या चकरा आहेत. मानसिक, शारीरिक वेदना आहेत. आर्थिक भार आहे. मुलगी गमावल्याचं दु:ख आहे. कारण एकच पुरुषसत्ताक मुशीत तयार झालेला हा तरुण, ज्याचं स्वत:चं लग्नं झालंय. ज्याला एक मुलगी आहे. तो या मुलीवर प्रेम करतोय. तिचा नाही म्हणण्याचा अधिकार नाकारतोय. गरीब घरातील मुलगी काही करू शकत नाही, हा वर्गीय दंभही होता.

एका बाजूला महिला चळवळीच्या सातत्याने केल्या गेलेल्या लढ्याचे फळ म्हणून मुलींनी स्व-विकासाची मुसंडी मारली आहे. 'अर्ध आकाश आमचं' ही चळवळीची मागणी आहे. १९९५च्या बिजिंग परिषदेची 'जगाकडे स्त्रियांच्या नजरेने बघा', ही अधिकृत घोषणा होती. जगभराच्या महिलांनी आपल्या हक्कासाठी अधिकारासाठी चळवळ उभी केली. चळवळीला दोनशे वर्षांचा इतिहास आहे. हा दोनशे वर्षांचा प्रवास खडतर, संघर्षमय हक्कांसाठी झटणारा आहे, पण हिंगणघाटसारख्या घटनांची मालिका थांबतच नाही. अन् मग एका टप्प्यावर महिला चळवळ थबकते. गोंधळून जाते. हे थांबवले पाहिजे व हिंसाचार थांबविण्यासाठी काय केले पाहिजे ही विचार प्रक्रिया सुरू होते. या स्थित्यंतराच्या टप्प्यावर स्त्रियांना घरात, घराबाहेर, कामाच्या ठिकाणी भेदाची वागणूक मिळत आहे. या भेदाला छेद देण्याचा प्रयत्न केला तर हिंसाचाराचा सामना करावा लागत आहे. स्त्रियांवरील हिंसेची समस्या जितकी दृश्य आहे, त्यापेक्षा अधिक अदृश्य आहे. त्यामुळे तात्पुरती मलमपट्टी उपयोगाची नाही. घटना घडली की, लोक आक्रमक होतात. रस्त्यावर उतरतात. 'हिंसाचारी व्यक्तीला फाशीची शिक्षा द्या', अशी कायद्यात न बसणारी भावनिक मागणी करतात. हैद्राबादमधील डॉक्टर मैत्रिणीच्या हत्येनंतर पोलीसांनी कायदा हातात घेऊन आरोपींना संपवले व त्याचे कौतुकही झाले, पण अशाप्रकारच्या फिल्मी कृतींनी हिंसाचाराच्या घटना थांबणार आहेत का? हिंसक परिस्थितीत बदल होणार आहे का? आज हिंसाचाराच्या घटनात वाढ झाल्याचेच दिसत आहे. अशा अमानुष प्रवृत्तीचे अनुकरण करण्याची विकृती समाजात तयार होतेय का असे वाटण्यासारखी परिस्थिती तयार झाली आहे.

हिंसाविरोधी काम करताना हिंसेच्या प्रश्नाच्या मुळाशी गेले पाहिजे. स्त्रियांवरील हिंसेचा प्रश्न हा आपल्या विषम सामाजिक परिस्थितीशी आणि पुरुषप्रधान पितृसत्ताक व्यवस्थेशी निगडीत आहे. आज समाजात अपंगत्व आलेल्या महिला, एकल महिला, कष्टकरी दलित, असंघटित महिला, यांच्यावर होणारा हिंसाचार अव्यक्त अदृश्य आहे, त्यामुळे तो विदारक व गंभीरही आहे.

हिंसाचाराला प्रतिबंध करायचा असेल तर लिंगभाव व लिंगभेद यातील फरक समजून घेतला पाहिजे. नवीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. समाज मानवी व सांस्कृतिकदृष्ट्या अधिक सजग झाला पाहिजे. हिंसेला विरोध कसा करायचा व विरोधाची क्षमता कशी वाढवायची याची संवेदनशीलता आवश्यक आहे. वैयक्तिक पातळीवरील हतबलता सोडून दिली पाहिजे. महिला चळवळी प्रस्थापित व्यवस्थेविरोधात बोलत असताना स्त्रीवादी विचारांची मांडणी करतात. पण स्त्रीवादी विचारसरणी बाबत विरोधाचा सूर दृष्टीपथात येतो. पण स्त्रीवाद म्हणजे स्त्री पुरुष समता! स्त्रियांनी बाई म्हणून नाहीतर माणूस म्हणून जगण्याचा अधिकार होय. स्त्रीवाद ही समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठीची जाणीव आहे. ही जाणीव व भान स्त्री व पुरुष या दोघांच्यात आवश्यक आहे तरच हे विकृत हिंसाचार थाबंतील.

या वर्षांच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे घोषवाक्य 'मी समानतेच्या पिढीची प्रतिनिधी आहे. स्त्रियांचे अधिकार मिळवणे हे माझे काम आहे. स्त्री व पुरुष हा लिंगभेद (सेक्स) निसर्गाने दिला आहे व तो स्वाभाविक आहे. पण लिंगभाव (जेंडर) हा समाज परंपरा संस्कृती यातून आपल्यात आला आहे. लिंगभाव हा स्त्रीपुरुषांना जात, धर्म, वर्ग, लिंग या निकषावर वेगळे मानतो. पुरुषांना श्रेष्ठ व स्त्रियांना कनिष्ठ ठरवतो. यातूनच कुटुंब, समाज यामध्ये सत्तेची उतरंड तयार होते. पुरुषांनी करायच्या गोष्टी व स्त्रियांनी करायच्या

गोष्टी यात फरक केला जातो. स्त्रियांनी काय करायचे हे पुरुषच ठरवतो. यातूनच पुरुषांच्यात अहंकार जोपासला जातो. व स्त्रिया तडजोड वृत्ती स्वीकारतात. घरकाम हे बायकी काम हे सतत बिंबवले जाते. मुलीने सातच्या आत घरात यायचे हे बाबा, दादा, आई, आजी सांगतात. तुम्ही बाहेर सुरक्षित नाही आहात, हेही सांगतात. पण त्यांची सुरक्षितता धोक्यातच आणणारी मुले मात्र बिनधास्त रस्त्यावरून फिरत असतात. बेजबाबदार लैंगिक वर्तन करत असतात. मुलींना बाहेरचे अवकाश आपण खुले केले तेव्हा मुलग्यांना चार भिंतीच्या आतले अवकाश दाखवले नाही. घरात बाबा, दादा 'जेवायला वाढ गं' 'पाणी दे' 'शर्ट धुवून टाक' अशा आईला ताईला आज्ञा देतात. तेव्हा मुलींना आपण माणूसपणाच्या वाटेवरून बाईपणाच्या दुय्यम वाटेवर सोडतो. स्त्रीवाद हेच सांगतो की मुलग्यांना माणूस म्हणून ज्या ज्या सुविधा, संधी मिळतात त्या मुलींनाही मिळाल्या पाहिजेत. हे जेव्हा होईल तेव्हा पुरुषसत्ताक, पारंपारिक लिंगभाव बदलेल. स्त्रीही उपभोगाची वस्तू आहे. तिच्यावर माझी मालकी आहे. ती माझी होणार नसेल तर दुसऱ्या कोणाचीच होऊ शकणार नाही. या मानसिकतेतून ॲसिड हल्ला करणे. पेट्रोल टाकून जाळणे या टोकाच्या अमानुष, अतिरेकी व विकृत कृतींना आळा बसायचा असेल तर मुलग्यांना बदलण्याचा कृतिकार्यक्रम हाती घ्यावा लागेल.

प्रेम व आकर्षण यामध्ये फरक आहे. प्रेम हे प्रामाणिक व संयत असते. सोशल मीडियामधून तरुणाई लैंगिकतेच्या व तरुणाई या माहितीच्या आहारी जात आहे. आज झोपडपट्टीतील कष्टकरी मजूर, घरकाम करणाऱ्या, कचरावेचक असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांच्या समस्यातर अधिक जटिल आहेत. शिक्षण अर्धवट आहे. बेकारी आहे. अंधश्रद्धा आहे. व्यसनाधीनता आहे. कोणाचेही नियंत्रण नसणारी ही मुले मागचा पुढचा विचार न करता जिवावर उदार होऊन हिंसक बनतात. अख्खं आयुष्य स्वत:चे व इतरांचेही उद्ध्वस्त करतात व्यवस्थेचा बळी असणाऱ्या या वस्तीतील तरुणांचे परिवर्तन करण्यासाठीही काम करण्याची गरज आहे हिंसा, अत्याचार, बलात्कार हे बाईवर नियंत्रण ठेवण्याचे शस्त्र आहे असे पुरुषांना वाटते. स्वत:चे अधिकार, सत्ता, ताकद शाबूत ठेवण्यासाठी हिंसेचा वापर केला जातो. समाजातील गरीब व दलित स्त्रियांच्या अस्तित्वाला व प्रगतीला हे मारक आहे.

स्त्रियांवरील हिंसा सार्वत्रिक आहे जगभरात आहे. स्त्रियांच्या दुय्यम स्थानातून हिंसा जन्म घेते. स्त्री पुरुष समानतेच्या मार्गात अडसर बनते. हिंसेच्या मुळाशी विषमता व सत्ता आहे. प्रादेशिकता भाषिक अस्मिता ही आहे. वंश, जात, धर्म यांच्या तथाकथित वर्चस्वाच्या भावनाही हिंसाचाराला जन्म देतात.

या हिंसाचाराविरुद्ध चळवळ उभी करणे हे महिला चळवळीपुढील मोठे आव्हान आहे. यासाठी सामूहिक ताकद एकवटण्याची गरज आहे. बदललेली, सकारात्मक विचारांची तरुणाईली आजूबाजूला भेटत आहे. समतेचा विचार मानणारे, व्यवहारात अंमलात आणणारे तरुणही आहेत.

या तरुणांची साथ घेऊन हिंसाचारावर नियोजनपूर्वक काम केले पाहिजे. स्त्रियावरील हिंसेबाबतचा सामाजिक दृष्टिकोन बदलण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिज. हिंसाचाराला नकाराची जाणीव सामूहिकपणे व परस्पर विचार विनिमयातून विकसित झाली तर हिंसामुक्तीच्या कामाची ताकद वाढेल.

मुलांना बदलाच्या वाटेवर नेण्यासाठी काम करताना पुरुषप्रधान समाजरचनेवर घाव घातला पाहिजे. समाजधारणा व पुरुषी मानसिकता बदलली आहे. लिंगभाव संकल्पना बदलली तर अनेक गोष्टी सहज साध्य व परिवर्तनाकडे नेणाऱ्या आहेत. वर्षानुवर्षांचे विचार, रूढी यात बदल होण्याचा हा मार्ग नक्कीच लांब पल्ल्याचा आहे. चिकाटीचा आहे, पण समाजातील हिंसाचार समूळ नष्ट करायचा असेल तर ही दूर पल्ल्यांची वाट चोखाळावी लागेल तरच स्त्री-पुरुष समतेच्या हिंसामुक्त समाजाच्या या रोपट्याला परिवर्तनाचे फळ येईल. स्त्री-पुरुष निरोगी, निकोप वातावरणात सुरक्षित व भयमुक्त जगतील.

**– वृषाली मगदूम**
भ्रमणध्वनी : ९३२२२५५३९०
vamagdum@gmail.com

॥ग्रंथाली॥




**नदीष्ट** **मनोज बोरगावकर**

विषय चाकोरीबाहेरचा आहे. शैली पहिल्या धारेची आहे. थेट कोंडुरा किंवा बनगरवाडीची आठवण करून देणारे लिखाण आहे. 'नदीष्ट' ही मनोज बोरगावकर यांची केवळ कादंबरी नाही, तो आहे त्यांच्या प्रत्यक्षदर्शी आणि अनुभवसिद्ध घटनांचा कसदार ललित गद्य हुंकार. 'नदीष्ट' ही मराठी कादंबरीविश्वातील अकरावी दिशा आहे.

**– विनायक पाटील, नाशिक**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# एका वेंधळ्या बाईची वेडीवाकडी आत्मकथा



प्रकाश खरात

**आम्ही दोघी दर्ग्याच्या खिडकीपाशी उभ्या राहिलो कारण दर्ग्याच्या मजारीपर्यंत जाण्यास महिलांना मज्जाव होता. फुलांच्या चादरींनी, अत्तराच्या व लोबनच्या सुगंधानं दर्ग्यातलं वातावरण धुंद बनलं होतं. तिथल्या एका फकिराकडं सलमा घेऊन गेली.**

आज दिवसभर कॉलनीत भटकभवानीसारखं फिरून मी रात्रीच्या सुमारास घरी आलेय. सकाळी गोपाळकृष्ण हॉटेलपासून सुरुवात केली. हॉटेल मालकानं हसून ओळख दाखवली; अन् दयाबुद्धीनं वडापाव व कटिंग चहा दिला. आता कॉलनीतले सगळेच मला ओळखतात. एक वेडसर स्त्री म्हणून माझ्याकडं पाहतात. आता माझा रया गेलेला देह, डोक्यावरचा पांढऱ्या केसांचा झाप, हाडबंडल म्हणावं तशी हडकलेली मी. मुखात दात नसल्यानं बोळकं झालेलं तोंड, जुनापुराना सलवार कुर्ता, तोही उंदरांनी ठिकठिकाणी कुरतडलेला, वेंधळी नजर. अशा माझ्यासारख्या पाप्याच्या पितराकडं पाहून कुणी वेडसर असा ग्रह केला; तर त्यात वावगं असं काय? त्यामुळंच तर लोक माझ्याकडं सहानुभूतीनं पाहतात. नाहीतर सकाळी शेट्टीनं – हॉटेल मालकानं मला वडापाव अन् कटिंग चहा दिला असता का? मी हॉटेलबाहेर पडून काही काळ मोच्याच्या टपरीवर बसले. तिथं त्याची प्रेमिका अक्का फतकल मारून बसलेली. तिच्याशी इकडच्यातिकडच्या गप्पा केल्या. अक्का असेल तिशी पस्तीशीची. झोपडपट्टीतून ती रोजच मोच्याच्या टपरीवर येते. दिवसभर त्याच्या अंगचटीला येऊन त्याच्याशी गुलूगुलू बोलत असते. ही अक्का वर्णानं काळीकुळकुळीत; पण देहाने रसरशीत. ती हसते तेव्हा तिची दंतपंक्ती दिसते आणि मग आपण दंतहीन असल्याचं जाणवतं. मन खंतावतं. रात्री घरी आल्यावर भयाण गुहेतच आल्यासारखं वाटतं. एकटेपणा दाटून येतो. घर म्हणाल तर नरकतुल्य. सगळीकडं अडगळ नि पसाराच पसारा. निरुत्साही मनाला पसारा आवरावासा वाटत नाही. झोपताना जीव घाबराघुबरा होतो. घरातल्या दोन-तीन उंदरांनी उच्छाद मांडलेला असतो. त्यांनीच माझे कपडे वेळोवेळी कुरतडलेत. शिवाय एके रात्री उंदीर मला चावलापण. त्यांना पकडण्यासाठी पिंजरा आणावासा वाटतोय. पण मला जेवणाची नित्य भ्रांत; तिथं पिंजऱ्यासाठी पैसे कुठून आणू? मी अंगभर चादर ओढून देवाचं नाव घेऊन झोपी जाते. आता मी तुम्हाला माझ्याविषयी सांगतेय. माझ्या घरादाराविषयी बोलतेय, घटनाप्रसंग तुम्हाला सांगायचेत की, जेणेकरून माझं मन निरगळेल. आत्मचरित्र सांगावं असं माझ्या आयुष्यात विशेष काही घडलं नाही. आणि स्मरणशक्तीनं अकाली दगा दिल्यामुळं ते मी तुम्हाला तपशीलवार सांगूही शकत नाही. हां, एक मात्र खरंय की, माझ्या आयुष्यात काळोख भरून राहिलाय पुरेपूर. भयावह असा. अवसेच्या काळोखाहूनही गडद. मला लोक वेडी म्हणतात. पण मी खरंच वेडी नाहीय. मी असंबद्ध बोलत नाही. मला वास्तवाचं बऱ्यापैकी भान आहे. मग मी वेडी कशी? मी मनोरुग्ण आहे; हे मात्र खरं. असं असलं तरी मनोरुग्ण असणं आणि ठार वेडं असणं यात जमीन अस्मानचा फरक आहे. नाही का? माझं मनोरुग्ण असणं ना आईवडिलांनी गंभीरपणे घेतलं ना मी स्वत:! आयुष्याची पासष्ट वर्षे उपचाराविना सरली; आणि आता तर मी मरणाच्या कडेलोटावर उभी आहे. मी मूळची गोव्याची. आई, वडील, थोरली बहीण व मी असं आमचं कुटुंब. गोव्यात तर मी फार काळ नाही राहिले. निसर्गसौंदर्य सोडलं तर गोव्यातलं मला फारसं काही आठवत नाही. पोटापाण्यासाठी वडील कुटुंबकबिला घेऊन मुंबईला आले; आणि गिरगावात घर घेऊन स्थायिक झाले. आमचं घर मनुष्यवस्तीपासून दूर. काहीसं एकांडं. त्यामुळं थोरल्या बहिणीचा सहवास सोडल्यास मला फारशा मैत्रिणी नव्हत्या. त्यामुळं साहजिकच एकटं एकटं वाटायचं. वडिलांचा वडिलोपार्जित पौरोहित्याचा व्यवसाय. तोच त्यांनी गिरगावात सुरू केला. धार्मिक विधींसाठी त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी बोलावलं जाई. त्यांच्या व्यवसायाला चांगली बरकत होती. आम्ही खाऊनपिऊन सुखी होतो. वडिलांनी मिठाई आणली की, मी हावऱ्यासारखी मिठाई मटकावयाची. माझ्या अति गोडधोड खाण्याचा दुष्परिणाम असा झाला की, माझे दात किडू लागले. वडिलांना पूजेअर्चेसाठी कुठं बोलावणं आलं की, मीही जायचे त्यांच्यासोबत. देव देवळांशी माझा लहानपणापासून संबंध आला. पानंफुलं, अगरबत्त्यांचा, धूपदिपाचा सुगंध अशा धुंद वातावरणात मी भारावून जायचे. देवादिकांच्या सुंदर मूर्ती, देवळांच्या दगडावरील कोरीव कलात्मक नक्षीकाम पाहून मी आनंदनिर्भर व्हायचे. मन भक्तीमय व्हायचं. ईश्वर आपला तारणहार आहे, या भावनेनं सुरक्षित वाटायचं. पुरोहित असल्यानं वडिलांवर देवाधर्माचा कमालीचा पगडा. ते नेहमी नीतीचा आग्रह धरायचे. मला अधूनमधून उपदेश करायचे. म्हणायचे, ''वंदा, आपण देवाची माणसं. तू धर्माच्या नियमांचं पालन करीत जा हं.''

आई पुजाऱ्याची बायको. अर्थात तीही देवभोळी व सोवळंओवळं पाळणारी. ब्राह्मण असल्याचा तिला विलक्षण अभिमान. एकदा ती पटकन् बोलून गेली, ''वंदना, तू श्रेष्ठ अशा ब्राह्मणकुळात जन्म घेतला आहेस बरं.''

ब्राह्मणी संस्कार माझ्यावर कुणाकुणाडून होतच राहिले. शाळेत मला थोड्याफार मैत्रिणी लाभल्या. नाही असं नाही. पण ब्राह्मणेतर मैत्रिणींशी मी अंतर ठेवून वागत होते. मी व माझी थोरली बहीण सुहासिनी आम्ही एकाच शाळेत होतो. मला वाचनाची खूप आवड. भाषा विषयात मला अधिक रुची. लहानपणी चांदोबासारखी मासिकं मन लावून वाचायचे. त्यातल्या बोधप्रद गोष्टी खूप आवडायच्या. त्यातील रंगीबेरंगी चित्रं पाहून मी हरखून जायचे. कळत्या वयात अनुवादित कादंबऱ्या वाचायचा मी सपाटा लावला. स्वाभाविकच माझं अनुभवविश्व समृद्ध होत गेलं. सुहासिनीताई अगदी माझ्या विरुद्ध. तिला भाषेऐवजी गणितात अधिक गती.

सुहासिनीताई तीन वर्षे आधी एस.एस.सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाली. गणितात सर्वाधिक म्हणजे शंभरपैकी शंभर गुण मिळवून. तिनं कॉलेजला ॲडमिशन घेऊन कॉमर्स शाखा निवडली.

सुहासिनीताईनंतर मी तिनेक वर्षांनी एस.एस.सी. झाले. गणितात मी काठावरच पास झाले. पण सुखद आश्चर्याची गोष्ट म्हणजे मी मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळवून महाराष्ट्रात पहिली आले. माझ्या आनंदाला पारावार उरला नव्हता. इतका हर्ष झाला की, गगन ठेंगणं वाटू लागलं. आयुष्यात आपण काही कर्तृत्व करू शकतो; असा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यानिमित्तानं शाळेच्या प्राचार्या आडारकर मॅडमनी शाळेत माझा छोटेखानी सत्कार केला. अगदी कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं.

मी विल्सन कॉलेजात कलाशाखेत प्रवेश घेतला. भाषेची म्हणा साहित्याची म्हणा मला नितांत आवड असल्यानं मी थोड्याफार कथा-कविता लिहिल्या. त्या कॉलेजच्या भित्तीपत्रकावर लावल्या गेल्या. सर्जनाच्या वाटेवरची ही सुरुवात अर्थातच सुखावह वाटत होती.

कॉलेजातील प्राध्यापकांची लेक्चर्स डोक्यावरून जात होती. मी मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलेली. त्यामुळं इंग्रजी सहजासहजी कळणं कठीण होतं म्हणा! परंतु तीन महिने उलटूनही मला लेक्चर्स समजेनात. नंतर माझ्या लक्षात आलं की, आपली स्मरणशक्ती क्षीण होऊ लागलीय. मी माझी शंका सुहासिनीताईला बोलून दाखवली. म्हटलं, ताई, मला विस्मरणाचा त्रास होतोय.

पण सुहासिनीताईनं माझं म्हणणं गंभीरपणे घेतलं नाही. तुझे मनाचे खेळ आहेत. म्हणून तिनं माझं म्हणणं उडवून लावलं.

विस्मरणाचे दुष्परिणाम मला जाणवू लागले होते. माझ्या वागण्यात वेंधळेपणा आलेला. त्यामुळं की काय कॉलेजमधल्या मैत्रिणीही मला टाळू लागल्या. ते मनाला खूप लागून राहिलं. पण सांगायचं तरी कुणाला? सख्ख्या बहिणीलाही माझं दुःख समजू शकलं नाही; तर इतरांची काय कथा! मी विस्मरणाचं दुःख दिवसांगणिक भोगत राहिले. कुणालाही न सांगता. त्याकाळात मी वडिलांच्या सहवासात अधिकाधिक राहू लागले. त्यांच्यासोबत देवळादेवळांत फिरू लागले. गिरगावात कुठेही कुणा महाराजाचं अथवा माताजीचं प्रवचन असलं की, त्या प्रवचनाला मी आवर्जून उपस्थित राहायचे. देवाधर्माचा, धार्मिक प्रवचनांचा मानसिक आधार मिळू लागला.

मी कॉलेजचं शिक्षण सोडलं ते सोडलंच. ते माझ्या नशिबी नव्हतं. ताईनं मात्र पदवीपर्यंत शिक्षण घेतलं. ती उत्तम मार्कांनी बी.कॉम झाली. यथावकाश स्टेट बँकेत नोकरीला लागली. दिसायला सुंदर शिवाय नोकरदार. त्यामुळं तिला चांगली चांगली स्थळं सांगून आली. आणि तिचं लग्न होऊन तिला अनुरूप पतीही मिळाला. तिचा नवरा म्हणजे माझे भावोजी कंपनीत उच्चपदस्थ होते. ते पुणे निवासी असल्यानं सुहासिनीताई गिरगाव सोडून पुण्याला सासरी नांदायला गेली. ताई सासरी गेल्यावर मी तर अगदीच एकटी पडले. गिरगावच्या गल्लीबोळांतून फिरणं, देवळादेवळांतून भटकणं, कुठं भजन, किर्तन असेल तर ते ऐकणं असा माझा दिनक्रम सुरू झाला.

दरम्यान मी नोकरीसाठी बरीच धडपड केली. पण विसराळूपणामुळं मला लेखी परीक्षा देता येईनात. मुलाखतींमध्ये विचारलेल्या प्रश्नांना धड उत्तरं देता येईनात. शेवटी आईवडिलांवरच विसंबून रहावं लागलं. आईवडील वृद्ध होत चालल्यावर माझं परावलंबित्व मला डाचू लागलं. पण आता माझं जगणं माझ्या हाती उरलं नव्हतं.

गिरगावातलं आमचं घर जसं एकांडं होतं; तशीच घराची जागाही अपुरी होती. माझे वडील पुरोहित होते. ते व्यवहारी होते. पूजाविधीतून मिळणारे पैसे त्यांनी साठवून ठेवले होते. त्या साठवलेल्या पैशांतून त्यांनी मालाड मालवणीला फ्लॅट घेतला. त्यावेळी मालाड मालवणी म्हणजे गावच होतं. तिथं आमची एकुलती एक बिल्डिंग वगळता तुरळक घरं होती. आजूबाजूला घनदाट झाडी होती. मालाड मालवणीला आले; नि फ्लॅट संस्कृतीमध्ये मी अधिकच घुसमटत गेले. तिथं ओळखीपाळखी नव्हत्या. त्यामुळं एकटेपण शतपटींनी वाढलं. सुहासिनीताईच्या आयुष्यात आनंददायी घटना घडली; आणि त्यानिमित्तानं माझं एकटेपण सरण्यास मदत झाली. ताईला पुत्ररत्नाचा लाभ झालेला. बाळाला सांभाळण्यासाठी ताईनं मला पुण्याला बोलावलं. पुण्यातला कोथरुड येथील ताईचा प्रशस्त फ्लॅट. सर्व सुखसोयींनी सुसज्ज. बाळाला सांभाळण्यात माझा वेळ मजेत जाई. त्याच्या बाललीला पाहताना मन हरखून जाई. ताई बँकेत अधिकारी; तर तिचे मिस्टर एका कंपनीत मॅनेजर. साहजिकच ताईच्या घरी सुबत्ता. तिथं खाण्यापिण्याची चंगळ. ताईच्या घरी बाळाच्या सान्निध्यात मी मजेत होते. पण माझं सुख फार काळ टिकलं नाही. सुहासिनीताईची व माझी बाचाबाची झाली. ताई करवादली, ''तू धड शिकली नाहीस. बेशिस्त राहून आयुष्याची नासाडी केलीस.'' मग मीही प्रतिवाद केला. म्हटलं,

''थोरली बहीण असून तू मला कधी समजून घेतलं नाहीस. माझ्या मानसिक समस्येकडं दुर्लक्ष केलंस. मी काय बेशिस्त वागले सांग बघू.'' शब्दानं शब्द वाढत गेला. मी रागाच्या भरात पुणे सोडून मुंबईला आले. मुंबईला आल्यावर पुन्हा एकटेपण सतावू लागलं. वाचनाची सवय लोपलेली कारण एखादं पुस्तक वाचायला घेतलं, तर त्यातलं वाचलेलं काहीच कळायचं नाही. एकाग्रता जवळजवळ शून्य. वाचनाचा मार्ग माझ्यासाठी कायमचा बंद झाला होता. मग इकडंतिकडं निरुद्देश भटकणं एवढंच मला माहीत. आमच्या सोसायटीपासून दोनेक किलोमीटरवर वसाहत होती. हिंदु-मुस्लीम अशा दोन्ही समाजातले लोक त्या झोपडपट्टीवजा वस्तीत रहात. तिथं सलमा भेटली. योगायोगानं तिची नि माझी भेट झाली. एका पटरीवजा हॉटेलात मी कटिंग चहा पीत होते. माझ्यासमोर स्थूलशी अस्ताव्यस्त कपड्यातली स्त्री बसलेली. आमची दृष्टादृष्ट झाली. आम्ही एकमेकींची विचारपूस केली. तिनं मला विचारलं, ''आप क्या करती हो?''

''कुछ नहीं. इधरउधर भटकती हूँ।''

जिज्ञासा म्हणून मी तिला प्रतिप्रश्न केला, ''आप क्या करती हो?''

''मै लोगोंके लिए अल्लासे दुवाँ मांगनेका काम करती हूँ।''

सुरुवातीला तिच्या बोलण्याचा मला अर्थबोध झाला नाही. तिच्या बोलण्यावरून कळलं की, ती मशिदीच्या बाजूला बसून भीक वगैरे मागते. सलमाशी ओळख झाल्यावर अर्थातच मला आनंद झाला. आम्ही दररोज एकमेकींना भेटत असू. परस्परांची सुखदुःख सांगत असू. सलमाला तिच्या नवऱ्यानं लग्न झाल्यावर वर्षभरातच तिला तलाक दिला होता. म्हणजे एकाअर्थी परित्यक्ताच ती. ती एकटीच तिच्या झोपडीत रहात होती. दिवसभरात मिळालेल्या भिक्षेवर तिचा उदरनिर्वाह होत होता.

मी सलमाजवळ माझ्या विस्मरणाविषयी बोलले. तशी सलमा म्हणाली, ''तू मेरे साथ हाजी अली बाबाके दर्गेपर चल. वहाँ फकीरबाबा तुझे आशीर्वाद देगा. तू बिलकुल ठिक हो जायेगी।''

सलमाच्या बोलण्यानं माझ्या आशा पल्लवित झाल्या. आम्ही दोघी बाबा हाजी अलीच्या दर्ग्यावर गेलो. समुद्रात बांधलेला हाजी अलीचा दर्गा बघून मी आश्चर्यचकित झाले. दर्ग्यावर भाविकांची अलोट गर्दी जमली होती. गरीब, मध्यमवर्गीय, श्रीमंत अशा अनेक स्तरातले भाविक होते. लुळेपांगळे, आंधळे असे कितीतरी भिकारी दर्ग्याकडं जाणाऱ्या रस्त्यांवर बसले होते. अल्लाच्या नावाचा घोष करीत भीक मागत होते.

आम्ही दोघी दर्ग्याच्या खिडकीपाशी उभ्या राहिलो कारण दर्ग्याच्या मजारीपर्यंत जाण्यास महिलांना मज्जाव होता. फुलांच्या चादरींनी, अत्तराच्या व लोबनच्या सुगंधानं दर्ग्यातलं वातावरण धुंद बनलं होतं. तिथल्या एका फकिराकडं सलमा घेऊन गेली. फकिरबाबानं हातातल्या मोरपंखाच्या गुच्छानं माझ्या डोक्यावर दोनतीनदा हलकेसे आघात केले. मी मनातून हरखले. आपण बरे होऊन माणसांत येणार, या जाणिवेनं सुखावले. फकिरबाबाला वंदन करून आम्ही तिथून निघालो. दिवस गेले; महिने उलटले; वर्षे सरले; तरी माझ्या विस्मरणात काडीचाही फरक पडला नाही. फकिरबाबाचा आशीर्वाद काही आपल्याला लाभला नाही; म्हणून मी मनाचं समाधान करून घेतलं.

असंच बोलता बोलता मी सलमाला घरचा पत्ता सांगितला. ती एके सकाळी दरवाज्यावर दत्त म्हणून हजर. आपल्या घरात एक मुस्लीम स्त्री येतेय, हे आईला अजिबात रुचलं नाही. तिनं सलमाला साधं पाणीसुद्धा दिलं नाही. मला अर्थातच वाईट वाटलं. सलमा गेल्यावर आईनं माझी चांगलीच हजेरी घेतली. म्हणाली, ''वंदे, तू काय अक्कल गहाण ठेवलीस की काय? अगऽ गधडे, मांसमटन खाणाऱ्या मुस्लीम बाईला तू घरी कशी काय घेऊन आलीस? तू धर्म बुडवणारी कार्टी आहेस.'' आईचं वाक्ताडन मी निमूट ऐकून घेतलं.

त्यानंतर सलमा कधी घरी आली नाही. पण बाहेर ती कुठं भेटली; तर आम्ही नेहमीच्या हॉटेलात कटिंग चहा घेऊन गप्पा मारीत असू.

आईवडिल वयपरत्वे आता थकत चालले होते. मध्यंतरी वडिलांची अँजोग्राफी करण्यात आली. त्यांचं हृदय कमकुवत झाल्याचं निदान करण्यात आलं. शिवाय आईला रक्तदाबाचा व संधीवाताचा त्रास सुरू झालेला. माझ्या चिंतेत भर पडत गेली. त्यातच मनाला यातना देणारी घटना घडली. हृदयविकाराच्या तीव्र धक्क्यानं वडिलांचं अकस्मात् निधन झालं. आम्हा मायलेकींववर दुःखाचा मोठा आघात झाला. घरातला एकमेव कर्ता पुरुष निघून गेला होता. सुहासिनीताई पुण्याहून मुंबईला आली. एक-दोन महिने राहून पुन्हा पुण्याला निघून गेली.

वडील गेल्यावर मला फार रितं-रितं वाटू लागलं कारण त्यांच्या सहवासात मी दीर्घकाळ राहिले होते. त्यांच्यामुळंच देवळादेवळांतील देवीदेवतांचं मला वेळोवेळी दर्शन घडत गेलं. त्यांच्यामुळंच मला साधुसंतांची प्रवचनं ऐकता आली होती; नि ईश्वरभक्त झाले होते.

वडील गेल्यावर आई मनानं खचलेली. त्यातच तिला अनेक व्याधी जडल्या. तिला घेऊन मी वारंवार डॉक्टरांकडे जात होते. वडील गेल्यावर आई जेमतेम एक-दोन वर्षे जगली. ती देवाघरी गेली; नि मी अनाथ झाले. एकटीने जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला. सुहासिनीताईला मी म्हटलं, ''ताई, मी जगू कशी? मला तर काडीचंही उत्पन्न नाही.''

मला धीर देत ताई म्हणाली, ''मी तुला महिन्याकाठी तीनेक हजार पाठवीत जाईन.'' आणि महिन्याकाठी तीन हजार रुपये माझ्या बँकेच्या खात्यात पडू लागले.

आता माझा बराचसा वेळ सलमाबरोबर जाऊ लागला. पण एका प्रसंगानं सलमाही दुरावली. त्याचं काय झालं, दुपारच्या सुमारास सलमानं मला अळेबळे चिलयाच्या हॉटेलात नेलं. खरं तर मी आयुष्यात कधी मांसाहारी हॉटेलात गेले नव्हते. सलमानं चिकन बिर्याणीची ऑर्डर दिली. तिनं चिकनचं मांस खायला सुरुवात

केली. ते पाहून मला शिसारी आली. मळमळायला लागलं. अगदी असह्य झाल्यावर हॉटेलातून मी पळ काढला.

त्या प्रसंगानंतर सलमा कुठं दिसली की, मी तिला टाळू लागले. मग पुन्हा डोंगराएवढं एकटेपण. मग मी दिवसभर कुठं कुठं फिरायचे. कुणा महाराजाचं किंवा माताजीचं मंदिरात प्रवचन असलं की, ती माझ्या दृष्टीनं पर्वणी. प्रवचनांत मन रमायचं; नि दिवसही सरायचा.

भटकंतीत एके दिवशी मला विरंगुळ्यासाठी जागा गवसली. शंकराच्या प्राचीन देवळात मी जाऊ लागले. मंदिर होतं टेकडीवर; आणि आजूबाजूला वृक्षराजी होती. मंदिराच्या पुजाऱ्याशी माझी ओळख झाली. पुजारी उमदा तरुण होता. त्याच्या खांद्यावर उपरणं तेवढं असायचं. बाकी तो उघडाबंब. त्याचा सुडौल देह नजरेत भरायचा. मंदिर आडबाजूला असल्यानं मंदिरात भाविकांची वर्दळ नसायची फारशी. मी मंदिरात गेले की, पुजाऱ्याशी इकडच्यातिकडच्या गप्पा मारायचे. तोही गोष्टीवेल्हाळ. आता तर माझ्या एकटेपणाचा प्रश्न संपल्यातच जमा झाला होता. पुजाऱ्याच्या सहवासात दिवस भुर्रकन निघून जायचा. अशीच एक नीरव अन् निवांत दुपार. पुजाऱ्याबरोबर मी गप्पागोष्टी करीत होते. पुजारी म्हणाला, चल आपण थोडं देवळाबाहेर फिरून येऊ.

मी त्याच्याबरोबर देवळाबाहेर गेले. तो मला गर्द झाडीतल्या निर्जन स्थळी घेऊन गेला. त्याच्या स्पर्शाच्या वर्षावानं मी पार गोंधळून गेले. माझ्या देहात वसणारी वासना जणू जागी झाली. अतृप्त इच्छा तृप्तीत परावर्तित होऊ लागली. देहभर संवेदनेचा वाहणारा प्रवाह हवाहवासा वाटू लागला. त्याच्या भरदार छातीच्या रगदार स्पर्शानं माझी वक्षस्थळं सुखावली. मी पुजाऱ्याला शरणागत होऊन त्याच्या मिठीत विसावले. पुजाऱ्यानं दिलेलं स्पर्शाचं दान माझ्या देहमनानं विनातक्रार स्वीकारलं होतं. मी त्याचा निरोप घेऊन एका वेगळ्याच धुंदीत घरी परतले.

रात्र झाली; नि मी बिछान्यावर कलंडले. प्रणयाचा अंमल ओसरू लागला होता. आणि अकस्मात मला वडिलांचं बोलणं आठवलं, ''तू धर्माच्या नियमांचं पालन करीत जा.''

आज मी धर्माच्या विरुद्ध वागले होते. तेही मंदिराच्या साक्षीनं. मनाची घालमेल होऊ लागली. मनात प्रश्नांची मालिका सुरू झाली. खरंच, मोहाचा क्षण मी का नाही टाळू शकले? वर्षानुवर्षे जपलेला संयम क्षणार्धात कसा काय ढासळला? पापभिरू असलेली मी पापाचरणाला कशी प्रवृत्त झाले? आत्तापर्यंत परपुरुषाच्या स्पर्शापासून मी अनंत योजनं दूर होते. परपुरुषाशी कधी हस्तांदोलन केल्याचंही आठवत नाही.

एक किस्सा सांगते. आमच्या सोसायटीत बी विंगमध्ये रहाणारे प्राध्यापक येरूणकर. त्यांची पत्नी माहेरी गेलेली. मी दिसल्यावर कामविव्हल झालेले येरूणकर मला म्हणाले, ''चल माझ्या घरी. मौजमस्ती करू. आणि मी शिताफीनं त्यांना टाळलेलं. मग आजच मला आसक्तीच्या विळख्यात का रहावंसं वाटलं. मी देवाधर्माशी प्रतारणा केली; हेच खरं.''

डोक्यात विचारांचे भुंगे निर्माण झालेले. त्या रात्री डोळ्याला डोळा लागला नाही. नंतर मी मंदिराकडं कधी फिरकले नाही. पुन्हा कशाला विषाची परीक्षा पाह्यची? ती वाट मी स्वत:च बंद केली.

वेळ घालवण्यासाठी मी मोच्याच्या टपरीवर बसू लागले. मोची अन् अक्काचा प्रेमालाप ऐकू लागले. त्यांचा बिनधास्त प्रणय पाहू लागले. हळूहळू अक्का माझी मैत्रीण झाली खरी; पण तिच्या घाणेरड्या सवयी पाहून राग यायचा तिचा. ती पानतंबाखू, गुटका तर खायचीच; पण दारूच्या दुकानातून दारूची बाटली आणून दारूपण ढोसायची. पण मला तिच्या संगतीची नितांत गरज होती; म्हणून मी तिचे दुर्गुण टाळत गेले.

एके दिवशी मी बँकेतून पैसे काढून बँकेच्या बाहेर आले. बँकेतून बाहेर पडताना मला अक्कानं पाहिलं. मला थांबवित ती म्हणाली, वंदा, मुझे पाँचसो रुपये की जरूरत है. मेरे घरमे रेशन नहीं है.

मी म्हटलं, ''मेरे पास इतना पैसा नहीं है.''

तशी ती म्हणाली, ''मै कुछ नहीं जानती. कुछ भी करके मुझे पैसा चाहिए.'' मला ती गरजू वाटली; नि मी तिला पाचशे रुपये दिले. तीन हजारातून पाचशे गेल्यावर माझ्या खात्यात अवघे अडीच हजार रुपये उरले. अडीच हजारात महिना कसा जाणार? महिन्याच्या शेवटी तर जवळजवळ सगळे पैसे संपले. जेवणाऐवजी मी वडापाव खाऊन दिवस काढले. दोन-तीन दिवस तर मी उपाशीपोटी राहिले. अक्काची मैत्री तापदायक वाटू लागलेली. माझा भीडस्त स्वभाव तिनं हेरला होता. प्रत्येक महिन्याला ती माझ्याकडून पैसे घेत होती. परिणामी माझी खाण्यापिण्याची आबाळ होत होती. मी बँकेत जाताना अक्का कुठं नाही ना याची खात्री करून जायचे. पण अक्का मला रस्त्यात गाठायची. अक्का म्हणजे माझ्या अवघड जागेवरचं दुखणं झालं होतं. तिनं पैसे मागितल्यावर नाही म्हणायला माझी जीभ रेटत नव्हती. त्याचा फायदा घेऊन अक्का मला लुटत होती. माझी खाण्यापिण्याची भ्रांत वाढत होती. वडापाव नि चहा हेच माझं दिवसारात्रीचं जेवण ठरलं होतं. नाही म्हणायला गोपाळकृष्ण हॉटेलचा मालक शेट्टी तसा दयाळू होता. माझी भूक तो जाणायचा. मला मसालाडोसा फुकटात खाऊ घालायचा. अनेक देवळांतून अधूनमधून भंडारा घातला जायचा. त्यादिवशी माझा जेवणाचा प्रश्न सुटायचा. मी दिवसभर कॉलनीत व कॉलनीबाहेर फिरायचे. त्यामुळं कुणाशी ना कुणाशी माझी ओळख व्हायचीच. कल्पना कांबळे ह्या बाईशी अशीच रस्त्यात ओळख झालेली. ही बाई तशी निराधार. नवरा अट्टल दारूड्या. तो दारू पिऊन तिला गुराढोरासारखा मारहाण करायचा. त्याच्या जाचाला कंटाळून तिनं घर सोडलं. ती रात्री अक्षरश: फुटपाथवर झोपायची. तिला धुण्याभांड्याची कामं मिळायची. काम नसलं तर ती चक्क आल्यागेल्याकडून भीक मागायची. तिची सोबत मिळाली, याचा अर्थातच मला आनंद झाला. मी तिच्यासोबत हिंडू फिरू लागले.

मध्यंतरी अकस्मात् दुर्घटना घडली. आम्ही रस्त्यातून चालत असताना अनपेक्षितपणे कल्पनाला रिक्षानं धडक दिली. त्यात कल्पनाच्या पायाला दुखापत झाली. तिला चालताही येईना. उपचारासाठी आमच्याकडे पैसे नव्हते. मी आमच्या फॅमिली डॉक्टरांना कळकळीची विनंती केली. उदारमनस्क डॉक्टरांनी कल्पनावर मोफत उपचार केले. कल्पनाला चालता येत नव्हतं. मी माझ्या घरात तिला आश्रय दिला. आणि एक दिवस काय आक्रीत घडलं; हासभास नसताना सुहासिनीताई मुंबईला आली. कल्पनाला कॉटवर पहुडलेली पाहून तिला संताप अनावर झाला. ती करवादली. तारस्वरात म्हणाली, ''वंदे, तू महामूर्ख आहेस. महारामांगांना तू घरात आसरा देतेस? धर्माविषयी तूला काही चाड आहे की नाही?''

मीही प्रतिवाद करीत म्हटलं, ''महारमांग माणसं नाहीत काय? सर्वांभूती परमेश्वर हाच का तुझा धर्म?''

आमचा पराकोटीचा वाद झाला. अवमानित झालेली कल्पना लंगडत लंगडत निघून गेली घरातून.

आयुष्याच्या वळणांवर अनेकजणी भेटल्या. अशिक्षित, दरिद्री, असंस्कृत, अभावग्रस्त. त्यांनी काहीसा आधार दिला; नि भरपूर मनस्ताप. अशा लुक्क्या बायांशी आपण मैत्री का करतो, असा प्रश्न पडायचा. आणि त्याचं उत्तर असं मिळायचं की, आपणही लुक्केच तर आहोत. पण त्यांनीच मला अथर्विय जग दाखवलं. दुनियादारी पहायला शिकवलं. त्यांच्याबरोबर मी झोपडपट्टीवासियांचं जिणं पाहिलं.. भयानक दैन्यदु:खानं भरलेल्या त्यांच्या आयुष्याची काही अंशी मी साक्षीदार झाले.

सोनिया सिंगची ओळखही अशीच कुठल्याशा रेल्वे प्लॅटफॉर्मवर झालेली. ती मला वारंवार भेटू लागली. अधूनमधून घरी येऊ लागली. वर्णानं काळी. हिंदीत बोलायची. सिंग आडनावामुळं मी तिला भैय्याणीन समजायची. कुठल्याशा भैय्याबरोबर काही काळ राह्यल्यानं ती सिंग आडनाव लावायची. नंतर नंतर कळलं की, ती वेश्याव्यवसाय करते. बोरिवली स्टेशनला मी तिला भडक मेकअप करून फिरताना पाह्यलं होतं. इतकंच नव्हे तर बोरिवली स्टेशनवर लावलेल्या गुन्हेगारांच्या फोटोमध्ये मला तिचाही फोटो दिसला होता. तरीही मी तिच्याशी दोस्ती केली होती. मोठी जोखीम पत्करून. ती समाजाच्या खालच्या स्तरातून आलीय, ती गुन्हेगारीी प्रवृत्तीची आहे; याची मला पर्वा नव्हती. मी सहवासाची नि प्रेमाची भुकेली होते. सोनियामुळं मला त्रास झाला; नाही असं नाही. घरातला कुकर, छोटीमोठी भांडी तिनं लंपास केली होती.

सोनिया खादाड होती. सतत काही ना काही वचावचा खायची. तिच्या खादाडपणाचा मला भुर्दंड पडायचा.

ती म्हणायची, ''वंदा, वडापाव खिलाव ना.''

आणि मला नाही म्हणायला जमायचं नाही. तिला कधी वडापाव, कधी बुर्जीपाव, कधी मिसळपाव असं मला खिलवावं लागे.

आपण सहकुटुंब युरोपच्या दौऱ्यावर जात असल्याचं सुहासिनीताईनं कळवलेलं. खरं तर सुहासिनीताईनं सर्व भारतभर प्रवास केला होता. हाँगकाँग, बँकॉक, श्रीलंकेलाही ती जाऊन आली होती. आता तर युरोपची टूर! ताई किती भाग्यवान आहे म्हणायची. तिचं आयुष्य सार्थकी लागलं. तिचाच विचार दिवसभर डोक्यात घोळत होता. संध्याकाळी वडापाव पोटात ढकलून रात्री बिछान्यावर कलंडले. तेव्हाही मन:चक्षूंसमोर सुहासिनीताई तरळत होती. तिच्या आयुष्याचा वरवर चढणारा आलेख दिसत होता; नि मी कमालीची अस्वस्थ झाले होते. सुहासिनीताईला चांगलं रूप होतं. तिचं यथास्थित शिक्षण झालं. योग्य वयात तिला उमदा पती मिळाला. तिला श्रीमंती तर मिळालीच; पण नियतीनं तिच्या पदरात गोंडस बाळ टाकलं. आणि मी! जीवनाच्या सर्व पातळ्यांवर अपयशी ठरलेली; निराशेच्या गर्तेत गेलेली. आम्ही दोघी सख्ख्या बहिणी असून आमच्यात जमीन अस्मानचा फरक. हे विधात्या, तू किती रे पक्षपाती! एकाचं आयुष्य उजळवतोस; नि दुसऱ्याचं आयुष्य काळवंडून टाकतोस.

मी रात्रभर विचारभावनांच्या आवर्तात भिरभिरत राहिले. अलीकडं माझं विस्मरण पराकोटीचं वाढत चाललंय. विसराळूपणामुळं माझी ठायी ठायी फजिती होऊ लागलीय. फ्लॅटच्या चाव्या माझ्याकडून वारंवार हरवू लागल्यात. त्यामुळं अनेकदा फ्लॅटचं दार तोडावं लागलं. या प्रकरणात मला तासन्‌तास घराबाहेर बसावं लागलं. माझ्याकडून चाव्या हरवायच्या; तसेच पैसेही. पैसे पर्समध्ये ठेवण्याऐवजी मुठीत ठेवायची मला विचित्र सवय. त्यामुळं शंभरच्या किंवा पाचशेच्या नोटा कधी हरवायच्या, हे माझं मलाच कळायचं नाही. मग नोटा शोधायला मी दिवसभर रस्त्यावरून चकरा मारायचे. पैसे तर मिळायचे नाहीत; पण शरीरमनानं मी थकून जायचे. चहूबाजूंनी अंधारच अंधार दाटल्यानं मला फार असुरक्षित वाटू लागलंय. विशेषत: संभाव्य मृत्यूच्या भितीनं मला ग्रासून टाकलंय. त्यामुळं सोसायटीत कुणाचं निधन झालं; तर मी दिवसभर कावरीबावरी होते. कुणाच्या अपघाताच्या बातमीनं मन भयाकुल होतं. जाणिवेचा सगळा अवकाश अभद्र विचारांनी व्यापून जातो. खरं तर मृत्यू शाश्वत आहे, हे मला माहीत आहे. परंतु मला येणारा मृत्यू चांगला असणार नाही; याची मला जाणीव आहे. समजा मी गंभीर आजारी पडले; तर मला हॉस्पिटलमध्ये कोण नेणार आहे? घरी सकाळी इतरांप्रमाणे दारावर दूधवाला भैय्या येत नाही; किंवा भांडीधुणी करणारी मोलकरीण येत नाही. अशावेळी मी घरात वेळीअवेळी मरून पडले; तर कुणालाच कळणार नाही. घरातील उंदीर मात्र माझं पार्थिव कुरतडून विद्रूप करतील.

**– प्रकाश खरात**

भ्रमणध्वनी : ९००४०७५२५७

# काव्यरंग



## उधारी

जगलेच नाही मी हक्काचं असं काही...

आवडलेले जोडीदार आणत राहिले उधारीवर
छाती-पोट-डोळे-बिळे भरत राहिले आशेवर
कधी आईकडून, कधी पोटच्या गोळ्यांकडून...
मागूनच आणले मी पुरुष हात पसरून!

मग त्यांनीही नाही मांडली
संसाराची भातुकली मनापासून
आपल्या वाट्याचे दाणे-गूळ-खोबरं संपल्यावर
ते गेले बिनघोर निघून
त्यांच्या नावाच्या पाट्या मिरवणार्या दारांआड
मस्त विसावले तंगड्या ताणून!

एक मात्र खरं...
खोट्या संसारातही त्यांनी जागतं ठेवलं आपलं पुरूषभान
जबाबदारी न उचलता मिरवला पाठीचा कणा ताठ !
बोटं चाटून जेवताना काढले माझ्या पाककलेचे वाभाडे,
अन् माझ्या कातड्याच्या जोड्याने हाणले माझ्याच
पाठीत रट्टे!

आता उशिरा का होईना,
मीही सुकलेलं गर्भाशय फेकावं म्हणते
ही मायेची उधारी एकदाची संपवावी म्हणते!

**– योगिनी राऊळ**
yogini.raul@gmail.com

## भ्रम

आता कागदच म्हणाला
नाही उमटवून घेत जा तुझं काहीच
तडफड
तश्शीच
मला नाही फुटायचा पाझर कधीच
मुक्तीचा एहसास
इतक्या सहजासहजी?
हात्तिच्या एवढंच ना
मी
तर पाण्यावरही लिहीन
वाहत्या
ज्वाळेवरही रेखेन ठिणग्या
तुला नाही अंदाज माझ्या बोटांचा
हातांचा
मी थेट देईन तो हजारोंच्या हातात
फुटतील त्याला करोडो सळसळत्या फांद्या
अंगभर धुमसणाऱ्या
अश्रूंच्या वेदनेच्या अपमानबोधाच्या

निळ्याभोर आकाशाकडे झेपावणाऱ्या
विद्रोहाच्या

मग काय करशील?
शब्दांनीच लिहिता येतं
हा भ्रम आहे तुझा
तुला शाहीनबाग ठाऊक नाही?

**– प्रज्ञा दया पवार**
pradnyadpawar@gmail.com

# मोदींची कारकीर्द

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**मो**दी सत्तारूढ होऊन २०२० मध्ये जवळजवळ ६ वर्ष लोटलीत. म्हणजे ट्रंपपेक्षा त्यांनी दुप्पट काळ सत्ता गाजवली. मग त्यांनी अमेरिकेच्या अध्यक्षांपेक्षा दुप्पट कामगिरी केली का? दुर्दैवानं या प्रश्नाचं उत्तर नाही असंच द्यावं लागेल. दोन्ही देश लोकशाहीवादी म्हणून ढोल पिटवून आपण या महासत्ताक राष्ट्राच्या पंक्तीला उभं राहण्यासाठी आणि परप्रकाशात झळकण्यासाठी आटापिटा करतो. चीनच्या तुलनेनं आपण योजने मागे पडलो हे सर्व जग मानतं. याचं उत्तर आपल्या मंत्र्यांजवळ व सरकारचं मीठ खाणाऱ्या बाबूंजवळ तयार असतं. तो देश साम्यवादी. हुकुमशाहीत लवकर निर्णय घेऊन योजना मार्गी लावता येतात. लोकशाहीत तसं चालत नाही. आपल्या सुस्तीचं व नाकर्तेपणाचं हे पाठ करून ठेवलेलं समर्थन अमेरिकेसमोर लंगडं पडतं कारण दोन्ही देशात लोकशाही नांदते.



डेमॉक्रेटिक पक्षाचा तीव्र विरोध असूनही ट्रंपच्या अधिपत्यांखाली अमेरिकेनं जी नेत्रदिपक व दैदिप्यमान प्रगती केली त्यासमोर मोदींचं कार्य सर्वस्वी निष्प्रभ ठरतं. त्यांनी अर्थकारण जगात सर्वात सशक्त करून उपलब्ध नोकरांपेक्षा नोकऱ्या जास्त पैदा केल्या. आज या देशात मजुरांपेक्षा १७ लाख जास्त नोकऱ्या आहेत. पण त्यासाठी लागणारे कौशल्यवान कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे बेरोजगारी आहेच. तिचं प्रमाण ३.५% म्हणजे गेल्या ५० वर्षात सर्वात कमी. असा स्वर्ग कुठलाच नेता जगाच्या इतिहासात निर्माण करू शकला नाही.

त्यांनी वॉशिंग्टनमधल्या राजकीय गटाराचा उपसा करण्याचा विडा उचलला आणि अनेक प्रस्थापित अस्वस्थ करून शत्रू निर्माण केले. त्यामुळे कधी नव्हे तेवढं राजकीय धृवीकरण होऊन डेमॉक्रेटिक पक्षशासित लोकसभेनं ट्रंपच्या विरुद्ध महाभिनियोगाचा प्रस्ताव संमत केला. पण अधिसभेनं तो धुडकावून दिला. त्यामुळे डगमगून न जाता ट्रंपनी कठोर व अमेरिका अनुकूल परराष्ट्रधोरण राबवून चीनला वठणीवर आणलं. व्यापार असंतुलन कमी करण्यास सुरुवात केली. उत्तर कोरियाशी संवाद साधला, पण त्याला अद्याप यशाची फळं लागली नाहीत. जगातल्या अनेक शेअर बाजारांनी उसळी खाल्ली व गेल्या ३ वर्षात १७ ट्रिलियन डॉलरची संपत्ती निर्माण झाली. त्यात भारताचाही समावेश होतो.

तुलनेनं मोदींची प्राप्तव्य मर्यादित आहेत. त्यांच्या दोन कर्तृत्वांचं इतिहासाला विस्मरण पडणार नाही. एक म्हणजे राज्यघटनेतील 'तात्पुरतं' कलम ३७० रद्द करून काश्मिरमध्ये एकछत्री शासन सुरू केलं. हे हंगामी कलम काढून टाकण्याची गेल्या ७२ वर्षात कुठल्याच पंतप्रधानांची हिंमत झाली नाही. या धाडसी कर्तृत्वाबद्दल मोदींचा गौरव करावा तेवढा थोडाच. पाकिस्तान व त्याची नित्यानं पाठराखण करणारा चीन हे दोन देश सोडले तर सर्व जगानं ही अंतर्गत बाब म्हणून मोदींचा गौरवच केला. पंतप्रधान इमरान खाननी ट्रंपला टीकेच्या माळेत गुफण्याचा प्रयत्न केला पण तो सर्वस्वी फसला. मोदी व ट्रंपपेक्षा खान व ट्रंपमध्ये जास्त द्वैत आहे. म्हणून पाकिस्ताननं चीनला पुढे करून हा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघात उभा केला. या आंतरराष्ट्रीयीकरणाला भारताचा तीव्र विरोध असल्यामुळे जगानं चीनला गच्चू दिला. यावेळी मोदींनी सदिच्छेचं जे जागतिक भांडवल उभं केलं होतं ते कामी आलं.

मोदींनी गेल्या ६ वर्षात उचललेलं दुसरं ठोस पाऊल म्हणजे अलिकडेच (डिसेंबर २०१९) अंमलात आणलेला नागरिकत्व सुधारणा कायदा. त्यानुसार देशातील अवैध बिगर हिंदूंना (ख्रिस्टियन, शिख, जैन, बौद्ध व पारसी) नागरिकत्व मिळून त्यांना देशात सन्मानानं राहण्यास मिळेल. या तरतूदीतून मुस्लिम धर्मियांना हेतूत: वगळण्यात आलं. म्हणून काहींनी दंगामस्ती सुरू केली. या लोकांना शेजारच्या मुस्लिम देशात जाऊन राहण्याचं स्वातंत्र्य आहे. बांगला देशानं आपल्या देशवासीयांना परत घेण्याचं कबूल

देखील केलं. तो देश आर्थिक दृष्ट्या भारताच्या पुढे असल्यामुळे त्यांना भारतातील मर्यादित नोकऱ्यांवर डल्ला मारण्याची जरूरी नाही. पाकिस्तानी मुस्लिमांची निष्ठा त्या देशाशी असल्यामुळे त्यांचं तो देश स्वागतच करेल. मग राहिले ६ एक लाख रोहिंग्या नावाचे मायनारमधले विस्थापित मुस्लिम. गृहमंत्री अमित शहांनी त्यांची उचलबांगडी करण्याचं नुकतच जाहीर केलं. त्यांना अभय देऊन देशात सामावून घेतल्यानं भारताचा मोठेपणा जगाला दिसून येईल. कारण ते राजकीय छळामुळे (Persecution) देशात आलेले.

ट्रंपचं धोरण या बाबतीत तेवढं उदारमतवादी नाही. त्यांनी देशातील १२-३० दशलक्ष अवैधांची त्यांच्या मायदेशी बोळवण करण्याचं जाहीर केलं. भारतात पाकिस्तानपेक्षा जास्त मुस्लिम राहतात. त्यामुळे आपली धार्मिक सहिष्णूता सिद्ध करण्याची जरूरी नाही. मोदींनी हा कायदा करून भारताच्या राज्यघटनेची पायमल्ली केली अशी टीका तथाकथित राजपंडितांनी केली ती फोल वाटते. यात काही परदेशी पंडितांचाही समावेश होतो. त्यात वॉल स्ट्रीट जर्नलने जानेवारी ४, २०२० रोजी प्रसिद्ध केलेल्या टुंकू वरदराजन नावाच्या स्तंभलेखकाचा उल्लेख करावा लागेल. त्यानं मोदींच्या धोरणाला तीव्र विरोध दर्शवला.

पण मोदींच्या या वैभवशाली कर्तृत्वाला कृष्णबाजू आहे हेही मान्य करणं भाग आहे. त्यांनी ६ वर्षात सर्वसामान्याचं जीवन सुखकर करून त्यांच्या खिशात जास्त पैसे खुळखुळत रहावेत म्हणून ठोस पावलं उचललीत नाहीत. ट्रंपच्या ३ वर्षांच्या कारकिर्दीत सर्वसामान्य कुटुंबाच्या खिशात अतिरिक्त ५५०० डॉलर (४ लाख रुपये) पडले तसं मोदींनी केलं नाही. गेल्या ५ वर्षात जी वाढ झाली ती नगण्य होती. सध्या (जानेवारी २०२०) भारताचं अर्थकारण दवाखान्याच्या अतिदक्ष विभागात अत्यवस्थ स्थितीत पडून आहे.

रोजगारनिर्मिती खंडीत झाली. पण दर महिन्याला १० लक्ष नवीन उमेदवारांची नोकऱ्यांच्या शोधार्थ बाजारपेठेत भर पडण्याचं थांबलं नाही. या बाबतीत नवीन पदवीधरांमध्ये फक्त १०% इच्छुकांनाच नोकऱ्या मिळतात हे फार बोलकं आहे. मोदी सत्तेवर आहे तेव्हा अर्थकारणातील गुंतवणुकीचं प्रमाण ३५.२% असे ते आता २७% वर उतरलं आहे. प्रगती या गुंतवणूकदरावर अवलंबून असल्यामुळे धोरण बदलल्याशिवाय भविष्य फारसं उज्ज्वल दिसत नाही. हे शेतकऱ्यानं बी पेरण्याऐवजी ते खाल्ल्यासारखं आहे. पेरल्याशिवाय जसं पिक येत नाही तसं गुतवणूक केल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही.

याशिवाय वाढदर खुंटला व क्रयशक्तीला विशेषत: ग्रामीण भागात ग्रहण लागलं. हे बघून विरोधी पक्षानं (म्हणजे माजी अर्थमंत्री चिदंबरम्) म्हटलं की मोदी व त्यांनी नियुक्त केलेल्या अर्थमंत्री निर्मला सितारामन आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या बाबूंना अर्थकारणाच्या व्यवस्थापनाचा गंध नाही. ही टीका अस्थानी आहे असं म्हणता येणार नाही. सरकारच्या इतर मंत्र्यांनी चुका केल्या तर देशाचं मूक नुकसान होतं. ते चव्हाट्यावर येत नाही. पण अर्थमंत्र्यांच्या कुठल्याही निर्णयाचा दृष्य परिणाम अर्थकारणावर लगेच होतो. मुळातच सध्याच्या अर्थमंत्र्यांना जागतिक पातळीवर चिदंबरमसारखी प्रतिष्ठा (Gravitas) नाही. त्यांच्या चुकीच्या धोरणाचं पडसाद एकदम उमटले. उत्पन्नकर वाढवल्यानं आवक वाढते या बालिश तत्वज्ञानाला अंगीकारून त्यांनी जेव्हा कंपन्याचे एकत्रित उत्पन्नावर ४४% वर म्हणजे जगात सर्वात जास्त केले तेव्हा भांडवल पळून गेलं आणि शेअर बाजार गडगडला. मोदींनी डोळे वटारल्यावर शहाणपण येऊन वित्तरबाईंनी ते निम्मे केले. यावरून त्यांचं व त्यांच्या बाबूंचं आर्थिक अज्ञान जगाला कळलं आणि भारताची विश्वासार्हता रसातळाला गेली. मोदींनी ही (अ) व्यवस्थापनाची टोळी नेमल्यामुळे व अधिकार असूनही त्यात फरक न केल्यामुळे त्याचं नेतृत्व प्रश्नांकित झालं आहे. चुकीचे अधिकारी किंवा मंत्री नेमणं गुन्हा नाही. पण ते अयोग्य आहेत हे कळल्यावर त्यात बदल न करणं अक्षम्य चूक आहे असं जग म्हणतं. ट्रंपनी जसं अकार्यक्षम मंत्र्यांना लगेच ठोकर मारली त्यापासून मोदी बरंच काही शिकू शकतात. एकदा नेमलेला मंत्री म्हणजे पाषाणावरची रेघ समजण्याचं कारण नाही. एक व्यक्ती म्हणून सितारामन आदरणीय असतील, पण एक अर्थमंत्री म्हणून त्या अपुऱ्या ठरल्या याविषयी वाद नाही.

अर्थकारणाला आलेली अवकळा दूर करण्यासाठी त्यात रचनात्मक बदल (Structural Changes) करण्याची जरूरी आहे असं सर्व बिनसरकारी तज्ञ म्हणतात. पण तसं करणं कठीण म्हणून म्हणा नाही तर त्यांच्या स्वरूपाविषयी त्या व त्यांचे बाबू अनभिज्ञ असल्यामुळे म्हणा वित्तमंत्री हरीहरी करीत बसल्या आहेत. भरती आली म्हणजे जशा सगळ्या बोटी वर जातात तसं जागतिक वातावरण आकस्मिक बदलून (तेलाचे भाव घटले, जगाचं अर्थकारण सुधारून भारताची निर्यात वाढली वगैरे) भारताच्या अर्थकारणाला उसळी येईल या आशेनं त्या टोंगळ्याला बासन गुंडाळून बसल्या आहेत. अशा मौसमी (Seasonal) कारणामुळे भारताचं अर्थकारण सुधारणार नाही असं सर्व जग म्हणतं.

अमेरिकेत येऊन मोदींनी ५०,००० भारतीयांच्या प्रचंड गर्दीसमोर ट्रंपचे हात हवेत वर धरून ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या धावपटूप्रमाणे प्रेक्षागारात जोडीनं फेरी मारली. त्यावेळी ट्रंपमुळे त्यांना प्रचंड प्रसिद्धी मिळाली व त्यांच्या परावर्तीत प्रकाशात ते झळकले. त्यामुळे भारताची प्रतिमा उजळली. पण त्यानंतर मोदींच्या गाड्याला उतरण लागली. त्यांची 'मेक इन इंडिया' ही योजना सर्वथैव फसली तर ट्रंपची 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' कमालीची यशस्वी झाली. जगभरातून कंपन्या अमेरिकेत आल्या, त्यांनी अब्जावधी डॉलरची गुंतवणूक करून कारखाने उघडले व रोजगार निर्मिती केली. या उलट भारताची निर्यात वाढण्याऐवजी तशीच राहिली आणि तोंडी लावायला देखील नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या नाहीत.

उलट ट्रंपच्या चीन अमेरिकेमधील व्यापारयुद्धामुळे बहुदेशीय कंपन्या भारताकडे आकर्षित होण्याऐवजी त्या जास्त संख्येनं बांगलादेश, व्हिएटनाम व मेक्सिकोमध्ये गेल्या आणि आपण कोरडे

राहिलो. यामागची कारणं शोधून त्यात बदल करण्याऐवजी आपण सुस्त बसलो आहोत. भारतात अजून गुंतवणूकस्नेही वातावरण नाही हे यावरून सिद्ध होतं. उद्योग सुलभता निर्देशांकात आपण २०१९ मध्ये २३ क्रमांक वर जाऊन १९० देशात ७७ वा नंबर गाठला. म्हणून आपले मंत्री उत्सव साजरा करीत आहेत. त्याचं महत्त्व मर्यादित आहे. कारण त्यासाठी लागणारी आकडेवारी मुख्यत्वेकरून दिल्ली व मुंबईत गोळा करण्यात येते. त्यामुळे ती सगळ्या देशाविषयी प्रतिनिधिक नाही. एखाद्या मंत्र्यानं सोंग करून नवीन उद्योग सुरू केला तर त्याला किती अडथळे येतात हे कळेल व त्यात दुरुस्ती करता येईल. पण देशहितापेक्षा स्वहित महत्त्वाचं समजणाऱ्या राजकारण्यांना ही सोपी क्लुप्ती सुचली नाही याचं नवल वाटतं.

हे झाकोळलेलं वातावरण बघून परदेशात भारताविषयी शंकाकुल वातावरण निर्माण झालं आहे. परवाच (जानेवारी ४, २०२०) वॉल स्ट्रीट जर्नल या प्रख्यात दैनिकानं इशारा दिला की भारतात गुंतवणूक करताना डोळे उघडे ठेवा. त्या देशात गुंतवणूक योग्य वातावरण तर नाहीच पण धार्मिक अशांततेमुळे ते अजूनच ढवळून निघालं आहे. म्हणून मोदींना व देशाला आत्मपरिक्षण करण्याची वेळ उभी ठाकली आहे.

आपल्या धार्मिक, जातीय व भाषिक वैविध्यामुळे देशाला दिशा देऊन प्रगती करणं अमेरिकेपेक्षा कितीतरी कठीण हे कुणीही कबूल करेल. पण आपण विकासाची पहिली पायरी देखील गाठली नाही. इथे आपलं कर्तृत्व व नेतृत्व लंगडं पडलं हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**– डॉ. अनंत लाभसेटवार**
**लेखक, माजी अध्यक्ष–फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका**
anantlabh@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

## डॉ. अनंत पां. लाभसेटवार यांची दोन पुस्तके




**ट्रंप**
**एक**
**वादळी**
**जीवनपट**

प्रत्येकातच गुण व अवगुणांचं मिश्रण असतं. ट्रंप करिष्माधारक, वाटाघाटीपटू, कृतिप्रधान, नेतृत्ववान व अमेरिकेला अग्रणी ठेवणारे आहेत. त्याबरोबरच एक भंपकबाज बोलणारे, श्रीमंतीची अतिशयोक्त अभिव्यक्ती प्रिय असलेले व देशाचं राजकीय ध्रुवीकरण करणारे म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या या विरोधी पैलूंमुळे अमेरिकेला संघर्ष वाढला. सर्व दैनिकं व सर्वेक्षणं त्यांचा पराजय भाकीत करत असताना त्यांनी आपल्या पोतडीतून यशाचं पिल्लू बाहेर काढलं व शिखर गाठलं. या चढउतारांमुळे त्यांचा जीवनपट वादळी व चित्तथरारक झाला आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**


**अमेरिका :**
**स्थिती**
**व**
**स्थित्यंतरे**




अमेरिका विकासापेक्षा विलासावर जास्त भर देते असं सर्वसाधारणतः समजलं जातं. यातून कामक्रिया वगळावी लागेल कारण तिचं प्रमाण भारतापेक्षा या देशात एकतृतीयांशच आहे असं आढळून आलं. 'रोमांचित' हे या देशाचं मधलं नाव आहे. याउलट भारतात सार्वजनिक ठिकाणी बिडीऐवजी चुंबन निषिद्ध समजण्यात येतं. दोन देशांतील संस्कृतींत, चालीरीतींत व समाजात सापडणारे नानाविध फरक लेखकानं टिपून वाचकाला अमेरिकेविषयी सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

## ‘बाबा आमटे : व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व’




‘एकीकडे अस्पृश्यता, ब्राह्मणवाद आणि साम्यवाद सुरू असताना बाबा आमटे यांनी स्वत:च्या विचारांत परिवर्तन घडवत वाईट सवयींना तिलांजली देण्यासाठी ‘आनंदवन’ची उभारणी केली. कुष्ठरोग्यांच्या रक्तातून श्रम आणि उत्पादनाच्या जोरावर कुष्ठरोग्यांच्या जगण्याला नवा अर्थ, प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. तसेच, अस्पृश्यता, ब्राह्मणवाद, साम्यवादास जशास तसे उत्तर दिले,’ असे मत ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत प्रा. जयदेव डोळे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाळू दुगडूमवार लिखित ‘बाबा आमटे : व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व’ पुस्तकाचे रविवार, १ मार्च २०१९ रोजी प्रकाशन झाले. त्यावेळी पीपल्स महाविद्यालयातील नरहर कुरुंदकर सभागृहात ते बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे, बालसाहित्यिक प्रा. डॉ. सुरेश सावंत, कुंटूर कारखान्याचे विश्वस्त चेअरमन राजेश कुंटूरकर, ‘ग्रंथाली’चे प्रकाशक सुदेश हिंगलासपूरकर, ‘भारत जोडो यात्री’चे डॉ. अशोक बेलखोडे, माधव बावगे, ‘सकाळ’ माध्यम समूहाच्या ‘यिन बझ’चे संपादक संदीप काळे, सूर्यकांत कदम, बालाजी पवार उपस्थित होते.

प्रा. डोळे म्हणाले, की ‘‘कागदावर पेन ठेवणारी प्रत्येक व्यक्ती लेखक, साहित्यिक किंवा कवी होत नाही. लोकमान्य टिळक हातात लेखणी न धरता लेखक बनले. उलट महात्मा गांधी हे लेखक बनले. उलट महात्मा गांधी हे लेखक नव्हते, तरी त्यांनी अनेक पत्रांद्वारे लेखन केले. अशाच स्वरूपाच्या मौखिक लेखन परंपरेचे उद्‌गाते बाबा आमटेही होते. त्यांचा कवी म्हणून परिचय होता. महात्मा गांधी यांच्या एका भेटीमुळे बाबांनी मार्क्सवाद, समाजवाद आणि गांधीवादाचा अभ्यास केला. अस्पृश्य लोकांना स्पर्श, अस्पृश्यतेचा त्रास होत होता. त्याहीपेक्षा कितीतरी पटींनी कुष्ठरोग्यांना त्रास होत असे. म्हणून बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या भेगाळलेल्या जखमा पुसून त्यांच्या जीवनाला नवीन अर्थ प्राप्त करून दिला. त्यांना पुन्हा माणूस म्हणून समाजात जगण्याचा अधिकार मिळवून दिला आणि खऱ्या अर्थाने अस्पृश्यता मोडीत काढली. यासाठी गांधीजींचे आभार मानले पाहिजे. बाबा आमटे यांनी आयुष्यभर कुष्ठरोग्यांची सेवा केली. त्यांचा एकच विषय लावून धरला. परंतु, बाबा आमटे यांच्यानंतर त्यांचे काम त्यांच्या कुटुंबीयाशिवाय दुसरे कुणालाही करावेसे वाटत नाही. उलट आमटे कुटुंबीयांवर घराणेशाहीचा ठपका ठेवला जातो. लेखक बाळू यांनी बाबा आमटे यांचे काम पुस्तकातून अधोरेखित केले. शिक्षणव्यवस्थेत आजही ब्राह्मणी कल्पनेचे ज्ञान मिळते. त्या ज्ञानाला श्रमाची सांगड मिळत नाही. परंतु बाबा आमटे यांनी श्रमातून दाखवून दिले, की उजवा विचार वंशवादी गरिबांच्या विरोधात असतो.’’

यावेळी लेखक डॉ. दुगडूमवार यांनी पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. सुरेश सावंत, संदीप काळे, सुदेश हिंगलापूरकर यांचीही भाषणे झाली. शारदा कदम यांनी सूत्रसंचालन केले तर सोमनाथ रोडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. गजानन अडकिणे यांनी आभार मानले.

---

## ‘एका स्वर्गस्थ देशाची गोष्ट’




विनोदातून गांभीर्य व गांभीर्यातून विनोद सांगणाऱ्या डॉ. संजय कळमकर यांच्या कादंबरीत समाजाला अंतर्मुख करण्याची ताकद असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांच्या ‘एका स्वर्गस्थ देशाची गोष्ट’ या कादंबरीचे प्रकाशन रविवार, ९ फेब्रुवारी २०२० रोजी सावेडीतील कोहिनूर मंगल कार्यालयात डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार दादा कळमकर होते. साहित्यिक व आमदार लहू कानडे, ‘ग्रंथाली’चे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, ज्ञानदेव पांडुळे, अभिनेते मोहिनीराज गटणे आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, कळमकर यांनी पुराणकालीन लिखाणाची शैली नव्याने आणली आहे. सध्याच्या भारतीय राजकारणावर लिहिणे गरजेचे होते हे कळमकरांनी लिहिले. कळमकरांची ही कादंबरी राजकीय लिखाणाचा एक पॅटर्न बनेल. विनोदी

साहित्यात आलेली मरगळ दूर होईल. संत एकनाथ हे भारुडांमध्ये समाजातील कुप्रथांवर प्रहार करत होते, कळमकरांचे लिखाण वाचताना संत एकनाथांची आठवण येते.

आमदार कानडे म्हणाले, ''वेदनेला व्यंगाच्या स्वरूपात मांडून कळमकरांनी लोकांना वाचनास भाग पाडले आहे. सद्यस्थितीत मार्मिक टिप्पणी करत त्यांनी विनोदी अंगाने राजकारण्यांना गंभीर चिमटे काढले आहेत. वैगुण्यावर खुमासदार शब्दात नेमके बोट लावल्यामुळे कळमकरांचे लिखाण आत्मपरीक्षण करायला लावते.'' प्रारंभी शशिकांत नजान, श्रेणिक शिंगवी, गणेश लिमकर, मृणाल कुलकर्णी यांनी कादंबरीचे अभिवाचन केले. संजय कळमकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्नेहल ठाणगे यांनी केले.

---

## 'काळे आकाश, निळा प्रकाश'




डॉ. प्रमोद सलगरकर, सोलापूर लिखित 'काळे आकाश निळा प्रकाश' या ग्रंथाली प्रकाशित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दि. २९ फेब्रुवारी २०२० रोजी, सोलापूर येथील इंडियन मेडिकल असोशिएशन हॉलमध्ये डॉ. यश वेलणकर, मुंबई यांच्या हस्ते संपन्न झाला. अध्यक्षस्थानी डॉ. विजय कानेटकर होते. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर हेही या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. जयंत शेलगीकर यांनी केले तर वाचकप्रतिनिधी म्हणून अलका काकडे यांनी पुस्तकाचा समग्र आढावा घेतला. प्रमुख पाहुणे डॉ. यश वेलणकर यांनी या पुस्तकातील काही भाग वाचून दाखवला. त्याचबरोबर आधुनिक मानसोपचार व मेंदू विज्ञान यांच्या आधारे सैराट वर्तनाची शास्त्रीय मीमांसा सोप्या शब्दांत समजावून सांगितली आणि साक्षीध्यानासारखे उपाय सप्रयोग दाखवले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. कानेटकर यांनी लेखकाच्या शैलीचे व संवादकौशल्याचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीना जोशी यांनी केले. सुनंदा सलगरकर यांनी आभार मानले. सोलापुरातील अनेक क्षेत्रांतील मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

### पुस्तक पुरस्कार

## सध्याच्या पिढीला इंग्रजीच मातृभाषा वाटते : प्रा. प्रवीण दवणे



''सध्याच्या पिढीला आपल्या मातृभाषेची जाणीव नाही. इंग्रजीला ते सर्वाधिक महत्त्व देत असून तीच आपली मातृभाषा आहे, असे त्यांना वाटते. आधुनिक तंत्रज्ञान व बाह्यंत्रणांवर ते जगत आहेत. यासाठी वाचनसंस्कृतीवर भर देण्याची गरज आहे. त्यातून मातृभाषा जोपासणे शक्य होईल,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रवीण दवणे यांनी व्यक्त केले.

पुणे नगर वाचन मंदिराच्या १३२ व्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कारसोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी वाचन चळवळीतील आदर्श कार्यकर्ता पुरस्कार शोभा बोन्द्रे, आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार लक्ष्मण लोखंडे यांना, तर संत वाङ्मयविषयक ग्रंथ पुरस्कार 'समर्थ व्यवस्थापन (दासबोध)' ग्रंथाचे लेखक रमेश कुलकर्णी यांना देण्यात आला. दवणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

दवणे म्हणाले, ''वाचनसंस्कृतीमुळे हरवलेली पिढी सापडेल आणि यासाठी अधिकाधिक पुस्तकांचे वाचन गरजेचे आहे. चिपळूणकर, आगरकरांच्या उत्तम लेखनाने आपल्या मातृभाषेला जिवंत ठेवले आहे. त्यांच्या या लेखनाचे सध्याच्या पिढीने वाचन करायला हवे. यासाठी ग्रंथालयातील काही पुस्तके हरवली तरीसुद्धा चालेल. ग्रंथपालाची साक्षरताही गरजेची आहे. पुस्तके वाचणे म्हणजे त्यातील मजकूर आत्मसात करणे. परंतु, आताच्या यंत्रणांमुळे हा मजकूर फक्त बोटाने वर सरकविण्याचे कार्य केले जात आहे. ग्रंथसंस्कृती हीच पालकसंस्कृती आहे. कारण यामुळे आपण घडतो व मातृभाषा जिवंत राहते.''


## महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त 'ग्रंथाली'चे लेखक






घेताना उंच भरारी पंखांना बळ देणारी
भविष्याची वेधशाळा गं सुंदर माझी शाळा







बालपणीच्या सोशिक आदिवासी आलापल्लीशी
जोडलेल्या आठवणी सांगणारं पुस्तक

**'ग्रंथाली' परिवाराकडून हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा!**

# शिल्पा जितेंद्र खेर लिखित दोन पुस्तके





**यश म्हणजे**
**भाग १**

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

**यश म्हणजे**
**भाग २**

**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३५० रुपये**




'यश' या संकल्पनेचा सांगोपांग उहापोह मान्यवरांच्या आयुष्यातून त्यांच्या आचार–विचारसरणीतून वाचकांसमोर मांडण्याचे बहुमोल कार्य या पुस्तक रूपाने घडले आहे.
यश मिळविण्याच्या प्रक्रियेत स्वतःला ओळखणे, स्वतःला काय आवडते, नेमके आपले स्वतःचे स्वप्न कोणते याची आधी ओळख पटावी लागते. यश हे खूपदा कालसापेक्ष असतं.


# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**तिसरा डुळा**

**किरण येले**




**जगण्याच्या रखरखीत प्रवासातले अनवाणी प्रवासी**

'हातापायाच्या काड्यांवर आपलं भलंमोठं डोकं सांभाळत  हेलपाटत चालणारं, चळाचळा मुतायला लावणारी नजर बाळगणारं, पेनच्या निबेसारखी नखं असणारं मूल म्हणजे या कथेचा लेखक होतं, ज्याचं नाव 'जावेद' आहे, जो आजही जिवंत आहे आणि कायम जिवंत असेल. त्याचं तोंड दाबा, गळा दाबा, श्वास बंद करा, खून करा, तरीही तो मरणार नाही कधीच.'

'तिसरा डुळा' हा किरण येले यांचा 'मोराची बायको' नंतर आलेला दुसरा कथासंग्रह. किरण येले यांचा खरा परिचय आहे तो कवी म्हणून. 'चौथ्यांच्या कविता', 'बाईच्या कविता' हे दोन कवितासंग्रह अगोदर प्रकाशित झालेले आहेत. परंतु याबरोबरच त्यांचे दूरदर्शनवर मालिका लेखन सुरू असून 'प्लॅटफार्म नं.९' हे नाटकही प्रकाशित झालेले आहे. त्यामुळे कवी, कथाकार आणि नाटककार अशी त्यांची ओळख आता स्थापित झाली असून या तीनही साहित्यप्रकारांवर त्यांची हुकूमत आहे, ती या साहित्यातून आणि अनेक नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेल्या कसदार लेखनावरून सर्वमान्य झालेली आहे. आजच्या कसदार आणि सशक्त कथालेखकांच्या यादीत किरण येले यांचे नाव आवर्जून घ्यायला हवे.

'मोराची बायको' हा कथासंग्रह त्याच्या वेगळेपणामुळे वाचक आणि समीक्षकांच्या नजरेत भरला, तसाच वेगळेपणा जपलेला 'तिसरा डुळा' हा कथासंग्रह आहे. या संग्रहात एकूण सात कथा आहेत, दीर्घ वाटाव्यात अशा. आवाका मोठा असलेल्या. वाचताना वाचकाला आपल्या कवेत घेणाऱ्या. जगण्यासाठीची धडपड जन्मतःच सोबत असलेल्या, संघर्षाने तावून सुलाखून निघालेल्यांच्या या कथा आहेत. 'जावेद जिवंत आहे' या कथेत  जावेद या लहान बाळाला भुकेपासून वाचवण्यासाठी केंद्रस्थानी ठेवलेले दिसते परंतु जमील आणि रखमाचा जिवंत राहण्यासाठी जो संघर्ष आहे, तो जावेद इतकाच जीवघेणा आहे. हा संघर्ष घडणाऱ्या सगळ्या घटनांतून अशा टोकावर येऊन पोहोचतो की विचारांचे चक्र जागीच गोठून जावे. 'तिसरा डुळा' या कथेतला म्हादू अंगावर शिवाचा वेष परिधान करतो आणि जणू आता प्रत्यक्ष भगवान शिवाची शक्ती आपल्याला प्राप्त झाली आहे या आवेशाने वागू पाहातो. होणाऱ्या अन्यायाविरोधात या शक्तीचा उपयोग करू पाहातो. परंतु हे सोंग सोंगच ठरते तेव्हा त्याचा होणारा भ्रमनिरास कडेलोटासारखा दयनीय ठरतो. आणि स्वप्नांचा चुराडा होत असलेले पाहणे मंजुळेच्या नशिबी येते. तीच अवस्था 'झुंबर' कथेतील धनकूची.  डोक्यावरच्या पेटत्या दिव्यांचे झुंबर मिरवणुकीत वाहताना स्वतःलाही उजळू पाहातो. परंतु इतरांना उजळून टाकताना त्याच्या खाली असलेल्या अंधाराचीच सावलीच त्यांच्यावर  पांघरूण घालते. 'इसाक पक्का हिंदू होता' या कथेचे वातावरण हे हिंदू आणि मुस्लीम धर्माच्या कडवेपणाने भारलेले आहे. बाप मुस्लीम आणि आई हिंदू, यांच्या पोटी जन्म घेतलेल्या इसाकने माथ्यावर भगवा टिळा मिरवला, सगळ्या देवांच्या आरत्या पाठ केल्या, तरीही त्याला हिंदूपण लाभत नाही. 'असुविधाके लिये खेद है...' या कथेतील कुतुब परिस्थितीने आवळलेला तरीही वेश्याव्यवसायात सापडलेल्या अमलाला सोडवण्यासाठी मदत करू पाहतो. त्याला तिच्यात स्वतःची मुलगी सायरा दिसते. बंद पडलेल्या कंपनीच्या जागी नवीन टोलेजंग इमारत उभी राहणार आहे, तिचे 'प्रॉपर्टी एक्झिबिशन' लागले आहे. त्याचवेळी एक्झिबिशनच्या बाहेर बंद कंपनीच्या अवशेषात मशीन ऑपरेटर दत्ता जावळे आपल्या पूर्वीच्या दिवसांचे अवशेष शोधतो आहे. यात असलेला विरोधाभास, माणसांमाणसांमध्ये असलेला स्वार्थ, धार्मिक तेढ आणि तिचा केलेला सोयीस्कर वापर, पिचलेल्यांना नसलेले भवितव्य, या सगळ्यांमागे असलेले मानसशास्त्र या कथांमधून मांडलेले आहे. त्यांच्यात समान सूत्र नाही, परंतु एका वर्गाचा शोध, त्यांच्यातली दुर्बलता, त्यांच्यात असलेली जगण्यासाठीची आस, यशाऐवजी पदरी आलेले अपयश, हे सारे लेखकाने या कथांमधून वाचकांसमोर ठेवले आहे. त्यांच्या मनाचा तळ ढवळून काढला आहे.  वार करणाऱ्या वृत्तींची धार किती धारदार आहे, यावर बोट फिरवून पाहिले आहे. याचे कारण या  व्यक्तिरेखांना स्वतःला स्वतःविषयी लिहिता येत नाही. 'मी का लिहितो' या मनोगतात या व्यक्तिरेखांच्या मानसिकतेविषयी आणि स्वतःच्या लेखनाविषयी लेखकाने स्वतःचे चिंतन लिहिले आहे, ते लक्षात घेण्यासारखे आहे.

किरण येले यांचे कथालेखन हे आपण एखादा चित्रपट पाहात आहोत असे चित्रदर्शी आहे. कथेत असलेल्या व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये सांगताना ते तिच्याभोवती असलेले वातावरण नाटकाच्या नेपथ्यासारखे उभे करतात. त्यामुळे ती कथा केवळ त्या व्यक्तिरेखांची न राहता संपूर्ण वातावरणाची, तिच्यामागे असलेल्या वास्तवाची होते. वास्तवात मुरलेली भाषा तिच्या अंगभूत वैशिष्ट्यांसह देण्यावर भर आहे. त्यामुळे या व्यक्तिरेखांचे जिवंतपण ठसठशीतपणे अधोरेखित झालेले दिसून होते. कथांना असलेला शेवट हा धक्कादायक वा ठरवून केलेला नाही, कथेला तिच्या नैसर्गिक प्रवाहाने जाऊ देण्याचे स्वातंत्र्य ते देतात. या शेवटाबाबत आणखी एक वैशिष्ट्य  सांगता येईल, ते म्हणजे त्या विषयी कथाकाराचे निरूपण ते शेवटी देतात. त्यामुळे कथा संपल्यानंतरही ती आपल्या वाचनकप्प्यातून दूर होत नाही, वाचक म्हणून आपण तिथेच जखडलेले राहतो. 'घोडा आपल्या मालकाशिवाय  दुसऱ्या कुणाला पाठीवर खोगीर बांधायला देत नाही.' 'हनिमूनकी रात सांस की बात!' 'रस्त्यावरच्या माणसांचं अर्ध आयुष्य जवळपास चवड्यावरच जातं, पोटातली भूक दाबत.' यासारखी वाक्ये इतक्या सहजपणे आणि तितक्याच चपखलपणे येतात, की ती कथेइतकीच मनाचा ठाव घेतात. या सगळ्यात हेही जाणवत राहते, कथा आणि कथाकार हे दोघे एकाचवेळी वाचकाची संवाद साधत आहेत. सतीश भावसार यांचे आशयसंपन्न मुखपृष्ठ हे संग्रहाचे वैशिष्ट्य ठरावे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

**सॅल्यूट**
**यशवंत व्हटकर**



### गौरवशाली सेवेची चतुर्थ गाथा

'फक्त गुन्हे उघडकीला आणले म्हणजे गुन्ह्याचा तपास पूर्ण होतो असे नसते. जोपर्यंत पूर्ण तपास होऊन बळकट पुरावे हस्तगत करून त्यावरून कोर्टात दोषारोपपत्र सादर करून त्याची केस कोर्टात चालवून आरोपीला शिक्षेपर्यंत नेल्याशिवाय हे त्या विविक्षित गुन्हातपासाचे काम संपत नसते.'

यशवंत व्हटकर यांच्या जीवनगाथेचा 'सॅल्यूट' हा चौथा भाग. 'गुन्हेगारांच्या मागावर', सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' आणि 'सत्यमेव जयते' ही त्यांची अगोदर प्रकाशित झालेल्या जीवनगाथेची नावे. २८ एप्रिल १९८३ ते ३१ मे २०१८ असा ४३ वर्षांचा हा सेवाकाल, पोलीस उपनिरीक्षक ते साहाय्यक पोलीस महानिरीक्षक असा चढता भाजणीतला अभिमानास्पद प्रवास. म्हटले तर खडतर, जिवाशी खेळणारा, म्हटला तर कर्तव्य, सेवा, न्याय यांचे पालन. सेवाकाळात केलेल्या कामगिरीविषयी, झालेल्या दंगलींविषयी, घडलेल्या गुन्ह्यांविषयी, भेटलेल्या अधिकाऱ्याविषयी, त्या त्या वेळी घेतलेल्या निर्णयांविषयी त्यांनी प्रांजळपणे लिहिले आहे. यातून एका कालखंड उभा राहिलेला आहे. असा कालखंडाचा दस्तऐवज म्हणून या चरित्रांकडे पाहिले जाते. व्यक्तिगत प्रवास जसा एका टोकाकडून दुसऱ्या टोकापर्यंत बढतीच्या स्वरूपात आलेखासारखा होत जातो, तसा गुन्हेगारी जग आणि त्यांची कार्यपद्धती, पोलिसदल आणि त्यांची कार्यपद्धती यांचाही आलेख वाचकासमोर कालखंडानुसार उलगडत जातो. जे जे घडते त्याविषयी त्या-त्या वेळी खूप चर्चिले जाते. परंतु पुढे ते काळाच्या ओघात स्मरणातून वाहून जाते. अशावेळी अशा चरित्रांचा उपयोग होतो, जी त्यांचे जतन करून ठेवतात. हे जतन करून ठेवण्याचे काम यशवंत व्हटकर यांनी करून ठेवले आहे. कसाबला जेरबंद करण्याची घटना, कुर्ला दंगल, शक्तीमिल बलात्कार प्रकरण, आझाद मैदान दंगल, मंत्रालयात लागलेली आग, आमदाराने पोलिसावर उगारलेला हात, बंदरातून होणारी तेलचोरी, बलात्काराचा खोटा आळ घेणारी बाई, खंडणी, गुन्हेगार टोळीतील म्होरक्यांची टोपण नावे, खलिस्तान चळवळीचा बिमोड, यासारख्या अनेक प्रसंगात बजावलेली कामगिरी, त्यांचा तपास, त्यावेळी आलेले विविध अनुभव, हे सारे यात आले आहे. शक्तीमिलच्या प्रकरणात सापडलेल्या आरोपीला गोळ्या घालाव्यात इतकी कठोरता, आणि पिडित तरुणीकडे पाहतांना खळकन् डोळ्यांत अश्रू येण्याइतपतचे हळवेपण, अशी व्हटकरांची दोन रूपे इथे पाहायला मिळतात. अरविंद इनामदार, सत्यपाल सिंह, हिमांशू रॉय, लक्ष्मीनारायण, विवेक फणसळकर, सतीश माथूर, दाते, यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदर्शाविषयी लिहिताना त्यांच्या ठायी असलेल्या कृतज्ञता, आपुलकी आणि पारख यांचा परिचय होतो. त्यामुळे ही जीवनगाथा नावाप्रमाणे केवळ यशवंत गाथा नाही, ती एका कालखडांची मौलिक अशी पोलिसगाथा आहे, असे म्हणता येईल.

दक्षता मासिकाचे सरसंपादकत्व, अध्यात्माकडे झुकलेला कल, कुटुंब, याविषयीचे तपशीलही येथे आलेले आहेत.

ही एक यशस्वी सेवाकालाची गौरवशाली गाथा आहे. एक कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, शिस्तीचा कडक अधिकारी, जिवावर उदार होऊन थेट हत्यारधारी जमावाला भिडणारा अधिकारी, न्यायासाठी अन्याय करणाऱ्यांची पाळेमुळे उखडून मुसक्या आवळणारा अधिकारी, अत्याचाराने पिडीत झालेल्यांसाठी काळजातून हेलावणारा अधिकारी, राष्ट्रपती शौर्यपदकाला गवसणी घालणारी कामगिरी पार पाडणारा अधिकारी, अशा अनेक बिरुदावलीने सन्मानित झालेले व्हटकर जमिनीवर पाय रोवून उभे आहेत असेच त्यांची गाथा वाचताना लक्षात येते.


व्हटकरांची लेखनशैली ही खाकी वर्दीवर मिरवलेल्या पदकांसारखी प्रसन्न आहे, माळरानावर उगवलेल्या हिरवळीसारखी. तिच्यात त्यांच्या कडक शिस्तीचे करडे फटकारे नाहीत, सर्व जगाच्या पालकात्वाने गांजलेले अर्वाच्च्य भाषेचे ओरखडे नाहीत, की पदाने प्राप्त झालेल्या अधिकाराचा दर्प नाही. एखादा संवेदशील कवी आपली कविता हळुवारपणे फुलवत नेईल, इतके हळवेपण आणि संवेदनशीलता यात आहे. मार्दव आहे. 'तपासात पोलिसांनी काठी न उचलता नुसते पेन उचलल्याने दंगल घडवून आणणाऱ्यांच्या व दंगलखोरांच्या तोंडाला अक्षरशः फेस आला.' 'तपासात नियंत्रणकक्षाच्या वायरलेस संदेशाप्रमाणे एकेक घटना अक्षरशः माळेतील मण्यांप्रमाणे जोडून त्या घटनेकरिता आवश्यक पुराव्यांची साखळी करवून घेऊन ती सांधून-सांधून एकसंघ 'केस' बनवली.' ' आमच्या तपासाने त्यांची पुरती हवा गेली... सध्या त्यांची अवस्था आहे चेपळून गेलेल्या फुटबॉलसारखी.' यासारखी वाक्ये त्यांच्यातल्या साहित्यिकाची ओळख करून देतात. आपले कार्य आणि शौर्य यांचा आलेख सादर करताना अनेकांना इतरांवर दोषारोप करण्याची, सगळे श्रेय आपलेच आहे असे ठणकावून सांगण्याची वा इतरांचे न्यून दाखविण्याची खुमखुमी असते, परंतु व्हटकरांनी आपली रेषा मोठी दाखवण्यासाठी इतरांच्या रेषा खोडून टाकलेल्या नाहीत. उलट करता येईल तितके कौतुक आणि श्रेय ज्याचे त्याला मोकळेपणाने बहाल केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या वरिष्ठांप्रमाणेच सहकारी असलेल्या रमेश महालेसारखे इतर अधिकारी आणि हवालदार पवारसारख्या पोलिसांचे कौतुक त्यांच्या नावानिशी केलेले दिसून येते. आपले कर्तव्य पार पाडीत असताना कोणते भान जपायला हवे, याचाही वस्तुपाठ त्यांच्या एकूण कारकिर्दीवरून स्पष्ट होतो.

यापूर्वी काही पोलीस अधिकाऱ्यांची सकस आत्मचरित्रे प्रकाशित झालेली आहेत. त्यांच्यात व्हटकरांच्या आत्मचरित्राने भर घातली आहे, असे निःसंशयपणे नमूद करता येते. सतीश भावसार यांचे उचित मुखपृष्ठ मूर्तिमंत गौरव साक्षात उभे करते.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**दक्षिणेची मथुरा तेर**
**राज कुलकर्णी**




**वैभवाच्या खुणा जपणारे गाव**

'आजपर्यंत ज्यांना जीवनविकासाचा मार्ग कधीच उपलब्ध झाला नाही, अशा अठरापगड जातींना भटकंतीच्या धाग्यात एकत्र गुंफण्याचं काम संतांनी केलं. सामान्यांची ईश्वरभक्तीचं कर्मकांड, पौराहित्य यांच्या तावडीतून सुटका करून प्रपंचाला परमार्थ पातळीवर नेण्याचं शिकवलं ते संतांनी. भागवतभक्तीची महती सांगणाऱ्या वारकरी संप्रदायाची जन्मभूमी म्हणजे मराठवाडा आणि या मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात भगवंतांची पताका फडकावली ती तेरच्या गोरोबा कुंभार यांनी.'

महाराष्ट्राला लाभलेली सांस्कृतीक, संत–शौर्याची परंपरा, उभी असलेली कला, भक्ती, शिल्पे, तीर्थे,गड, लेण्या यांची अजोड देण, नदीखोऱ्यांचे वैभव, इतिहास, संपन्नता, यामुळे सर्वगुणसंपन्न असा महाराष्ट्र हा आपला प्रत्येकाचा अभिमानाचा मानबिंदू ठरलेला आहे. त्यात भर पडली ती उत्खननातून उजेडात आलेल्या प्राचीन अशा संस्कृतीची, वैभवाची. ती आहे 'तेर' नावाची. उस्मानाबाद जवळ असलेल्या 'तेर' गावाचे वैभव तेथे झालेल्या उत्खननामुळे उजेडात आले. त्यासाठी ब्रिटिश संशोधक कझीन, निजाम सरकार, बी.एन. चाफेकर आणि बॅनर्जी, म रेश्वर दीक्षित यांनी केलेले प्रयत्न जसे मौलिक आहेत, तसे ते वाचकांपर्यंत पोहचवण्याचे श्रेय राज कुलकर्णी यांच्याकडे जाते. 'तेर' हे केवळ उत्खननाशी नाते सांगणारे एक गाव नाही, तर त्याला एक संस्कृती आहे, जी मोहंजोदडो आणि हडप्पाच्या संस्कृतीशी साम्य दर्शवते, तिच्याशी नाते दर्शवते, तिचा सर्वांगीण परिचय करून देताना या गावाला 'दक्षिणेची मथुरा' अशी उपमा दिलेली आहे. पैठण ही दक्षिणेची काशी समजली जाते तसे तेर दक्षिणेची मथुरा.

राज कुलकर्णी हे व्यवसायाने विधिज्ञ आहेत, तरी वृत्तीने साहित्यिक आणि संशोधक आहेत. आकाशवाणी, वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्यासाठी नियमित लेखन केलेले असून, 'आठवडी बाजार' आणि 'वेताळ पंचविशी' ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. 'पं.जवाहरलाल नेहरू' हा यांच्या संशोधनाचा विषय आहे. नुकतेच उस्मानाबाद येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनातही त्यांचा लक्षणीय असा सहभाग होता.

तेर येथे सापडलेल्या अनेक वस्तू, भांडी, मूर्त्या, नाणी, स्तूप, विटा, शिलालेख, यावरून या गावाच्या रचनेची, तेथील लोकजीवनाची, संस्कृतीची, राहणीमानाची, व्यापारउदीम, पिके, यांची माहिती उपलब्ध झाली आहे. तिचा संपूर्ण तपशील या पुस्तकात आलेला आहे. या सापडलेल्या वस्तूंचे जतन येथे उभारलेल्या लामतुरे संग्रहालयात केलेले आहे.

या गावाला ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. सातवाहन, शिलाहार ते निजामाच्या राजवटीपर्यंतच्या इतिहासाचे वैभव या गावाने अनुभवलेले आहे,जतन केलेले आहे. निजाम आणि स्वातंत्र्य चळवळ यांचे हे गाव साक्षीदार आहे. अनेक घाव या गावाने सोसलेले आहेत. त्याकाळी गावाभोवती लाकडी तटबंदी असलेले एकमेव गाव म्हणून याची इतिहासात नोंद झालेली आहे.

लामतुरे पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय यालाही एक इतिहास आहे, त्यासाठी लामतुरे कुटुंबाचे योगदान, येथे सापडलेली हस्तदंती बाहुली व तिच्यावरून सिद्ध झालेली हस्तदंती कला, हा एक वेगळाच इतिहास या पुस्तकात वाचायला मिळतो. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत गोरोबा कुंभार याच तेरचे. त्यांनी रुजवलेला भक्तीभाव या गावाने आजही श्रद्धा आणि निष्ठापूर्वक कसा जतन केलेला आहे, त्याचा आणि संत गोरोबा कुंभारांचा थोडक्यात पण प्रत्ययकारी असा परिचय लेखकाने या पुस्तकात करून दिलेला आहे. तो आदर्श म्हणजे त्या गावाचे सांस्कृतिक वैभव म्हणायला हवे.

राज कुलकर्णी यांनी अतिशय मेहनतीने हे पुस्तक साकारलेले आहे. त्यासाठी त्यांनी केलेला अभ्यास आणि संशोधन याचा प्रत्यय हे पुस्तक वाचत असताना येतो. तेर गावाचा इतिहास, स्वातंत्र्याचा इतिहास, सातवाहनांपासूनचे ऐतिहासिक पुरावे, उत्खननाचा इतिहास, असा मोठा दस्तऐवज या पुस्तकाच्या निर्मितीत सामावलेला आहे. संत एकनाथ, संत नामदेव यांच्या अभंगातून आलेले तेरविषयीचे आणि संत गोरोबा कुंभार यांच्या विषयीचे अचूक संदर्भ वाचताना आपण थक्क होतो. कुठलेही संशोधन मुळापर्यंत जाऊन केलेले असेल तर ते परिपूर्णतेच्या निर्मितीचा आनंद नक्कीच देते. तसा आनंद हे पुस्तक वाचताना मिळतो. एखाद्या गावाची माहिती देताना ती गॅझेटियरमध्ये असते तशी रुक्षपणे दिली जाते. परंतु राज कुलकर्णी यांनी या पुस्तकाच्या लेखनाला तसे खर्डेवजा रुक्षपण येणार नाही याची काळजी घेतलेली आहे. मजकूर जसा सर्वागीन असायला हवा तसा तो वाचनीय असला पाहिजे, वाचक या लेखनाशी जोडलेला राहिला पाहिजे, हे भान त्यांनी राखले आहे, याचा अनुभव पुस्तक वाचताना सतत येत राहतो. मजकुराच्या जोडीला जसे संदर्भ येतात तसे अनेक फोटो दिलेले आहेत. त्यातले काही रंगीत आहेत. त्यावरून तेरच्या संस्कृतीचा, एकूण जीवनव्यवहाराचा परिचय दृश्यस्वरूपात होतो. लेखनातली सहजता आणि तिच्यातला सखोलपणा भावणारा आहे. लेखनाला जो समग्रपणा असायला हवा तो तर जपलेला आहेच परंतु तो वाचत असताना आपण वाचक लेखकाच्यासोबत तेर गावाच्या खाणाखुणा पाहात त्या गावातून प्रत्यक्ष हिंडत आहोत, असे वाटत राहते. उत्खनन आणि उत्खननाशी जोडलेल्या गावाचा इतिहास कसा लिहिला जावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'दक्षिणेची मथुरा तेर' हे पुस्तक होय.

तेर येथे सापडलेली हस्तिदंती बाहुली ही त्याकाळच्या तेर गावाच्या शिल्पकलेची प्रतीक समजली जाते. परदेशात पचंड लोकप्रिय असलेली ही बाहुली आजही लामतुरे यांच्या संग्रहात पाहायला मिळते. शिरीष घाटे यांनी ही बाहुली मुखपृष्ठावर योजताना तिचे मूळ स्वरुपाला जसेच्यातसे जिवंत ठेवलेले आहे. या बाहुलीच्या डोळ्यांत असलेला नितळ धारेपणा ही तिची खरी ओळख. ती ओळख कायम ठेवण्यातले कौशल्य मुखपृष्ठकारांकडे नक्कीच जाते.

**मूल्य १६० रुपये सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**ट्वेल्थ फेल**
**अनुराग पाठक**
**अनुवाद : संदीप काळे**




**जिद्द आणि चिकाटी यांची साथ क्षमतेला असेल तर यश शरण येणारच!**

'मनोज, तुझ्यामध्ये खूप काही करण्याची अपार क्षमता आहे. जर तुझ्यात क्षमता राहिली नसती तर मी तुला काहीच सांगितले नसते. मात्र आपल्या क्षमतेसोबत न्याय न करणे म्हणजे स्वतःवर आणि समाजावर अन्याय करण्यासारखे आहे. सर्व अपमानांचा बदला घेण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे यशस्वी होऊन जगासमोर उभे राहणे.'

'ट्वेल्थ फेल' या अनुराग पाठक लिखित हिंदी कादंबरीचा मराठी अनुवाद केला आहे 'सकाळ समूहा'चे प्रसिद्ध पत्रकार आणि संपादक, संदीप रामराव काळे यांनी. सिद्धहस्त लेखक म्हणूनही त्यांनी स्वतःचे स्थान सिद्ध केलेले आहे. आतापर्यंत पंचवीस ग्रंथांची माया त्यांच्या नावांवर जमा आहे. 'मु.पो. आई' या ग्रंथाने तर त्यांच्या कसदार लेखन कारकिर्दीवर कळस चढविलेला आहे, असे निर्विवादपणे म्हणता येईल. सदरचा अनुवाद हा त्यांच्या उत्तम अनुवादकाची साक्ष देणारा आहे. परभाषेतले कुठलेही साहित्य अनुवादामुळे आपला मूळ भाषेचा ठसा पूर्णपणे पुसून टाकल्याचा कटू अनुभव जेथे घेते, तेथे अनुवादकाने अनुवादाद्वारे त्याच्या भाषेत उत्तम कामगिरी बजावल्याचा अनुभव सिद्ध होतो. तो अनुभव संदीप काळे यांनी या अनुवादाद्वारे दिला आहे, असे निखलसपणे म्हणता येते. त्यांचा 'भाऊ' हा शब्द मात्र त्यांची ओळख देण्यास विसरत नाही.

मनोश शर्मा या तरुणाची ही कहाणी आहे. गणित या विषयाचा बागुलबुवा मानगुटीवर बसल्यानंतर जे होते तेच मनोजचे होते. मग त्याला टाळून पुढे जाण्याला पर्याय राहात नाही. परंतु पुढे जाणेही सोपे नसते. दात आहे तर चणे नाहीत आणि चणे आहेत तर दात नाहीत, या म्हणीची पुरेपूर अनुभूती या प्रवासात सतत येत राहणे, याला कोणते भाग्य म्हणायचे? तरीही मनोज हा काटेरी प्रवास तडीस नेण्याची चिकाटी सोडीत नाही, हे महत्त्वाचे. या खडतर प्रवासात अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्यात प्रामाणिक, इमानदार वडिलाचे ध्येयवादी व्यक्तिमत्त्व, तात्काळ निर्णय घेऊन अनेकांना न्याय देणारे दुष्यंतसिंह नावाचे वरिष्ठ अधिकारी, विवेकानंद केंद्राचे त्यागी, यांचे चित्रण आणि त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे मनोजचे संकल्प, हे प्राप्त परिस्थितीत जळत्या निखाऱ्यांवरून चालण्यासारखे भासत राहते. काटकसरीत नेटाने संसाराचा गाडा ओढतांनाही मुलाच्या शिक्षणासाठी पदरमोड करणारी आई, प्रेमात पडल्यानंतरही त्यात हरवून न जाता स्वतःचे ध्येय गाठणारी, प्रेम वेगळे आणि भवितव्य घडवणे वेगळे यांची जाणीव ठेवणारी, ती मनोजला करून देणारी श्रद्धा, मदत करण्यात कुठेही मागे नाही परंतु परखडपणे अपमान होईल इतका जिव्हारी बोलणारा पांडे नावाचा मित्र, यांची चित्रणे अतिशय सकसपणे साकारलेली आहेत. ग्रामीण आणि शहरी जीवन, गामीण भागात असलेल्या शैक्षणिक दुरावस्थामुळे मुलांची शहरी मुलांच्या तुलनेत होणारी स्पर्धेतील कोंडी, लोकसेवा आयोगाच्या पूर्व व मुख्य, मुलाखत असे परीक्षेचे टप्पे, त्यासाठी करावी लागणारी तयारी, प्रेमात पडलेल्यांची मानसिक अवस्था, असा मोठा आवाका या कादंबरीला लाभलेला आहे. एखादा चित्रपट पहावा तसा हा प्रवास आपल्यासमोर झरझर उलगडत जातो. प्रत्येक टप्प्यावर श्वास रोखून ठेवायला तर कधी भावनाविवश होण्यास भाग पाडतो.

तरुणांच्या भावविश्वाला हळुवारपणे फुलवत जाणारी ही कादंबरी आहे. यशाचा पाठपुरावा करताना होणारी दमछाक आणि पुन्हा पुन्हा नव्याने सुरुवात करताना वाटणारी उमेद, यात मानसिक अवस्थांची जी आंदोलने उसळतात, आपटतात लाटांसारखी, त्यांची वर्णने वाचकाला आपलेपणाशी जुळवून घेतात. स्थळकाळानुसार भाषेचा वापर बदलत जातो, त्यांची कंपने हृदयाची कंपने मोजताना दिसतात तशी लेखकाने समर्थपणे उलगडलेली आहेत. कथानकाचा बांधेसूदपणा हा कादंबरीसाठी मोठा गुण आवश्यक असतो, तो इथे पीळदारपणे दिसून येतो. 'माणसाने तितकीच मोठी स्वप्ने बघावीत जितकी त्याची पात्रता असते.' 'नेहमी उंच भरारी घेतली पाहिजे. खूप उंची नाही गाठता आली तरी त्यात वाईट काही नाही. त्यानिमित्ताने निदान पंख तरी मजबूत होतील.' ' 'टुरिझम' आणि 'टेररिझम' या शब्दांच्या अक्षरवाचनात त्याचा गोंधळ होऊन तो चुकला होता.' यासारखी अनेक वाक्ये लेखकाच्या प्रतिभेची आणि कथानकाची सुंदर प्रतीके ठरलेली आहेत.

ध्येयाच्या शिखरापर्यंत पोहोचण्यापर्यंतचा प्रवास हा एकट्याचा वाटत असला तरी त्यात अनेकांचा सहभाग असतो. त्या सगळ्यांना समोर ठेवताना एकूण जगण्याचा, वातावरणाचा, परिस्थिती व बौद्धिक क्षमता, यांचाही मागोवा घ्यावा लागतो. तो लेखकाने घेतलेला आहे. स्वतःचे गाव, ग्वाल्हेर, दिल्ली, पिली कोठी, उत्तरांचल असा भौगोलिक प्रवास, तिथली स्थळे, जनजीवन, मानवी वर्तन, यांची वर्णने कादंबरीला जिवंतपणा बहाल करतात. कादंबरीची मांडणी लहान लहान अशा पन्नास प्रकरणांत केलेली आहे. त्यामुळे आपण एखाद्या यशस्वी ठरलेल्या आयपीएस अधिकाऱ्याचे आत्मचरित्र वाचत आहोत असे सतत वाटत राहते. वास्तविक हे खरोखर एका मनोजकुमार शर्मा नावाच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे चरित्र आहे. त्यामुळे याला 'चरित्रात्मक कादंबरी ' म्हणता येईल. 'मनोजकुमार शर्मा हे इतरांना कायम उर्जा देणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची ही उर्जा अनेकांपर्यंत येवो यासाठी हा पुस्तक प्रपंच आहे', संदीप काळे यांनी अनुवादाबाबतची स्वतःची भूमिका त्यांच्या मनोगतात मांडलेली आहे. प्रकाश आमटे यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. एक चांगले पुस्तक मराठी आणले यासाठी संदीप काळे यांचे अभिनंदन करायला हवे. 'महाराष्ट्रातला प्रत्येक तरुण या ऐतिहासिक दस्तऐवजाचं जबरदस्त स्वागत करेल' हा अनुवादकाचा विश्वास सार्थ ठरेल, असे हे पुस्तक नक्कीच आहे.

दिल्ली दरवाज्यात प्रवेश करणाऱ्या ट्वेल्थ फेल तरुणाचा प्रवेश, ही कल्पकता आशयाला संपन्न करणारी आहे. तीच कल्पकता नयन बारहाते यांनी समर्पकतेने मुखपृष्ठावर साकारलेली आहे. आयुष्याची रम्य पहाट उजळणारी रंगसंगती तितकीच अनुरूप आहे.

**मूल्य १९६ रुपये सवलतीत १३० रुपये**

# 'ग्रंथाली' पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे




'वाटेवरले दिवे' पुस्तकप्रकाशनसमयी लेखिका नीला चांदोरकर, डॉ. स्नेहलता देशमुख, अशोक बेंडखळे, सुदेश हिंगलासपूरकर आणि धनश्री धारप



रमेश कुलकर्णी लिखित 'समर्थ व्यवस्थापन' (दासबोध) या पुस्तकास पुरस्कार मिळाला. त्यासमयी कवी प्रवीण दवणे आणि लेखक रमेश कुलकर्णी



'जय भीम लाल सलाम' पुस्तकप्रकाशनसमयी संदीप काळे, चंद्रकांत साळुंखे, रुबिना रिझवी, श्रद्धा जोशी–शर्मा, राजश्री पाटील आणि सुदेश हिंगलासपूरकर



दहिसर विद्या मंदिर 'मराठी भाषा दिना'निमित्त पुरस्कार स्वीकारताना शोभा हिंगलासपूरकर



'बाबा आमटे : व्यक्ती आणि कर्तृत्व पुस्तकप्रकाशनसमयी राजेश कुंटूरकर, सूर्यकांत कदम, प्रा.डॉ. सुरेश सावंत, संदीप काळे, डॉ. सोमनाथ रोडे, लेखक बाळू दगडुमवार, प्रा. जयदेव डोळे, सुदेश हिंगलासपूरकर आणि डॉ. अशोक बेलखोडे





'काळे आकाश, निळा प्रकाश' पुस्तकप्रकाशनसमयी डॉ. रमण दोशी, अलका काकडे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. यश वेलणकर, लेखक डॉ. प्रमोद सलगरकर, डॉ. विजय कानेटकर, डॉ. जयंत शेळगीकर आणि सूत्रसंचालन बीना जोशी



दहिसर विद्या मंदिर 'मराठी भाषा दिना'निमित्त विद्यार्थी विशेषांकाचे प्रकाशन करताना लेखिका शिल्पा खेर, मानसी कुलकर्णी, मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या उपस्थितीत.

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.